CMYK




सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

लातूर | रविवार, १६ नोव्हेंबर २०२५ । वर्ष ३ रे अंक २५६ । पाने १२+८ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. dainiktarunbharat.com epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



राष्ट्रदेवाच्या श्रीचरणी, आपल्या तारुण्याची तीन वर्षे अर्पण करणे ही सामान्य गोष्ट नाही. जीवनभर अभिमान बाळगावा अशी ही गोष्ट आहे. प्रचारक जीवनात प्राप्त झालेले लोकसंग्रहाचे संस्कार त्याला जीवनभर साथ देत राहतील.

**- हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

## विनम्र अभिवादन



राष्ट्र सेविका समितीच्या संस्थापिका वंदनीय मावशी केळकर यांचा आज तिथीनुसार स्मृतिदिन

# अल फलाह विद्यापीठातील १५ डॉक्टर बेपत्ता




- **शाहीनच्या व्हॉट्सॲप ग्रुपमधील दोनशे जण रडारवर**
- **दहशतवादी मॉड्यूलमधील चार डॉक्टरांची नोंदणी रद्द**

◆ **नवी दिल्ली, १५ नोव्हेंबर**

दिल्लीतील कार बॉम्बस्फोट प्रकरणात सहभागी असलेल्या उच्चशिक्षित दहशतवादी मॉड्यूलशी संबंध असेलेले अल फलाह विद्यापीठातील १५ डॉक्टर बेपत्ता आहेत. तपास यंत्रणांना त्यांच्या मोबाईलचे लोकेशन मिळविण्यात अद्याप यश आलेले नाही आणि या डॉक्टरांचा घटनेनंतर कुटुंबासोबतही संपर्क नसल्याचे तपासात उघड झाले. याशिवाय फरिदाबाद दहशतवादी मॉड्यूलमध्ये अटक करण्यात आलेली डॉ. शाहीन सईद हिच्या व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये दोनशे डॉक्टरांचा समावेश असून त्यांचाही शोध सुरू आहे. विशेष असे की, यातील बहुतांश डॉक्टर काश्मिरातीलच आहे.

हरयाणाच्या फरिदाबाद दहशतवादी मॉड्यूलसंदर्भात अटक करण्यात आलेले चार डॉक्टर डॉ. मुझफ्फर अहमद, डॉ. आदिल अहमद, डॉ. मुझम्मिल गनई आणि डॉ. शाहीन सईद यांचे परवाने राष्ट्रीय वैद्यकीय आयोग अर्थात् एनएमसीने शनिवारी रद्द केले. दिल्लीत बॉम्बस्फोट घडविणारा डॉ. उमर नबी आणि फरिदाबाद दहशतवादी मॉड्यूलमध्ये सहभागी असलेला डॉ. मुझम्मिल गनईच्या संपर्कात असेलेले अल फलाह विद्यापीठातील १५ डॉक्टर बेपत्ता असल्याची माहिती तपास पथकातील एका अधिकाऱ्याने दिली. त्यांच्या शोधासाठी विविध पथके रवाना करण्यात आली. मुझम्मिलच्या कॉल डिटेल्सच्या आधारे तपास यंत्रणांनी त्याच्याशी अनेक वेळा बोललेल्या डॉक्टरांशी संपर्क साधला, परंतु त्यांचे फोन बंद आहे.

फरिदाबाद मॉड्यूलची प्रमुख सदस्य डॉ. शाहीनने पाकिस्तानसह अनेक देशांमध्ये तिचे नेटवर्क पसरवले होते. ती अनेक काश्मिरी वंशाच्या डॉक्टर आणि विद्यार्थ्यांशी संपर्कात होती, ज्यात एका पाकिस्तानी लष्कराच्या डॉक्टरचाही समावेश आहे. तिच्या संपर्कात उत्तर प्रदेशातील २०० काश्मिरी वंशाचे डॉक्टर आणि वैद्यकीय विद्यार्थी होते, तर देशभरात ही संख्या हजारपेक्षा जास्त असल्याचे तपासात समोर आले. *(वृत्तसंस्था)*

### अल फलाह विद्यापीठाविरुद्ध गुन्हे




**दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने अल फलाह विद्यापीठाविरुद्ध दोन एफआयआर दाखल केले. एक एफआयआर फसवणुकीशी संबंधित आहे, तर दुसरी बनावटगिरीच्या कलमांखाली आहे. पोलिसांनी विद्यापीठाला नोटीसही बजावली असून त्यांना काही नोंदी मागितल्या आहेत. शनिवारी दिल्लीच्या ओखला येथील विद्यापीठाच्या कार्यालयात पोलिसांनी छापा टाकला.**

### अनेक देशांमध्ये नेटवर्क स्थापन

एनआयएच्या चौकशीतून डॉ. शाहीन आणि डॉ. मुझम्मिल यांनी पाकिस्तान, मलेशिया, तुर्की, यूएई, मालदीव आणि बांगलादेशसह अनेक देशांमध्ये नेटवर्क स्थापन केल्याचे समोर आले. दिल्लीतील अनेक ठिकाणी बॉम्बस्फोट घडवून परदेशात पळून जाण्याची योजना आखली होती. डॉ. शाहीनने व्हिसासाठी अर्जही केला होता.

### सूत्रधार अफगाणमध्ये

दहशतवादी मॉड्यूलमध्ये पकडण्यात आलेला डॉ. आदिलचा मोठा भाऊ डॉ. मुजफ्फर हा दिल्ली बॉम्बस्फोट प्रकरणाचा सूत्रधार असल्याचे तपासात समोर आले असून तो दुबईतून अफगाणमध्ये पसार झाला. त्याच्याविरोधात लवकरच रेड कॉर्नर नोटीस जारी करण्यात येईल. दिल्लीतील कार स्फोटात आठ आरोपींमध्ये त्याचाही समावेश आहे. तो जैशच्या उकाशा नावाच्या हँडलरच्या संपर्कात असल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले.

### पठाणकोट, प. बंगालमधून दोघांच्या आवळल्या मुसक्या

**नदी दिल्ली, १५ नोव्हेंबर**

दिल्ली बॉम्बस्फोट प्रकरणात तपास यंत्रणांनी शनिवारी पंजाबमधील पठाणकोट येथून ४५ वर्षीय डॉ. रईस अहमद भट्ट याला अटक करण्यात आली. तो जम्मू आणि काश्मीरमधील अनंतनाग येथील रहिवासी आहे. तो फरिदाबादमधील अल-फलाह विद्यापीठात चार वर्षे काम करत होता.

याशिवाय पश्चिम बंगालमधील उत्तर दिनाजपूर येथून एमबीबीएसचा विद्यार्थी निसार आलम याला अटक केली, तो अल-फलाह विद्यापीठाचा विद्यार्थी आहे. त्याच्याकडून डिजिटल उपकरणे जप्त करण्यात आली. *(वृत्तसंस्था)*

# मुंबई मनपा निवडणूक काँग्रेस स्वबळावर लढणार : चेन्निथला

## पक्षाच्या उमेदवारांना संधी देण्याची कार्यकर्त्यांची मागणी

◆ **मुंबई, १५ नोव्हेंबर**






मुंबई महानगरपालिकेची निवडणूक स्वबळावर लढण्याचा निर्णय काँग्रेसने घेतला असून, याबाबतची घोषणा मुंबई काँग्रेसच्या एकदिवसीय शिबिरात काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांनी केली.

काँग्रेसचे स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी स्वबळावर लढण्याची मागणी केली असून, २२७ जागांवर पक्षानं स्वतःच्या उमेदवारांना संधी द्यावी, अशी कार्यकर्त्यांची इच्छा आहे. ही निवडणूक स्थानिक पातळीवरील असून, स्थानिक नेत्यांच्या भावना आणि कार्यकर्त्यांच्या इच्छेला महत्व द्यायला हवं, असं रमेश चेन्निथला यांनी काँग्रेसच्या एकदिवसीय शिबिरामध्ये स्पष्ट केले.

आगामी महापालिका निवडणूक स्थानिक पातळीवरची असल्यामुळं स्थानिक स्तरावरील नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना उमेदवारीची संधी द्यावी, असं पक्षाचं मत आहे. मात्र, मुंबईमधील आणि इतर जिल्ह्यातील आघाडीबाबतचे निर्णय वेगवेगळे घेतले जाऊ शकतात, कारण प्रत्येक जिल्ह्यातील परिस्थिती वेगवेगळी असल्यानं, स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेऊन निर्णय घेतले जातील. असे सांगताना, पक्षश्रेष्ठींच्या निर्देशानुसार मुंबईमध्ये आघाडी केली जाऊ नये, असा निर्णय घेतल्याचं यावेळी चेन्निथला यांनी आवर्जून सांगितले. काँग्रेसचे नेते कार्यकर्ते स्वबळाची भाषा वारंवार करतच होते. तसा निर्णय राज्याच्या कार्यकारीणीत घेऊन दिल्लाला कळवला होता. त्यानुसार आता स्वबळावर लढण्याचा निर्णय अखेर काँग्रेसने जाहीर केला. *(तभा वृत्तसेवा)*

# लालूंच्या कुटुंबात कलह

## कुटुंबीयांशी फारकत, राजकारण सोडले; रोहिणीची घोषणा

◆ **पाटणा, १५ नोव्हेंबर**



राजदच्या झालेल्या पराभवासाठी पक्षातील अंतर्गत राजकारण जबाबदार आहे वेळोवेळी मी यासंदर्भात सतर्क केले. मात्र कुणीच लक्ष दिले नाही. आता मी राजकारण सोडत असून कुटुंबासोबचे सर्व संबंध तोडत असल्याची घोषणा लालूप्रसाद यादव यांची कन्या रोहिणी आचार्य यांनी केली. रोहिणी यांच्या टिप्पणीने लालू कुटुंबात कलह निर्माण झाला आहे.

पक्षाच्या पराभवानंतर लालूप्रसाद यादव यांची छोटी मुलगी आणि तेजस्वी यादव यांची बहीण रोहिणी आचार्य यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, मी राजकारण कायमचे सोडत आहे आणि मी माझ्या कुटुंबासोबतचे सर्व संबंधही तोडत आहे. संजय यादव आणि रमीज यांनी मला हेच करायला सांगितले होते. सगळ्या गोष्टींची जबाबदारी मी घेत आहे.

बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी लालूप्रसाद यादव यांनी त्यांचा मोठा मुलगा तेजप्रताप यादव यांच्यासोबतचे संबंध तोडले होते. तेजप्रताप यांनी वेगळा पक्ष काढून बिहार विधानसभा निवडणूक लढवली. निवडणुकीच्या निकालानंतर लालू कुटुंबात कलहाचे वातावरण आहे. राजकीय संघर्ष यादव कुटुंबापर्यंत पोहोचला आहे. राज्यसभा खासदार संजय यादव हे राजदचे निवडणूक रणनीतीकार आहेत. रोहिणी यांनी सातत्याने त्यांच्या कार्यप्रणालीवर आक्षेप घेतले होते. *(तभा वृत्तसेवा)*

## महत्त्वाचे

### अमोनियम नायट्रेटचा स्फोट होऊन ९ ठार, ३२ जखमी

**श्रीनगर :** फरिदाबाद येथून जप्त केलेल्या अमोनियम नायट्रेटचे नमूने घेताना जोरदार स्फोट झाल्याने ९ जणांचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास श्रीनगर येथील नौगाम पोलिस ठाण्यात घडली. स्फोटात ३२ जण जखमी झाले. जम्मू-काश्मीरचे पोलिस महानिरीक्षक नलिन प्रभात यांनी दिलेल्या माहितीनुसार जवळपास ३६० किलो अमोनियम नायट्रेट हरयाणतील फरिदाबाद येथून जप्त करण्यात आले होते. ही स्फोटके नौगाम पोलिस ठाण्यात ठेवण्यात आली होती. स्फोटकांची तपासणी करण्यासाठी ते प्रयोगशाळेत पाठविले जाणार होते. त्यासाठी नमूने घेण्याची प्रक्रिया सुरू असताना रात्री अचानक स्फोट झाला. यामध्ये फॉरेन्सिक सायन्स लेबोरेटरीचे तीन कर्मचारी, दोन फोटोग्राफर,दोन महसूल अधिकारी, एक शिंपी आणि एक तपास संस्थेचा अधिकारी, अशा ९ जणांचा मृत्यू झाला. स्फोटाची तीव्रता एवढी भीषण होती की एक किलोमीटर पर्यंत आवाज गेला. स्फोटामुळे आजूबाजूची घरांना तडे गेले असून पोलिस स्टेशनची इमारत कोसळून पडली, असे प्रभात यांनी सांगितले. या घटनेमागे दहशतवाद्यांचा हात नसून हा केवळ अपघात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# तब्बल ५५ शाखाध्यक्षांनी सामुहिकपणे उगारले 'राजीनामास्त्र'

## शिवसेना शिंदे गटाचे वाढले 'टेन्शन' । जगताप व बागल गटात राजकीय सुंदोपसुंदी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १५ नोव्हेंबर-**

नगरपरिषदा, नगरपालिका, नगर पंचायतच्या निवडणुकीची घोषणा झाली आहे. ऐन निवडणुकीच्या धामधुमीत शिवसेना शिंदे गटाच्या करमाळा येथील दोन-तीन नव्हे तब्बल ५५ शाखाध्यक्षांनी सामुहिकपणे राजीनामास्त्र उगारल्याने पक्षसंघटनेचे जणू टेन्शन वाढले आहे. यावरुन माजी आमदार जयवंतराव जगताप व शिवसेना नेते दिग्विजय बागल गटात राजकीय सुंदोपसुंदी सुरु असल्याचे स्पष्ट होते.



शिवसेना शिंदे गटाकडून माजी आमदार जयवंतराव जगताप यांची करमाळा नगरपालिका निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांची नियुक्ती होताच शिवसेना नेते दिग्विजय बागल यांच्या समर्थक असलेले तब्बल ५५ शाखाध्यक्षांसह अन्य पदाधिकाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत सामूहिक राजीनामास्त्र उगारले आहे. २० हजार सभासदांनी आपापले राजीनामे पक्षश्रेष्ठींकडे पोस्टाद्वारे पाठविणार आहेत. शिवसेना शाखाध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांच्या एका बैठकीत राजीनामा देण्याविषयी एकमुखी निर्णय घेण्यात आला. दिग्विजय बागल यांनी यापूर्वी शिवसेना शिंदे गटाकडून करमाळा विधानसभेची निवडणूक लढवली होती. करमाळा तालुक्यात त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. माजी आमदार जगताप यांच्या नियुक्तीवरुन बागल गटाला डावलले जात असल्याची भावना बागल समर्थकांमध्ये निर्माण झाली आहे. या बैठकीस श्री मकाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक सतीश नीळ, आशिष गायकवाड, राजेंद्र मोहोळकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक कुलदीप पाटील, आनंद ढेरे, रंगनाथ शिंदे, नवनाथ बदर, अशोक हनपूडे, संदीप शेळके, राणा वाघमारे, विजयसिंह हाके, रवी शेळके, अक्षय सरडे, केशव बोराडे, विशाल शिंदे, आनंद टेकाळे, विजय काळे, प्रशांत पवार, केशव शिवाजी बोराडे, संदीप गोडसे, महादेव माने, सतीश सोनवणे, दत्तात्रेय काळे, लहू पवार, सचिन शिंदे, पप्पू सरक, शहाजी काळे, दीपक हाके, संदीप हाके, सतीश घेडे, हेमंत शिंगरे, सुदाम झोळ, हेमंत गिरंजे, संजय डोळे, संतोष चांदणे, ओमकार करे, प्रमोद हाके, प्रतीक हाके, विशाल माने, किरण डोंगरे आदी उपस्थित होते.




# पाण्याखाली स्फोटके शोधणारे अनोखे उपकरण विकसित

- **डीआरडीओच्या संशोधकांचे यश**
- **एमपी-एयूव्ही धोकादायक वस्तूंचा घेणार वेध**

◆ **नवी दिल्ली, १५ नोव्हेंबर**

संरक्षण संशोधन आणि विकास संघटना अर्थात् डीआरडीओने सोनार प्रणाली आणि कॅमेऱ्यांनी सुसज्ज असलेले मॅन-पोर्टेबल ऑटोनॉमस अंडरवॉटर व्हेईकल्स अर्थात् एमपी-एयूव्ही नावाचे अनोखे उपकरण विकसित केले. हे उपकरण पाण्याखाली भूसुरुंगांसारख्या धोकादायक वस्तूंचा शोध घईल आणि त्यांना निष्क्रिय देखील करेल. एमपी-एयूव्ही डीप लर्निंग तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे. समुद्रातील धोके आणि मोहिमांसाठी हे उपकरण महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

संरक्षण विभागाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, डीआरडीओने अत्याधुनिक स्वयंचलित एमपी-एयूव्ही उपकरण विकसित केले. सोनार प्रणाली आणि कॅमेऱ्याने सुसज्ज असलेले हे उपकरण भूसुरुंगांसारख्या धोकादायक वस्तूंना त्वरित शोधण्यास आणि ओळखण्यास मदत करणार आहे. हे उपकरण डीप लर्निंग



तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे.

नवीन उपकरण विशाखापट्टणम येथील डीआरडीओच्या नौदल विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रयोगशाळेने विकसित केले आहे. ते पाण्याखालील खाण-संरक्षण मोहिमांसाठी डिझाईन केलेले आहे. या प्रणालीमध्ये साईड-स्कॅन सोनार आणि अत्याधुनिक कॅमेरे बसविण्यात आले. पाण्याखाली स्फोटके पेरून लढाऊ नौकांना उद्ध्वस्त करण्याचे प्रयत्न शत्रूकडून केले जाते. असे धोके त्वरित ओळखून हे उपकरण निष्क्रिय करते. *(वृत्तसंस्था)*

### डीआरडीओ सचिवांकडून कौतुक

**डीआरडीओचे सचिव समीर व्ही. कामत यांनी उपकरणाच्या यशस्वी चाचणीबद्दल नौदल विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रयोगशाळेच्या पथकाचे अभिनंदन केले. त्यांनी म्हटले की, हे पाऊल सक्षम, स्मार्ट आणि नेटवर्क-आधारित अँटी-माईन सोल्यूशनच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण यश आहे.**

### कारवाईसाठी डेटा उपलब्ध होणार

पाण्याखाली आढळणाऱ्या संशयास्पद वस्तूंची स्वयंचलितपणे ओळख पटवून वर्गीकरण करता येणार आहे. यामुळे पाण्यातील मोहिमांसाठी मोठी मदत होणार आहे. उपकरण व्हॉईस कम्युनिकेशन प्रणालीने सुसज्ज आहे. यामुळे वेगवेगळ्या मोहिमांसाठी डेटा उपलब्ध होऊ शकेल आणि त्याचा वापर शत्रूविरोधात कारवाई करण्यासाठी होईल. या उपकरणाची अलिकडेच यशस्वी चाचणी प्रणालींचे प्रमुख तांत्रिक पॅरामीटर्स आणि मिशन उद्दिष्टे यशस्वीरीत्या सत्यापित झाली आहेत. या उकरणाचे उत्पादन काही महिन्यांत सुरू होईल.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे...



### महसूल विभागाकडून अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई; ६० हजारांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

वडकबाळ येथे सीना नदीपात्रातून अवैध वाळू भरणाऱ्या टेम्पोवर महसूल विभागाच्या पथकाकडून कारवाई करून ६० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करून वाहनचालकासह टेम्पोवर मंद्रूप पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंद्रूप तहसीलदारांच्या आदेशानुसार मंडलअधिकारी ज्योतिबा पवार, राणा वाघमारे, वडकबाळच्या महसूल अधिकारी प्रिती साळुंखे, रावसाहेब कोकरे यांच्या पथकाला वडकबाळ येथे सीना नदीच्या जुन्या पुलावर क्रमांक नसलेल्या टेम्पोमधून वाळू भरण्यात येत असल्याची माहिती मिळाल्यावर तहसीलदार सुजित नरहरे यांच्या उतस्थितीत वाहनावर कारवाई करण्यात आली. यावेळी वाहनचालकाकडे रॉयल्टी भरल्याची पावती नसल्याने वाहनासह चालकावर गुन्हा दाखल करण्यात आले आहे. यावेळी वाळू १० हजार रूपये तर वाहनाची किंमत ५० हजार रूपये असे ६० हजार रूपयांचे मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. वाहनचालक महादेव खरात याच्याविरुद्ध मंद्रूप पोलीसात फिर्याद देण्यात आली आहे. अवैध वाळू व मुरूम उपसा करणाऱ्या वाहनचालकावर कारवाई करण्यात येणार असल्याचे महसीलदार नरहरे यांना सांगितले.



### अपघात टाळण्यासाठी नियमांचे पालन करा : विभागीय अधिकारी यामावार

**वळसंग दि. १५ नोव्हेंबर-**

ट्रॅक्टर चालकांनी रिफ्लेक्टरचा वापर करावा, ड्रिंक-ड्राईव्ह प्रतिबंध, वाहनांवर रिफ्लेक्टर टेप लावणे तसेच अपघात टाळण्यासाठी आवश्यक असलेल्या वाहतूक सुरक्षेच्या नियमांचे पालन करावे, अशी सूचना उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावर व सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल डोंगरे यांनी दिली. वळसंग पोलीस ठाणे हद्दीतील गोकुळ शुगर कारखाना, धोत्री येथे ऊस वाहतूक करणाऱ्या सर्व चालकांची बैठक आयोजित करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. बैठकी दरम्यान वाहनांवर रिफ्लेक्टिव्ह टेप लावणे अनिवार्य, मद्यप्राशन करून वाहन चालवण्यास सक्त मनाई, रात्रीच्या वेळी लाईट, इंडिकेटर, रिफ्लेक्टर तपासून वापरणे, वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून अपघात प्रतिबंध, अवैध पार्किंग, रिव्हर्स किंवा ओव्हरटेक टाळणे असे अनेक नियमांचे पालन करण्याची सूचना दिली. बैठकीस कारखान्याचे पदाधिकारी तसेच ७० ते ७५ ऊस वाहतूक चालक व ट्राफिक अंमलदार उपस्थित होते.



### सौर जल-क्षारीकरण प्रणालीवर डॉ. संतोष डोंगरे यांची पीएच.डी.

**पंढरपूर, दि. १५ नोव्हेंबर-**

स्थानिक संशोधक डॉ. संतोष द. डोंगरे यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विषयात सौर जल-क्षारीकरण प्रणाली या संशोधन विषयावर आपला पीएच.डी. संशोधन प्रबंध यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे. या संशोधन चे सादरीकरण ८ ऑगस्ट रोजी ओरिएंटल युनिव्हर्सिटी, इंदोर येथे करण्यात आले. ८ नोव्हेंबर २०२५ रोजी नवनियुक्त कुलगुरू प्रा. (डॉ.) अमोल गोरे यांचे हस्ते डिग्री प्रदान झाली या संशोधनासाठी त्यांनी प्रा. (डॉ.) एस. के. सोमाणी, माजी कुलगुरू, ओरिएंटल युनिव्हर्सिटी इंदोर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सह-मार्गदर्शक प्रा. (डॉ.) एच. एस. पाटील, प्राचार्य, GIDC कॉलेज, नवसारी (गुजरात) यांचे सहकार्य मिळाले. डॉ. संतोष डोंगरे यांचे संशोधन हे पिण्यायोग्य पाण्याच्या टंचाईच्या समस्येवर उपाय शोधणारे असून, सौर ऊर्जेचा वापर करून समुद्रातील अथवा खाऱ्या पाण्यापासून स्वच्छ व शुद्ध पाणी मिळविण्याच्या दृष्टीने हे संशोधन महत्त्वपूर्ण मानले जात आहे. या अभिनव संशोधनात सौर परबोलिक डिश, घरगुती कुकर आणि कॉम्पॅक्ट कंडेन्सर यांचा एकत्रित वापर करून एक नवीन हायब्रिड डीसॅलिनेशन सिस्टम विकसित करण्यात आले आहे. या कार्यासाठी सतत प्रेरणा देणारे पंढरपूर येथील रहिवासी प्रा. (डॉ.) अतुल अ. सागडे (रिसर्च सायंटिस्ट, थॉम्पसन रिसर्च लॅब, एरिका, इटली) यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

### अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या अध्यक्षपदी नंदकुमार देशपांडे

**पंढरपूर, दि. १५ नोव्हेंबर-**



अखिल भारतीय ग्राहक पंचायतीची बैठक जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांचे अध्यक्षतेखाली ज्येष्ठ मार्गदर्शक सुभाष सरदेशमुख, दीपक इरकल, प्रांत सहसंघटक विनोद भरते, प्रांत सदस्य जिल्हा उपाध्यक्ष विनय उपाध्ये जिल्हा सचिव सुहास निकते यांच्या उपस्थितीत शहर तालुका अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात येऊन अध्यक्षपदी नंदकुमार देशपांडे, उपाध्यक्षपदी भाळवणी येथील प्रशांत माळवदे यांची निवड करण्यात आली. बैठकीच्या प्रारंभी ओझर येथे झालेल्या कार्यकर्ता शिबिराची माहिती शशिकांत हरिदास जिल्हाध्यक्ष व दीपक इरकल यांनी दिली. पदाधिकाऱ्यांच्या निवडी पुढील प्रमाणे : सचिवपदी महेश भोसले सहसचिव आझाद अल्लापुरकर कोषाध्यक्ष सागर शिंदे यांच्या पदाच्या निवडी झाल्या तर कार्यकारणी सदस्य म्हणून धनंजय पंडीत,संजय खंडेलवाल, सतीश निपाणकर, मंगेश देशपांडे, शशिकांत सुगंधी, इंद्रजीत फडे, शाम तापडिया, शहाजी जाधव, शहाजी ठोंबरे आदींचा यामध्ये समावेश करण्यात आला. या निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार शशिकांत हरिदास, विनय उपाध्ये दीपक इरकल यांच्या हस्ते करण्यात आला.

# पंधरा दिवसांत ७०० दुरुस्ती प्रस्ताव मंजूर

## शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांचा विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

शालेय रेकॉर्डमध्ये अनेकवेळा विद्यार्थ्यांच्या नावात किंवा जन्मतारखांमध्ये चुका असतात. पहिली ते दहावीपर्यंतच नावात किंवा शाळेच्या रेकॉर्डमध्ये बदल करता येतो. त्यासाठी शिक्षण विभागाकडे प्रस्ताव दाखल करून त्यास मंजुरी मिळणे गरजेचे आहे. दहावी व बारावी परीक्षेच्या बोर्ड प्रमाणपत्रावर आलेले नाव शेवटपर्यंत कायम राहते. त्यामुळे शाळांच्या प्रम णपत्र व दाखल्यावरील दुरुस्ती करण्यासाठी पालक व विद्यार्थी वारंवार शिक्षणाधिकारी कार्यालयाला चकरा मारतात. मात्र अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीमुळे दुरुस्तीऐवजी मनस्ताप सहन करावा लागतो. शिक्षण विभागाच्या मंजुरीशिवाय त्यामध्ये मुख्याध्यापकांना बदल करता येत नाही. नाव, स्पेलिंग, प्रमाणपत्र व विविध दुरुस्तीच्या ७०० प्रस्तावांना शिक्षणाधिकारी कार्यालयाला मंजुरी दिल्यामुळे पालक व विद्यार्थ्यांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी दुरुस्ती प्रस्तावांना प्राधान्य देऊन पालक व विद्यार्थ्यांचा त्रास कमी केला आहे. शैक्षणिक नोंदीमधील अडचणी दूर केल्या केल्याने विद्यार्थी व पालकांमधून शिक्षणाधिकाऱ्यांचे कौतुक करण्यात येत आहे. आधारकार्ड व जन्मदाखल्यावर वेगळे नाव, जन्मतारखेत चुका, नावाच्या अक्षरात म गेपुढे, स्पेलिंगमध्ये बदल, काना-मात्रा वेगळा, वडिलांच्या नावात बदल, जन्मतारखेतील महिना वेगळा, तारीख वेगळी, आडनावात चुका चुका शाळा व पालकाकडून झालेले असतात. शैक्षणिक कागदपत्रातील चुकांमुळे अडचण निर्माण होऊ नये यासाठी विद्यार्थी व पालक जन्मदाखल्याप्रमाणेच नाव व जन्मतारीख व्हावी यासाठी शाळेकडे हेलपाटे मारतात. शाळेकडून कागदपत्रासह प्रस्ताव शिक्षण विभागाकडे सादर केला जातो. त्या प्रस्तावास मंजुरी मिळाल्यानंतर मुख्याध्यापक आपल्याकडील रेकॉर्डवरील नावात व जन्मतारखेत बदल करतात.

> शाळेच्या कागदपत्रांमध्ये चुका व बदल असल्यामुळे विद्यार्थ्यांना भविष्यात त्रास सहन करावे लागते. त्यामुळे नावात व जन्मतारखेत बदलाचे ७०० हून अधिक प्रस्ताव दाखल झाले होते. कागदपत्रांची पडताळणी करून पंधरा दिवसात ७०० प्रस्ताव मंजूर केले आहेत. यामुळे विद्यार्थी व पालक यांचे वेळ व पैशाची बचत होणार आहे. पालकांनी, शाळांनी माध्यमिक शिक्षण विभागातून हे मंजुरी आदेश तातडीने घेऊन जावेत.
>
> **सचिन जगताप**
> माध्यमिक शिक्षणाधिकारी,
> जिल्हा परिषद.

> शाळांच्या दप्तरमध्ये पालक व विद्यार्थी यांच्या नजरचुकीमुळे चुका झालेले असतात. त्यांची दुरुस्ती करून घेण्यासाठी दहावी व बारावीपर्यंत संधी असते. असे प्रस्ताव माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी १५ दिवसात ७०० प्रस्ताव मंजूर करून पालक व विद्यार्थ्यांना दिलासा दिला आहे. त्यामुळे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांचे काम कौतुकास्पद आहे.
>
> **सुनिल व्हनमाने,** अध्यक्ष, पालक संघ, मंद्रूप



### उत्कर्ष विद्यालयात बालदिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १५ नोव्हेंबर-**

येथील उत्कर्ष प्राथमिक विद्यालयात बालदिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी लोकमंगल बँकेचे संचालक विजय कुलकर्णी, सल्लागार अँड. गजानन भाकरे, व्यवस्थापक शिवाजी दरेकर, संस्थेच्या संस्थापिका डॉ. संजीवनी केळकर, दमयंती कुलकर्णी, वसुंधरा कुलकर्णी उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.

प्रास्ताविक शिवाजी दरेकर यांनी केले. अँड. गजानन भाकरे यांनी जिद्द, धाडस आणि चिकाटी ठेवा, यश हमखास प्राप्त होईल. तसेच सर्व सत्ता येतील जातील परंतु बालपण परत येणार नाही असे मनोगतातून सांगितले. यावेळी बँकेमार्फत घेण्यात आलेल्या रंगभरण स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमासाठी विद्यालयाचे प्राचार्य सुनील कुलकर्णी, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका विश्रांती मागाडे, उपमुख्याध्यापिका स्वराली कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन शिक्षिका रसाळ यांनी केले. आभार शिक्षक शेळके यांनी मानले. बालदिनानिमित्त इ.१ ते ४ च्या वर्गामध्ये विविध मनोरंजनात्मक खेळ घेत गाणी, गोष्टी व चित्रपट यांचे व्हिडिओ क्लिप दाखवण्यात आले.

# पिलीव बसस्थानक येथील मुख्य चौक कधी घेणार मोकळा श्वास?

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.१५ नोव्हेंबर-**

सोलापूर-सातारा महामार्गावरील माळशिरस तालुक्यातील पिलीव हे मुख्य बाजारपेठ असणारे गाव असून याठिकाणी कायम रहदारी असते. पिलीव बसस्थानक येथील मुख्य चौकातील काम गेल्या पाच ते सहा वर्षापासून रखडले असल्याने वाहतुकीचा पुरता बोजवारा उडाला आहे. याकडे लक्ष वेधताना येथील मुख्य चौक मोकळा श्वास कधी घेणार? असा संतापजनक सवाल उपस्थित केला जात आहे.

संबंधित ठेकेदाराने गेल्या पाच-सहा वर्षांपासून येथील काम खडवविले आहे. याठिकाणी ना डिव्हायडर, ना वाहतूक नियंत्रण रेषा, ना लाईट अशी विदारक चित्र दिसून येत आहे. विशेष म्हणजे, पदपथावरील विक्रेत्यांसह अस्ताव्यस्तपणे रस्त्याच्या कडेला लावण्यात येणारी चारचाकी व दुचाकी वाहने यामुळे या चौकातून जा-ये करणे मुश्कीलीचे बनले आहे.

पोलीस चौकीसमोरच वाहने अस्ताव्यस्त लावलेली



असतात. बचेरी चौकापासूनच गाडीवाल्यांनी अतिक्रमण केले आहे. पिलीव बसस्थानकापासून जवळच कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह विद्यार्थ्यांनाही येथील अतिक्रमणाचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांसह विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या परिसरातील अतिक्रमण हटविण्यात यावे, अशी मागणी होत आहे.

### बुधवारी निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण

**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

बुधवार, दि. १९ नोव्हेंबर २०२५ रोजी, श्री शुभराय महाराज मठ येथे, बालसप्ताह निमित्त शालेय निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ आयोजित केला आहे. श्री शुभराय महाराज मठ आणि पाखर संकुल, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या निबंध स्पर्धेला सोलापूर शहरातील खूप शाळांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

बक्षीस वितरण समारंभात स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी आणि शाळेतील शिक्षकवृंद उपस्थित राहणार आहेत. सर्वांनी वेळेवर उपस्थिती राहावे आणि कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन मठाचे श्रीमती शुभांगी बुवा यांनी केली आहे.





### लोकमंगल महाविद्यालयात बालदिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

लोकमंगल कृषी महाविद्यालय-वडाळा येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत बालदिन म्हणजेच पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ.अमोल शिंदे हे अध्यक्षस्थानी होते. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी योगिता शिंदे हिने प्रास्ताविक केले.

रासेयोचे कार्यक्रमाधिकारी प्रा.अजित कुरे यांच्यासह संजना पाटील, संस्कार ठेले, सानिका सावंत आणि साक्षी काळे या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. प्रणिती चोरमले हिने आभार मानले. गौरव शिंदे याने सूत्रसंचालन केले. याप्रसंगी प्रा.सुजाता चौगुले, प्रा.नम्रता गोरे यांच्यासह विद्यार्थिनी उपस्थित होते.



### दक्षिण सोलापूर तालुका युवक काँग्रेस अध्यक्षपदी अनंत म्हेत्रे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप येथील काँग्रेसचे कार्यकर्ते म्हणून काम केलेले व युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव असणारे अनंत म्हेत्रे यांची दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली. काँग्रेसच्या खासदार प्रणिती ताई शिंदे यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनानुसार त्यांची तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष प्रा. सातलिंग शटगार, शहराध्यक्ष चेतन नरोटे, दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष भीमाशंकर जमादार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शहराध्यक्ष गणेश डोंगरे, माजी नगरसेवक बाबा मिस्त्री, माजी महापौर संजय हेमगड्डी, मंद्रूपचे राहुल म्हेत्रे, राहुल भावत, वागेश म्हेत्रे, नागनाथ नंदूरे, संदीप अडोळे, अमित देशमुख, महादेव पराणे, महेश स्वामी, ओंकार शेंडगे, संजय म्हेत्रे, महेश म्हेत्रे, ज्ञानदीप म्हेत्रे आदी उपस्थित होते. म्हेत्रे यांच्या निवडीबद्दल कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.

# 'सुर्वेंची कविता म्हणजे शोषितांचा आवाज'

## सांगोल्यात पद्मश्री नारायण सुर्वे काव्य जागर व पुरस्कार वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१५ नोव्हेंबर -**

समाजातल्या असंख्य प्रश्नांना आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजासमोर मांडणारे पद्मश्री नारायण सुर्वे हे प्रतिभावंत कवी होते. असंख्य कवितांच्या माध्यमातून स्वतःच्या जगण्यातलं वेदनामय चित्रण त्यांनी आपल्या कवितेत मांडलं. त्यांची कविता अंधारात चाचपडणाऱ्या व हतबल झालेल्या युवकाला प्रकाशाची वाट आहे. म्हणूनच सुर्वेंची कविता म्हणजे शोषितांचा आवाज आहे, असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड येथे झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस यांनी केले. ते सांगोला विद्यामंदिर येथे पद्मश्री नारायण सुर्वे जन्मशताब्दी निमित्त आयोजित केलेल्या काव्य जागर व पुरस्कार वितरण कार्यक्रमात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष सुदाम भोरे, सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, काळ्या मातीत मातीत तिफन चालते या गीताचे गीतकार डॉ. विठ्ठल वाघ, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचे सोलापूर जिल्हा प्रतिनिधी कल्याणराव शिंदे,





डॉ.द.ता.भोसले यांच्या सहचारिणी प्रा.स्वाती भोसले, कवयित्री स्मिता पाटील, ज्येष्ठ साहित्यिक कृष्णा इंगोले, प्राचार्य अमोल गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला बाजीराव सातपुते यांनी पद्मश्री नारायण सुर्वे यांचा जीवन परिचय दिला. त्यानंतर काव्य जागर या कार्यक्रमात जयश्री श्रीखंडे, प्रतिमा काळे, रजनी कानडे, राजेंद्र वाघ, कुमार खोंद्रे, स्मिता पाटील, सुधीर इनामदार, इंद्रजीत घुले व मानसी चिटणीस यांनी नारायण सुर्वे यांच्या कवितांचे सादरीकरण केले. प्रास्ताविक पुरुषोत्तम सदाफुले यांनी केले. याप्रसंगी डॉ.विठ्ठल वाघ यांच्या आवाजात काळ्या मातीत मातीत तिफन चालते या कवितेने सभागृह मंत्रमुग्ध झाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.दिगंबर ढोकळे यांनी केले.

> **यांचा झाला सन्मान**
>
> पद्मश्री नारायण सुर्वे संस्कारक्षम संस्था-सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला, पद्मश्री नारायण सुर्वे जीवन गौरव पुरस्कार-कवी विठ्ठल वाघ, मास्तरांची सावली पुरस्कार-प्रा.स्वाती भोसले, काव्यप्रतिभा पुरस्कार-कवयित्री डॉ.स्मिता पाटील, साहित्य पुरस्कार-डॉ.सागर भजनावळे यांचा कुंभण व कवी सुधाकर इनामदार यांचा माझे दगडाचे हात पुस्तकासाठी.

# जिल्हा परिषद शाळांकडून शासनाच्या आदेशाला केराची टोपली

## शासन नियमानुसार सकाळी नऊ वाजता शाळा भरविण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

सकाळची शाळा नऊऐवजी साडेसात वाजता सुरू केल्याने लहान मुलांच्या मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्यावर परिणाम होत असल्याने व अनेक ठिकाणी मुले शाळत झोपत असल्यामुळे महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल रमेश बैस यांनी सर्व शाळांना आदेश देऊन सकाळच्या सत्रातील शाळा नऊ वाजल्यानंतर भरविण्याचे आदेश दिले होते. राज्यपालांच्या आदेशानंतर काही काळ शाळा सकाळी नऊ वाजता भरविण्यात आले. मात्र शिक्षक संघटनांनी आंदोलन करून सकाळच्या वेळेत बदल करून घेतले. त्यामुळे ग्रामीण भागातील शाळा सकाळी पुन्हा साडेसात वाजताच भरविण्यात येत आहे. त्यामुळे शाळा प्रशासनासह शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षक राज्यपालांसह शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखवत असल्याचे दिसून येते.

चिमुकल्यांची पुरेशी झोप व्हावी म्हणून प्राथमिक शाळा सकाळी नऊनंतरच भरवाव्यात, असे निर्देश तत्कालीन राज्यपाल रमेश बैस यांनी दिले होते. त्याची दखल घेत शालेय शिक्षण विभागाने ८ फेब्रुवारी २०२४ रोजी पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक शाळा सकाळी नऊनंतर भरविण्याचे परिपत्रक काढले. परंतु त्याला बहुतांश शाळांनी हरताळ फासला. सकाळी सात ते आठ या वेळामध्येच शाळा भरवण्याचा हट्ट कायम ठेवला आहे. सध्या थंडीचे दिवस असून या काळात मुले उशिरा उठतात. पुरेशी झोप न झाल्यामुळे मुलांमध्ये आळस निर्माण होते. त्यामुळे सकाळी नऊ वाजल्यानंतर शाळा भरले तर मुलांच्या अभ्यासावर परिणाम होणार नाही. थंडीमुळे मुलांना कुडकुडत शाळा गाठावी लागते. त्यांची तयारी करण्यासाठी पालकांना पहाटे पाच वाजताच उठावे लागते. झोप अपूर्ण झाल्यामुळे बेंचवर बसल्यानंतर काही मुले पेंगत असतात. थंडीच्या दिवसात सर्वच शाळांमध्ये हे चित्र असते. पण लहान मुलांच्या या त्रासाकडे दुर्लक्ष करून मुख्याध्यापक व शिक्षक स्वतःच्या सोईसाठी सकाळी साडेसात वाजता शाळा भरविण्यावर ठाम आहेत. शिवाय अनेक शिक्षकांनी शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकीत ठराव करून या निर्णयावर शिक्कामोर्तब केला आहे. त्यामुळे शिक्षणाधिकारी व जिल्हा परिषदेला शाळेवर कारवाई करताना अडचणी येत आहेत. दुसरीकडे जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्याकडून कारवाई करताना हलगर्जीपणा होत असल्याचे पालकांमधून

> **शाळा व्यवस्थापन समितीला अधिकार**
>
> सकाळी नऊ वाजता शाळा भरविण्याचे आदेश सर्व शाळांना पूर्वीच देण्यात आले आहेत. त्यामुळे शाळा व्यवस्थापन समितीला शाळेच्या वेळेत बदल करण्याचा अधिकार आहे. मात्र शाळेच्या वेळेत बदल करताना शिक्षण विभागाची परवानगी घेणे आवश्यक आहे. शाळेच्या वेळेत बदल करण्यासाठी जिल्ह्यातून अनेक प्रस्ताव आले आहेत. त्यापैकी २० प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे. शाळांनी शासनाच्या आदेशाचे पालन करावे.
>
> **कादर शेख,** प्राथमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर

> **व्यायामासाठी योग्य वेळ**
>
> सकाळच्या सत्रात साडेसातला शाळा भरविल्याने मुलांना कवायत व व्यायाम करून घेण्यासाठी योग्य वेळ आहे. शिवाय ग्रामीण भागातील पालक व मुले रात्री लवकर झोपत असल्यामुळे त्यांना सकाळी शाळेला सकाळी लवकर येण्यास त्रास होत नाही. शिवाय दुपारी घरी जाण्यास उशिर होत नाही. त्यामुळे सकाळच्या सत्रात शाळेची वेळ साडेसातच योग्य आहे.
>
> **अनिल म्हेत्रे,**
> शिक्षक, भंडारकवठे

> **थंडीचे दिवस असल्याने...**
>
> सध्या थंडीचे दिवस असल्याने सकाळी लवकर उठल्याने मुलांची झोप पुरेशी होत नाही. त्यामुळे मुलांमध्ये चिडचिडेपणा दिसून येत आहे. सकाळी नऊ वाजल्यानंतर शाळा भरविल्यास मुलांची झोप पूर्ण होऊन मुले 'फ्रेश मूड'मध्ये शाळेला जाऊ शकतात. त्यामुळे सकाळच्या सत्रातील शाळा साडेसाताऐवजी नऊ वाजता भरविण्यात यावे.
>
> **शरणप्पा हेळवी,** पालक, मंद्रूप

सांगण्यात येत आहे. शिक्षणाधिकाऱ्यांनी शाळांना भेटी देऊन शासनाच्या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या शाळांवर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. शिक्षकांच्या सोईपेक्षा मुलांच्या मानसिक स्वास्थ्याचा विचार करण्यावर भर देण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीलाही मार्गदर्शन करावे. तसेच वेळोवेळी ग्रामीण भागातील शाळांना भेटी देऊन कारवाई करणे अपेक्षित आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# २५ पैकी २४ मंत्र्यांनी मारले मैदान

## जनप्रतिनिधी उतरले मतदारांच्या पसंतीला, एक जण पराभूत

**◆ पाटणा, १५ नोव्हेंबर**

नितीश कुमार मंत्रिमंडळातील तब्बल २५ मंत्र्यांना पुन्हा तिकीट देण्यात आले होते. यापैकी २४ मंत्री पुन्हा निवडून आले आहेत. २०२० मध्ये अपक्ष म्हणून निवडून आल्यानंतर मंत्री झालेले सुमित कुमार सिंह मात्र पराभूत झाले.

भारतीय जनता पक्षाचे उमेदवार आणि उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी हे तारापूर तर विजय कुमार सिन्हा हे लखीसराय येथून विजयी झाले आहेत. कृषी मंत्री प्रेम कुमार हे गया, सुपौल येथून कृषी राज्यमंत्री बिजेंद्र यादव ,साहेबगंज येथून मंत्री राजू कुमार



सिंग हे विजयी झाले. २०२० मध्ये राजू कुमार सिंग हे विकासशील पक्षाच्या तिकीटावर विजयी झाले होते आणि नंतर ते भाजपात सामील झाले.

दरभंगा येथून संजय सरोगी आणि बांकीपूर येथून नितीन नाबीन हे सलग पाचव्यांदा विजयी झाले आहेत. दोघेही मंत्री आहेत. याशिवाय रेणू देवी (बेतीया), नितीश मिश्रा (जहांजापूर), निरज कुमार सिंग (छातपूर), केदार प्रसाद गुप्ता (कुरहानी) विजय कुमार मंडल (अमनौर), जिबेश कुमार (जाले), कृष्णानंदन पासवान (हरसिधी)आणि सुनील कुमार (बिहारशरीफ) हे सर्व मंत्री पुन्हा विजयी झाले. हे सर्व मंत्री भारतीय जनता पक्षाचे आहेत. सुमीर कुमार सिंह यांचा चकाई मतदारसंघात राजदच्या सावित्री देवी यांनी तेरा हजारांच्या फरकाने पराभव केला. ◀(वृत्तसंस्था)

### विजयी झालेले जदयूचे मंत्री

» संयुक्त जनता दलाचे शीला कुमारी (फुलपारस), लेशी सिंह (धमधाना), रत्नेस सदा (सोनबारसा), मदन साहनी (बहादुरपूर), विजय कुमार चौधरी (सराईरंजन), जयंत राज(अमरपूर), श्रावण कुमार (नालंदा) आणि मोहम्मद जमा खान (चैनपूर) हे सर्व मंत्री पुन्हा विधानसभेत पोहचले आहेत. ■

### भाजपचे सर्व मंत्री विजयी

» निकालाचे वैशिष्ट्य म्हणजे निवडणुकीला भारतीय जनता पक्षाचे एकूण १५ मंत्री उभे होते. मतदारांनी या सर्व मंत्र्यांना पुन्हा एकदा संधी दिली आहे. मात्र, नव्या मंत्रिमंडळात त्यांचा समावेश होईल की नाही, हे येणाऱ्या काही दिवसांतच समजणार आहे. ■

### बिहार विधानसभा निवडणूक निकाल-२०२५

एकूण जागा : २४३



रालोआ २०२ | महागठबंधन ३४ | इतर ७

| पक्ष | जागा | पक्ष | जागा | पक्ष | जागा |
|---|---|---|---|---|---|
| भाजप | ८९ | राजद | २५ | एआयएमआयएम | ५ |
| जदयू | ८५ | काँग्रेस | ६ | बसपा | १ |
| लोजपा | १९ | माकपा (मा) | १ | आयआयपी | १ |
| हम | ५ | माकप (माले) | २ | - | - |
| रालोम | ४ | व्हीआयपी | - | - | - |

स्रोत : निवडणूक आयोग, भारत

### माजी खासदार सिंह भाजपातून निलंबित

**◆ पाटणा, १५ नोव्हेंबर**

पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवत माजी केंद्रीय मंत्री आर.के. सिह यांच्यासह विधान परिषद आमदार अशोक कुमार आणि त्यांची पत्नी व कटिहारच्या महापौर उषा यांना निलंबित करण्यात आले आहे.

सिंह यांनी उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी आणि भाजपच्या माजी प्रदेशाध्यक्षांवर टीका केली होती. चौधरी यांच्यावर गुन्हेगारी प्रकरणे असल्याचाही त्यांनी आरोप केला. तसेच भाजप नेते आणि माजी उपमुख्यमंत्री तारकेश्वर प्रसाद यांच्याविरोधात अशोक कुमार अग्रवाल यांनी कटिहार विधानसभेत मुलगा सौरभ याला विकासशील इन्सान पक्षाकडून उभे केले. त्यामुळे अग्रवाल यांना पत्नीसह सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे. ◀(वृत्तसंस्था)




बिहार विधानसभा निवडणुकीत चिराग पासवान यांच्या नेतृत्वातील लोकजनशक्ती पार्टी(राम विलास)चे १९ आमदार निवडून आले. चिराग यांनी शनिवारी पाटणा येथे या सर्व आमदारांची भेट घेतली

# जदयूच्या अवघ्या २७ तर भाजप उमेदवाराचा ९५ मतांनी विजय

## बिहारात अनेक ठिकाणी झाल्या चुरशीच्या लढती

**◆ पाटणा, १५ नोव्हेंबर**

बिहार विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी रालोआने निर्विवाद विजय मिळवत जोरदार मुसंडी मारली. रालोआने या निवडणुकीत २४३ पैकी तब्बल २०२ जागा जिंकत ऐतिहासिक विजय मिळविला. अशातच बिहारमधील संदेश, अगिआंव दोन मतदारसंघ सध्या चर्चेचा विषय ठरले आहे. संदेश मतदारसंघात जदयू उमेदवार रामचरण साह यांचा केवळ २७ मतांनी विजय झाला, तर अगिआंव मतदारसंघात भाजपाचे उमेदवार महेश पासवान यांनी केवळ ९५ मतांनी बाजी मारली. दोन्ही मतदारसंघात अगदी थोड्या फरकाने जय-पराजयाचा फैसला झाला.

बिहारमधील संदेश विधानसभा मतदारसंघात अगदी थोड्या फरकाने निकाल लागला. येथे जेदयूचे उमेदवार रामचरण साह यांनी केवळ २७ मतांनी विजय मिळवला. साह यांना ८० हजार ५९८ मते मिळाली. त्यांचे प्रतिस्पर्धी असलेले राजदचे दीपू सिंह यांना ८० हजार ५७१ मते मिळाली. जनसुराज्य पक्षाचे उमेदवार राजीव रंजन राज यांना ६०४० मते मिळाली.

याशिवाय अगिआंव मतदारसंघातही अगदी माफक फरकाने निर्णय झाला. येथे भाजपाचे उमेदवार महेश पासवान यांनी केवळ ९५ मतांनी बाजी मारली. त्यांनी सीपीआय माले पक्षाचे उमेदवार शिव रंजन यांना पराभूत केले. बलरामपूर मतदारसंघातही अटीतटीची लढत झाली. येथे एलजेपीआर पक्षाच्या संगीता देवी यांनी अवघ्या ३८९ मतांनी बाजी मारली. संगीता देवी यांनी एमआयएमचे उमेदवार मोहम्मद आदिल हुसेन यांना पराभूत केले. तर बख्तियारपूर मतदारसंघात एलजेपीआर पक्षाचे उमेदवार अरुण कुमार हे ९८१ मतांनी विजयी झाले. त्यांनी राजदचे उमेदवार अनिरुद्ध कुमार यांना पराभूत केले. याशिवाय बोधगया विधानसभा मतदारसंघात राजदचे उमेदवार कुमार सर्वजित हे ८८१ मतांनी विजयी झाले. त्यांनी एलजेपीचे उमेदवार श्यामदेव पासवान यांना पराभूत केले. ◀(वृत्तसंस्था)

### भाजपचे दोन उमेदवार थोड्याच मतांनी पराभूत

» ढाका मतदारसंघात राजदचे उमेदवार फैसल रहमान यांनी १७८ मतांनी बाजी मारली. त्यांनी भाजपाच्या पवनकुमार जैसवाल यांचा पराभव केला. याशिवाय फारबिसगंज मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार मनोज विश्वास यांनी २२१ मतांनी विजय मिळवला. त्यांनी भाजपाच्या विद्या सागर केशरी यांना पराभूत केले. ■

# बिहारात सरकार स्थापनेच्या हालचालींना सुरुवात

**◆ नवी दिल्ली, १५ नोव्हेंबर**

बिहारमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने तब्बल २०२ जागा जिंकत प्रचंड यश मिळविले आहे. आता सरकार स्थापनेच्या हालचालीना प्रारंभ झाला आहे.

बिहार विधानसभेत भाजप ८९ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. मुख्यमंत्री नितीशकुमार पुढील आठवड्यात राज्यपालांची भेट घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. संयुक्त जनता दलाचे नेते राजीव रंजन, संगजय झा आणि लल्लन सिंह दिल्लीला दाखल झाले आहेत. सरकार स्थापन करण्यासंदर्भात हे नेते भारतीय जनता पक्ष आणि संयुक्त जनता दलाच्या नेत्यांशी चर्चा करण्याची शक्यता आहे.

नितीशकुमारच पुढचे मुख्यमंत्री असतील ,हे निश्चित मानले जात आहे. शपथविधीची तारीख निश्चित करण्यासाठी दोन्ही पक्षांमध्ये चर्चा होणार आहे. शपथविधीला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पुढील आठवड्यात नितीशकुमार राज्यपालांची भेट घेऊन राजीनामा देणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यानंतर विधिमंडळ नेतेपदाच्या निवडीची औपचारिकता पूर्ण केली जाणार आहे. नितीशकुमार हे दहाव्यांदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेणार असून हा एक विक्रम मानला जात आहे. ◀(वृत्तसंस्था)

# मतांच्या खरेदीसाठी ४० हजार कोटींचा खर्च

**जन सुराज पक्षाचा रालोआवर आरोप** | **कल्याणकारी योजनांचा निधी वळवला** | **कलंकित आमदारांना मंत्रिमंडळात घेतले**

**◆ पाटणा, १५ नोव्हेंबर**

बिहार निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वीच सरकारने महिलांच्या खात्यात पैसे वळते केले, मतांच्या खरेदीसाठी ४० हजार कोटींचा खर्च करण्यात आला. त्यामुळेच रालोआतील पक्षाला ऐतिहासिक विजय मिळाला. कल्याणकारी योजनांचा निधी मतदारांना देण्यासाठी करण्यात आला, असा आरोप जन सुराज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय सिंह यांनी शनिवारी केला.

पत्रपरिषदेत बोलताना सिंह म्हणाले, मते खरेदी करण्यासाठी रालोआ सरकारने निवडणुकीपूर्वीच ४० हजार कोटी खर्च केले आणि अशाप्रकारे खर्च करून एखाद्या राज्य सरकारने हे बहुमत मिळवण्याची ही




पहिलीच वेळ आहे. जनतेच्या पैशाने लोकांची मते विकत घेतली गेली. शिक्षण, रोजगार आणि आरोग्य विभागातील निधी मतदारांना पैसे वितरित करण्यासाठी झाला. त्यात जागतिक बँकेकडून घेतलेल्या १४,००० कोटींच्या कर्जाचादेखील समावेश आहे. ही निवडणूक आम्ही उपस्थित केलेल्या मुद्यावरच झाली.

आम्ही विधानसभेत नसलो तरी एका मजबूत विरोधी पक्षाची भूमिका बजावणार आहोत. बिहारमध्ये स्थापन होणाऱ्या नवीन सरकारकडून आमची मागणी आहे की राज्यात स्वच्छ सरकार असावे आणि त्यात कलंकित आमदारांना मंत्रीपद मिळू नये. ज्या दृढनिश्चयाने जन सूराजची स्थापना केली गेली आणि परिवर्तनाचे उद्दिष्ट होते तेच कायम राहील. आम्ही सरकारच्या उणीवा उघड करत राहू. ◀(वृत्तसंस्था)

### राजदला रोखण्यासाठी रालोआकडे मते वळली

» राजद-काँग्रेस विरोधी पक्षाची भूमिका योग्यरित्या पार पाडत नव्हते. जरी आम्ही आता विधानसभेत नसलो तरी, बिहारचे लोक आता जन सुराजला एक मजबूत विरोधी पक्ष म्हणून पाहत आहे. बिहार विधानसभा निवडणुकीत जन सुराजच्या कामगिरीबद्दल सिंह म्हणाले, निकालाने आम्ही निराश आहोत, पण आत्मविश्वास कायम आहे. शेवटच्या क्षणी लोकांना वाटले की जन सुराजला मतदान केल्याने राजद पुन्हा सत्तेत येऊ शकेल, म्हणून त्यांनी त्यांची मते रालोआकडे वळवली. ■


## चित्रपट वार्ता

### दहा वर्षांनी छोट्या उद्योगपतीसोबत दिसली क्रिती

**मुंबई** : सध्याच्या हिंदी सिनेसृष्टीतील आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक असणारी क्रिती आता तिच्या वैयक्तिक जीवनावरून चर्चेत आहे. तिचे नाव प्रसिद्ध उद्योजक कबीर बहियासोबत जोडले जात आहे. अनेकदा दोघे एकत्र दिसले तरी त्यांनी नात्याविषयी उघडपणे काहीच सांगितलेले नाही. नुकतीच क्रितीने काजोल आणि ट्विंकल खन्नाच्या टॉक शोमध्ये हजेरी लावली. त्यावेळी तिला ट्विंकलने विचारले की, तुझा लेटेस्ट क्रश कोण आहे. त्यावर क्रिती लाजली आणि म्हणाली, ही अशी व्यक्ती आहे ज्याचा इंडस्ट्रीशी कोणताही संबंध नाही. मी एका व्यक्तीला पार्टीत भेटले. आमच्यासाठी बऱ्याच गोष्टी नवीन आहेत. अर्थातच, क्रितीने कबीरचे नाव घेतले नाही. मात्र, आपल्या लग्नाविषयी अफवा पसरवल्या जात आहेत, असे आवर्जून सांगितले. ■



### बाळासह घरी परतली कॅटरिना



**मुंबई** : हिंदी सिनेजगतातील लोकप्रिय जोडी कॅटरिना कैफ आणि विकी कौशल यांच्याकडे ७ नोव्हेंबरला चिमुकल्या बाळाचे आगमन झाले. सात दिवसांनंतर आता कॅटरिना बाळासह घरी परतली आहे. तिला रुग्णालयातून बाहेर पडताना पाहिले गेले. ती आपल्या बाळासह घराकडे जाण्यासाठी रवाना झाली. त्यावेळी विकीदेखील सोबत होता. याचा व्हिडीओ समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे. बाळाच्या आगमनाने कॅट आणि विकी दोघांच्याही घरी आनंदाला नुसते उधाण आले आहे. विकीचे वडील शाम कौशल आणि भाऊ सनी कौशलनेही समाज माध्यमांवर आपला आनंद व्यक्त केला. ■

### पापाराझींवर पुन्हा संतापल्या जया बच्चन



**मुंबई** : ज्येष्ठ अभिनेत्री जया बच्चन पुन्हा एकदा पापाराझींवर संतापल्या आहेत. त्यांनी त्यांना जाहीरपणे फटकारले आणि असभ्य वर्तन करू नका, असा इशारा दिला. फॅशन डिझायनर्स अबू जानी आणि संदीप खोसला यांनी आयोजित केलेल्या फॅशन इव्हेंटमध्ये जया बच्चन सहभागी झाल्या होत्या. त्यांची मुलगी श्वेता नंदा देखील उपस्थित होती. या इव्हेंटमधील त्यांचा एक व्हिडीओ समोर आला आहे ज्यामध्ये त्या डिझायनर अबू जानीसोबत रॅम्पवर चालणाऱ्या तब्बूला उभे राहून टाळ्या वाजवत असल्याचे दिसत आहे. थोड्याच वेळात, जया बच्चन त्यांची मुलगी श्वेतासोबत एका फॅशन इव्हेंटमधून बाहेर पडताना दिसल्या. पापाराझी जवळ येताच त्या संतापल्या. जय बच्चन यांच्या संतापण्याची ही पहिली वेळ नव्हती. यापूर्वीही बरेचदा त्या कॅमेरा पाहून संतापल्या आहेत. ■

### ठाण्यात डॉक्टरचे अपहरण करून २ लाख लुटले, पाच अटकेत

**◆ ठाणे, १५ नोव्हेंबर**

कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातून एका डॉक्टरचे अपहरण करून २ लाख लुटल्याची घटना ठाणे जिल्ह्यात घडली असून याप्रकरणी पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना ८ नोव्हेंबरला सकाळी ९ वाजताच्या सुमारास घडली. आरोपी इरफान अझगर अली हा चार साथीदारांसह आला आणि स्वतःला पोलिस असल्याची थाप मारली. बनावट चलन बाळगल्याच्या आरोपाखाली अटक करण्याची धमकी दिली आणि त्याच्याजवळून तेव्हा २ लाख लुटले आणि त्यानंतर आणखी १२ लाखांची मागणी केली. सायंकाळी डॉक्टर आरोपींच्या तावडीतून निसटण्यास यशस्वी झाला आणि त्याने कळवा पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा नोंदविला असून प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे. ◀(वृत्तसंस्था)

# १६ हजार फूट उंचीवर चालवली मोनोरेल

## ● अरुणाचल प्रदेशात भारतीय लष्कराची कमाल ● आवश्यक वस्तू जलद पोहोचवता येणार

**◆ इटानगर, १५ नोव्हेंबर**

भारतीय लष्कराच्या गजराज कॉर्प्सने विकसित केलेली हाय-अल्टिट्यूड मोनोरेल अरुणाचल प्रदेशच्या खडकाळ पर्वतीय प्रदेशात, १६ हजार फूट उंचीवर चालवत कमाल केली. मोनोरेलमुळे सुरक्षा दलाला आवश्यक वस्तू जलद



पोहोचवता येणार आहे.

या प्रणालीमुळे भारतीय सैन्याला कामेंग हिमालयीन प्रदेशात अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा पोहोचवण्यास मदत होणार आहे.

रस्ते किंवा इतर वाहने उपलब्ध होवू शकत नाही अशा दुर्गम भागासाठी लष्कराच्या गजराज कॉर्प्सने मोनोरेल विकसित केली. पर्वतांमध्ये, अरुंद रस्ते, सैल खडक, खराब हवामान आणि मर्यादित ऑक्सिजनमुळे लहान अंतर देखील लांब आणि कठीण वाटते. सैनिकांना अनेकदा विविध आवश्यक वस्तू त्यांच्या पाठीवर वाहून न्याव्या लागत होत्या, त्यासाठी वेळ आणि मेहनत घ्यावी लागत होती. आता, मोनोरेलमुळे वेळ आणि मेहनत दोन्ही वाचेल आणि त्याचबरोबर धोकाही कमी होईल, अशी माहिती लष्कराच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. गजराज ही भारतीय सैन्याची चौथी कॉर्प्स आहे. त्याची स्थापना ४ ऑक्टोबर १९६२ रोजी भारत-चीन युद्धादरम्यान झाली. तिचे मुख्यालय आसाममधील तेजपूर येथे आहे. पारंपारिक युद्ध आणि बंडखोरांविरोधी कारवायांसाठी ही कॉर्प्स ओळखली जाते. या कॉर्प्समध्ये ७१ वा माउंटन डिव्हिजन, ५ वा बॉल ऑफ फायर डिव्हिजन आणि २१ वा रिअल हॉर्न डिव्हिजन यांचा समावेश आहे. ◀(वृत्तसंस्था)

### दुर्गम भागात वेळेवर होणार वस्तूंचा पुरवठा

» मोनोरेलची सुरुवात ही आव्हानात्मक भूभागांमध्ये लॉजिस्टिक कार्यक्षमता वाढवण्याच्या लष्कराच्या व्यापक प्रयत्नांचा एक भाग आहे, ज्यामुळे दुर्गम भागात तैनात असलेल्या सैन्याला वेळेवर पुरवठा आणि ऑपरेशनल सपोर्ट मिळणार आहे. स्वदेशी उपकरणांनी तयार केलेली मोनोरेल हिमालयीन सीमेवर संरक्षण तयारी मजबूत करण्यासाठी तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्णतेचा वापर करण्याच्या लष्कराच्या वचनबद्धतेला अधोरेखित करते. ■

### दळणवळणातील धोके होतील कमी

» गजराज कॉर्प्सने एक्सवर मोनोरेलचा एक व्हिडीओ शेअर केला, ज्यामध्ये त्याच्या ऑपरेशनल क्षमतांवर प्रकाश टाकण्यात आला. अरुंद पर्वतीय मार्गांवरून जड वस्तू वाहून नेणाऱ्या सैनिकांवर येणारा शारीरिक ताण आणि उंच ठिकाणावर खराब हवामान, सैल खडक आणि कमी ऑक्सिजन पातळीमुळे निर्माण होणारे लॉजिस्टिक धोके दोन्ही कमी करणे या उपक्रमाचा उद्देश आहे. मोनोरेल वाहतुकीचा वेळ लक्षणीयरीत्या कमी करेल आणि आवश्यक पुरवठा वितरणाची सुरक्षितता सुधारेल, असे गजराज कॉर्प्सच्या प्रवक्त्याने सांगितले. ■

# कचरेवाडी ब्रीजजवळ उभ्या वाहनाला ट्रकने ठोकरल्याने झाला तिहेरी अपघात

**मंगळवेढा दि. १५ नोव्हेंबर-**

मंगळवेढा-आंधळगाव मार्गावरील कचरेवाडी ब्रीजजवळ पंक्चर झालेल्या उभ्या पीकअपला भरधाव वेगात आलेल्या ट्रकने जोराची धडक दिल्याने एकजण किरकोळ जखमी होवून वाहनामधील पाच टन डाळींबीचे नुकसान होण्यास कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात ट्रक चालकाविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

जखमी फिर्यादी रऊफ शेख (रा.मालेगाव) हे १२ नोव्हेंबर रोजी रात्री ७.३० वाजता बेवनूर ता.जत येथून पिकअपमध्ये अडीच टन डाळींब घेवून सांगोलाहून सोलापूरकडे जात असताना रात्री ९.३० वाजता कचरेवाडी ब्रीजवर आल्यावर फिर्यादीच्या ओळखीचे फिरोज शेख (रा. मोमीनपुरा, नांदेड) यांची महिंद्रा पिकअप गाडी पंक्चर झाल्याने ती रोडच्या बाजूस लाईट पार्कींग करुन पंक्चर काढत असताना फिर्यादी हे मदतीकरता गेले होते. या दरम्यान सांगोल्याकडून भरधाव वेगात एक ट्रक येवून सदर चालकाने निष्काळजीपणे हयगयीने रस्त्याची परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन उभ्या पिकअपला जोराची धडक देवून फिर्यादीस दुखापत केली, पिकअपची बॉडी शो तुटून फुटून पाच टन डाळींबाचे नुकसान झाले.

### कारचालकाने ठोकरल्याने मोटर सायकलस्वाराचा मृत्यू

**मंगळवेढा दि. १५ नोव्हेंबर-**

ब्रम्हपुरी-मंगळवेढा या राष्ट्रीय महामार्गावर एका मोटरसायकलस्वारास कार चालकाने भरधाव वेगात गाडी चालवून पाठीमागून ठोकरल्याने मोटर सायकलस्वार बबुवाहन यशवंत सोनवले (वय ६0, रा.ब्रम्हपुरी) हे जागीच ठार झाले. याप्रकरणी अज्ञात इनोव्हा कार चालकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

यातील फिर्यादी किशोर सोनवले (वय-३६, रा.ब्रम्हपुरी) यांचे वडील बब्रुवाहन सोनवले हे एम.एच.१३ डी.के.३५११ होंडा शाईन मोटरसायकलवरुन मंगळवेढा येथे असलेल्या आपल्या लेकीला भेटावयास जात होते. तेव्हा, ब्रम्हपुरी हद्दीतील इंडियन पेट्रोल पंपासमोरील पाटील वस्ती जवळ भरधाव वेगात येणाऱ्या के.ए.४८ एम.४२०५ या कार गाडीच्या चालकाने निष्काळजीपणे वाहन चालवत मोटर सायकलस्वारास पाठीमागून जोराची धडक देवून त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरला. अधिक तपास पोलीस हवालदार नवले हे करीत आहेत.

# कोम्बिंग ऑपरेशन, वाहनात सापडल्या तलवारी

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा दि. १५ नोव्हेंबर-**

मरवडे-डोणज मार्गावर मंगळवेढा पोलीस कोम्बिंग ऑपरेशन दरम्यान पेट्रोलिंग करत असताना एम.एच.४५ ए.९५0१ या क्रमांकाची स्कॉप्रिओ वाहन संशयास्पदरित्या आढळून आली. त्या वाहनात तलवारी सापडल्याने तिघा जणांविरुध्द शस्त्र अधिनियमाच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

त्यांची नावे याप्रमाणे गणेश मारुती कचरे, रामभाऊ शहाजी पाटोळे (रा.मेंढापूर, ता.पंढरपूर), शिवदास उत्तम सोनवले (रा.साखरी जि.धुळे). स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली डीवायएसी डॉ.बसवराज शिवपुजे, पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगड्डे, पोलीस नाईक ईश्वर दुधाळ, पोलीस उपनिरीक्षक विजय पिसे, पोलीस हेडकॉनस्टेबल श्रीमंत पवार, चालक पोलीस हवालदार चौधरी आदींच्या पथकांद्वारे कोम्बिंग ऑपरेशन व नाकाबंदी करण्यात येत आहे. मरवडे ते डोणज मार्गावर शनिवार, दि.१५ नोव्हेंबर २०२५ रोजी कोम्बिंग ऑपरेशनप्रसंगी चौधरी वस्ती जवळ समोरुन पांढऱ्या रंगाची चारचाकी स्कॉर्पिओ वाहन संशयितरित्या येत असल्याचे दिसून आले. तेव्हा, पोलिसांनी त्या वाहनास थांबवून चौकशी केली असता उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. त्यामुळे पोलिसांचा संशय बळावल्याने वाहनाची कसून तपासणी केली असता तीत एक तलवार आढळून आले. पोलिसांनी सदर तिन्ही इसमांना ताब्यात घेवून २ लाख ५0 हजार रुपये किंमतीच्या गाडीसह मुद्देमाल जप्त केला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## रोखठोक

दिनेश गुणे

# राजा आणि त्याचा लाडका पोपट!

मौखिक किंवा लिखित साहित्य हे सहसा कालसुसंगत असते असे म्हणतात. त्या त्या सांगितल्या, लिहिल्या जाणाऱ्या साहित्यात त्या त्या काळातील वर्तमानाचे प्रतिबिंब असते, असे बहुधा दिसते. पण ते संपूर्ण खरे नाही. गेल्या अनेक दशकांपासून सांगितल्या गेलेल्या लोककथा, पुराणकथांमधील भाष्य कालातीत असते, असेही अनेकदा दिसून येते. हे साहित्य भूतकाळात जन्माला आलेले असले, तरी वर्तमानकाळाचेही प्रतिबिंब त्यामध्ये उमटलेले आढळते. इतकेच नव्हे, तर भविष्यकाळातही हे साहित्य तितकेच कालसुसंगत ठरेल याची साक्षदेखील पटून जाते. त्यामुळेच, वर्तमानकाळात जेव्हा काही घटना घडतात, तेव्हा भूतकाळात जन्माला आलेल्या त्या कालातीत साहित्यातील साम्यस्थळे जिवंत होतात, त्यातील ताजेपणा जसाच्या तसा जाणवू लागतो आणि हे साहित्य अजरामर का असते याची उत्तरेही सापडतात. उदाहरणादाखल, 'राजा आणि त्याचा लाडका पोपट' नावाच्या एका अजरामर गोष्टीकडे पाहता येईल. ती गोष्ट आपल्या पुढच्या पिढीला सांगितली नाही अशी पिढी सापडणार नाही आणि वडिलधाऱ्यांकडून ती गोष्ट ऐकली नाही, अशी नवी पिढीदेखील अभावानेच आढळेल. जसे लाकूडतोड्या आणि त्याची कुऱ्हाड ही गोष्ट कालातीत आहे, तितकीच राजा आणि त्याचा लाडका पोपट ही गोष्टदेखील कालातीत आहे. वर्तमानात या गोष्टीच्या कालातीततेचे दर्शन घडविणारे काही प्रसंग आसपास घडतात, तेव्हा ती गोष्ट प्रकर्षाने आठवते.

या गोष्टीतील एका राजाच्या पदरी अनेक सेवक होते, नोकर होते, चाकर होते, सरदार, मनसबदार होते, खबरे आणि हुजरे तसेच काही सल्लागारदेखील होते. त्यांच्या बळावरच राजा कारभार हाकत असे. त्यामुळे त्याला कदाचित स्वतःच्या बुद्धीमधील कमतरतेची जाणीवदेखील झाली नव्हती. हा राजा एकदा आपल्या लवाजम्यासह जंगलात शिकारीसाठी गेला असताना, त्याला एका झाडावरील घरट्यात पोपटाचे एक पिल्लू दिसले. घरट्यात एकटेच बसलेले ते पिल्लू कुतूहलाने राजाकडेच पाहात होते. राजा त्या पिल्लाजवळ गेला आणि त्याने त्यास पंजात पकडले. ते पिल्लूदेखील जराही न घाबरता राजाच्या पंजावर बसून राजाकडे पाहू लागले. त्या पिल्लास सोबत घेऊन तो राजवाड्यात आला. तेव्हापासून राजाच्या त्या लाडक्या पोपटाच्या सरबराईचे नवे काम त्याच्या नोकरचाकरांपासून सरदार, मनसबदारांपर्यंत सर्वांनी अंगावर घेतले. राजाच्या लाडक्या पोपटास काहीही कमी पडू नये, यासाठी सारेजण डोळ्यात तेल घालून त्याची काळजी घेऊ लागले. अशा, चहुबाजूंनी होणाऱ्या कोडकौतुकात तो पोपट दिवसागणिक वाढत होता. मात्र, एके दिवशी अचानक काहीतरी बिघडले. राजाचा तो लाडका पोपट आजारी पडला आणि राजसेवकांमध्ये घबराट पसरली. राजाच्या पोपटास काही झाले तर आपली धडगत नाही, या भीतीने राजाचे सारे दरबारी पोपटाच्या सेवेत दाखल झाले. त्याच्या उपचारासाठी नामांकित जाणकार वैद्यांचा ताफाही दाखल झाला. पण पोपटास गुण येत नव्हता. तो खंगतच चालला आणि एके दिवशी, त्याने मान टाकली. पंख पसरलेला, पाठीवर पहुडलेला आणि डोळे मात्र सताड उघडे असलेला तो निष्प्राण देह पिंजऱ्यात पाहून राजाला काळजी वाटू लागली. त्याने सेवकांस फैलावर घेण्यास सुरुवात केली, पण पोपट मेला आहे हे सांगण्याचे धैर्य कोणातच नव्हते. प्रत्येक गोष्टीसाठी अन्यांवर अवलंबून असलेल्या राजासही पोपटाच्या या अवस्थेस काय म्हणावे माहीत नव्हते. त्यामुळे, सेवकांनी वेगवेगळी कारणे सांगण्यास सुरुवात केली, पण पोपट मेला आहे हे सांगणे मात्र प्रत्येक जण टाळतच होता. अखेर त्याच गावातील एका लहान मुलाने पिंजऱ्यातल्या त्या निष्प्राण देहाकडे पाहिले आणि तो ओरडला, ''राजा, तुझा पोपट मेला आहे!''

बिहारमधील विधानसभा निवडणुकांचे ताजे निकाल आणि त्यानंतरचे राजकारण पाहता, मेलेल्या पोपटाची ती गोष्ट आठवणे अपरिहार्य ठरते. वारसा हक्कामुळे कौटुंबिक युवराजपद प्राप्त झालेला आपला नेता आता वेळ घालविण्याचे साधन म्हणून काँग्रेस नावाच्या कौटुंबिक पाळीव पोपटासोबत मन मानेल तसे, मनाला येईल तेव्हा खेळतो, त्याला आपल्या मर्जीनुसार खेळवतो हे आता त्याच्या मनसबदारांस जाणवू लागले आहे. अशा प्रत्येक खेळात त्या पोपटाची मात्र नाहक दमछाक होत आहे, हेही अनेकांनी ओळखले आहे. तरीही, पंख कापलेल्या, उडण्याची ताकद नसलेल्या आणि भरारी घेण्याचे विसरून गेलेल्या त्या पोपटाची सरबराई करण्यासाठी युवराजांचे सरदार, मनसबदार, खबरे, हुजरे, नोकरचाकर सदैव धडपडत असतात. युवराजांची मर्जी सांभाळण्यासाठी सारे जण पोपटाची काळजी घेत असतात. पण सततच्या खेळामुळे या पोपटाची प्रकृती दिवसेंदिवस बिघडतच आहे. सरदार, मनसबदारांस हे कळूनही, ते युवराजास सांगण्याचा धीर मात्र कोणासही होतच नव्हता. बिहारच्या निवडणूक निकालानंतर मात्र, युवराजाने खेळणे म्हणून वापरलेला त्याचा लाडका पोपट आता अंथरूणाला खिळला आहे, हे अनेक जाणत्यांना जाणवले. तरीही ते युवराजास स्पष्टपणे सांगण्याची हिंमत मात्र अजूनही कोणास झालेली नाही. युवराजाचा हा पोपट मेला आहे की मरणपंथास लागला आहे याविषयीही अनेकांच्या मनात शंका आहे. काही जणांस तो मरणपंथास लागल्यासारखे वाटते, तर पोपटाची सध्याची अवस्था मरणावस्थेहून वेगळी नाही, असे काहींना वाटू लागले आहे. यापैकी कोणत्याही अवस्थेविषयी युवराजास मात्र फारसे काही माहीतच नसल्याने, पोपटास काही झाले आहे यावर त्याचा विश्वास नाही. गेल्या काही महिन्यांपासून युवराज वेगळ्याच मोहिमेत गर्क होते. त्यांनी लवाजम्यासह प्रचाराच्या निमित्ताने पर्यटनाच्या मोहिमा आखल्या. गावोगावी जाऊन लोकांसोबत मौजमजाही केली. झोपडीत राहणाऱ्या कुटुंबाचे जगणे कसे असते ते युवराजांस कळावे याकरिता सरदार, मनसबदार, हुजऱ्यांनी



युवराजांसमवेत या कुटुंबांचे भोजन आयोजित केले. पायात बूट घालून जमिनीवर जेवायला बसलेल्या युवाराजांची छबी माध्यमांमध्ये झळकली आणि युवराजांचे सामान्यांच्या जगण्याशी कसे नाते आहे, हे लोकांसमोर मांडण्याची हुजऱ्यांची स्पर्धा सुरू झाली. एका नदीच्या पात्रात, आजूबाजूला कमरेएवढ्या खोल पाण्यात युवराजांनी पोहण्याचा आनंदही लुटला, मखाण्याची शेतीही पाहिली. बटाटे झाडावर लागतात की मुळाशी लागतात हे युवराजांस माहीत नव्हते. ते त्यांना प्रत्यक्ष पाहता यावे यासाठी हुजऱ्यांनी शेती पर्यटनाचा कार्यक्रमही आखला, याच प्रचार पर्यटनात युवराजांनी एका हलवायाच्या मुदपाकखान्यात जाऊन चक्क जिलेबीदेखील तळली. अशा तऱ्हेने, निवडणुकीच्या निमित्ताने युवराजांनी प्रचार पर्यटनाचा आनंद मनसोक्त लुटला आणि हा पोपट निवडणुकीच्या रिंगणात पणास लावला.

युवराजांनी मनसोक्त खेळविलेला हा पोपट आता मरणपंथास लागला असून वेळीच योग्य उपचार केले नाहीत तर तो तगदेखील धरणार नाही, हे आता निवडणुकीच्या निमित्ताने स्पष्ट झाले आहे. बिहारच्या निवडणुकीत काँग्रेसची धूळधाण झाली आणि गेल्या दहा वर्षांत सातत्याने सुरू असलेल्या पराभवांच्या मालिकांमधील सर्वांत मोठ्या नामुष्कीची वेळ या पक्षावर आली. गांधी घराण्याचे युवराज म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते, त्या राहुल गांधी यांनी या पक्षाला पोपटाप्रमाणे खेळणे म्हणून वापरले, याची जाणीव आता त्यांच्यासोबतच्या अनेकांस होऊ लागली आहे. बिहारच्या ताज्या निवडणुकीआधी राहुल गांधी यांनी केंद्रातील मोदी सरकारच्या विरोधात मतचोरीच्या आरोपावरून उघडलेली प्रतिमाभंजनाची मोहीम राबविण्यासाठी याच पोपटास खेळविले गेले होते. गेल्या दहा वर्षांत देशात झालेल्या प्रत्येक निवडणुकीत राहुल गांधींनी काँग्रेसचा हा पोपट आपल्या मर्जीनुसार खेळविला आणि त्या प्रत्येक खेळात पराभव पदरी पडल्यावर पोपटाची अवस्था दिवसागणिक केविलवाणी होऊ लागली. आजही काँग्रेस नावाच्या या पोपटावर प्रजेचे प्रेम आहे, अशा समजुतीतून बिहारमध्ये भाजपविरोधी पक्षांनी काँग्रेससोबत महागठबंधन नावाचा प्रयोग पुन्हा एकदा केला आणि त्यांना सत्तेची स्वप्नेदेखील पडू लागली. प्रत्यक्षात मात्र, मतदारांनी झिडकारल्यामुळे बिहारमध्ये काँग्रेसची वाताहत तर झालीच, पण त्यासोबत महागठबंधन या नावाने एकत्र बांधल्या गेलेल्या पक्षांचे तारूदेखील पुरते बुडून गेले आहे. निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर, काँग्रेस हा राहुल गांधींचा लाडका पोपट मरणपंथास लागल्याची जाणीव महागठबंधनास होऊ लागली आहे आणि तसे सांगण्याची हीच वेळ आहे, हेही जाणवू लागले आहे. राहुल गांधींच्या वोट चोरीच्या खेळात सहभागी होऊन फसगत झाल्याची जाणीवही महागठबंधनातील अनेक भागीदारांस झाली असेल, पण आता त्यातून माघार घेण्याची वेळ निघून गेली आहे. परतीचे सारे दोर कापल्यामुळे तलवारबाजी करत राहणे भाग आहे, पण ही तलवारबाजी हवेतच आहे, हेही आता या भागीदारांनी ओळखले आहे. जे मतदारास अगोदरच कळले आहे, ते कळण्यासाठी महागठबंधनाच्या भागीदारांस निवडणूक निकालांपर्यंत थांबावे लागले, हा बिहार निवडणुकांचा स्पष्ट अर्थ आहे. म्हणूनच, आता जेव्हा निकालांचे विश्लेषण केले जाईल, तेव्हा महागठबंधनातील भागीदारांमध्ये पराजयाचे खापर फोडण्याची स्पर्धा सुरू होईल. काँग्रेससोबत गेल्याने पराभव पाहावा लागला हे स्पष्ट असूनही, तसे उघडपणे मान्य करणे या भागीदारांस राजकीयदृष्ट्या सोयीचे नसल्याने, महागठबंधनातून काढता पाय घेण्याच्या संधीचा शोध आता सुरू होणार आहे. ज्या पक्षांना काँग्रेसच्या आधाराखेरीज तग धरण्याची शाश्वती नव्हती, असे पक्षदेखील आता भविष्यातील निवडणुकांत काँग्रेसचा हात धरण्यासाठी फारसे उत्सुक राहतील अशी शक्यता आता धूसर होत चालली आहे.

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता तोंडावर आल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपने राज्यात मजबूत संघटना बांधली आहे. एकनाथ शिंदे यांची शिवसेना व अजित पवार यांच्या राष्ट्रवादीसह सत्तेवर असलेल्या महायुतीला आव्हान देण्यासाठी महाविकास आघाडीला पर्याय नाही याची जाणीव झालेल्या विरोधकांमध्ये बिहारच्या निकालांनंतर चलबिचल सुरू झाली आहे. उद्धव ठाकरे यांच्या गटासोबत युती करावी किंवा नाही याबाबत काँग्रेसची मनस्थिती द्विधा झाली आहे, तर राज ठाकरे यांच्या मनसेला सोबत घेतल्याखेरीज निवडणुकीच्या रिंगणात उतरणे अवघड असल्याची जाणीव उद्धव ठाकरे गटास झाली आहे. शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष निवडणुकांचे वारे पाहून कोणत्याही तडजोडीचे सारे मार्ग खुले ठेवण्याचे राजकारण करत असतो. तीच भूमिका या निवडणुकीत राहिली तर महाविकास आघाडीतील त्यांच्या भागीदारीचे भवितव्य अनिश्चितच राहील असे बोलले जाते. बिहारच्या निवडणुकीत काँग्रेसचे पानिपत झाल्यावर आता महाराष्ट्रात पुन्हा काँग्रेससोबत युतीची गाठ बांधण्यास आघाडीतील कोणतेच पक्ष फारसे उत्सुक नाहीत याचे संकेत आताच मिळू लागले आहेत. उद्धव ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी बिहार निवडणुकांच्या निकालानंतर लगेचच केलेल्या विश्लेषणातून काँग्रेसला थेट लक्ष्य केले आहे. बिहारच्या पराभवाचे सारे खापर काँग्रेसच्या माथ्यावर मारण्याचा पहिला मान त्यांनी मिळविला आहे. त्यामुळे, राहुल गांधींच्या व्होट चोरी मोहिमेचा कोणताच प्रभाव निवडणुकीच्या राजकारणावर राहणार नाही, हेही स्पष्ट झाले आहे. व्होट चोरी ही काल्पनिक बाब असून आजवर सादरीकरणातून ते सिद्ध करण्यात राहुल गांधीदेखील यशस्वी झालेले नाहीत, ही बाब जनतेने ओळखली आहे. त्यामुळेच, बिहार निवडणुकीतील रालोआच्या विजयावर प्रश्नचिन्ह उमटवून नवे फेक नॅरेटिव्ह निर्माण करण्याचा एक नवा प्रयत्न हताश विरोधकांकडून सुरू झाल्याचे दिसू लागले आहे. बिहारच्या निवडणुकीत तेजस्वी यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलास मिळालेल्या मतांची बेरीज एक कोटी १५ लाख ४६ हजार ५५ एवढी आहे. टक्केवारीच्या तुलनेत, या पक्षास राज्यात सर्वाधिक म्हणजे २३ टक्के मते मिळाली असतानाही केवळ २५ जागांवर विजय मिळाल्याने, याच मुद्याचे भांडवल करून जनतेमध्ये संभ्रम पसरविण्याचा प्रयत्न महागठबंधनच्या समर्थकांकडून सुरू असल्याचे दिसते. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे ८९ उमेदवार विजयी झाले, तर भाजपप्रणीत रालोआचा घटक पक्ष असलेल्या संयुक्त जनता दलाचे ८५ उमेदवार विजयी झाले आहेत. भाजपला मिळालेल्या मतांची एकत्रित संख्या एक कोटी ८१ हजार १४३ एवढी, म्हणजे २०.०८ टक्के एवढी, तर संयुक्त जनता दलास एकूण ९६.६७ लाख (१९.२५ टक्के) मते मिळूनही या पक्षाचे ८५ उमेदवार विजयी झाले आहेत.

नेमक्या याच आकडेवारीवर बोट ठेवून सर्वाधिक मते मिळविणाऱ्या राजदचा पराभव कसा झाला असा सवाल महागठबंधनच्या समर्थकांकडून उपस्थित केला जातो. प्रत्यक्षात, ही आकडेवारी आणि टक्केवारी संपूर्ण राज्यातील मतदानाची असून प्रत्येक मतदारसंघातील वास्तव वेगळे असते, हे लपवून मतदारांमध्ये संभ्रम पसरवण्याचा नवा प्रयत्न सुरू झाला आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील मतदानाची एकत्रित टक्केवारी पाहिल्यास नेमके हेच चित्र पाहावयास मिळते. त्या निवडणुकीत भाजपला सर्वाधिक म्हणजे २६.१८ टक्के एकत्रित मते मिळाली होती व केवळ ९ जागांवर विजय मिळाला होता. याउलट, काँग्रेसला १६.९२ टक्के एकत्रित मते मिळूनही १३ जागांवर काँग्रेसचा विजय झाला होता. ठाकरे गटाच्या मतांची एकत्रित टक्केवारी १६.७२ असताना, या पक्षाने विजय मिळविलेल्या जागांची संख्या भाजपएवढीच म्हणजे नऊ इतकी होती, तर आठ जागांवर विजयी झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटास केवळ १०.२७ टक्के एकत्रित मते मिळाली होती. त्यामुळे मतांच्या टक्केवारीवरून संभ्रम माजवून सुरू झालेल्या नव्या अपप्रचाराच्या गदारोळात पोपटाचा जीवच धोक्यात आहे, याचाच विसर पडला तर तीच गोष्ट भविष्यातही तितकीच ताजी राहील यात शंका नाही. ▮

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा

मानवी चंचल मनाची मोठी गंमत आहे. मनाला अगाध शक्ती असल्याने क्षणाचाही विलंब न लागता ते कुठेही भरकटते. भ्रम तर हा मनाचा भाव आहे. भौतिक सुखाच्या कल्पनेने परिसीमा गाठली असल्याने मनावर नियंत्रण ठेवणे हे महत् कठीण कर्म होत आहे. सद्बुद्धीचा अभाव असला तर भ्रमाचा प्रभाव वरचढ होऊन फलित निष्पन्न होत नाही पर्यायाने परिणाम विपरीतच होतात.

**ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा**
**काय भुललासी वरलिया रंगा**


उपरोक्त ओळीतून संत तुकाराम महाराज हाच उपदेश करीत आहेत. ऊस हा डोंगा म्हणजे, वाकडा-तिकडा, गाठी-गाठीचा, करड्या रंगाचा असतो. उसाचे बाह्यरूप इतर फळांसारखे रंगीत, आकर्षक नसल्याने माधुर्य आणि पौष्टिक असलेल्या उसाकडे लक्ष जात नाही. इतर फळांसारखे कोणी सहज घेत नाही. त्यापासून निर्माण होणाऱ्या पदार्थांचा भरपूर वापर होतो. उसाच्या बाह्य रूपामुळे आकर्षित न झाल्याने त्यातील गुणांचा लाभ होत नसल्याने संतांनी या फळाची समर्पक उपमा दिली आहे. कारण मानवीय मनाची बैठक ही बाह्यरूप, रंग, आकार याकडे आकर्षित होणारी असते. भ्रम हा मनाच्या मदतीला येऊन त्यास अधिक गोंधळून टाकतो. परिणामी काळ, वेळ, श्रम आणि धननाश झाल्याने पश्चात्ताप होऊन मन भानावर येते.

प्रापंचिक जीवनात असे अनेक अनुभव येतात. मन चंचल असेल तर द्वंद्व स्थिती निर्माण होऊन पदरात निराशा पडते. साद्यंत स्थिती अशीच आहे. आधुनिक तंत्रज्ञानात होत असलेल्या संशोधनाने जगात भ्रम निर्माण होत आहे. माकडाच्या हाती कोलीतप्रमाणे समाज माध्यमातून नवनवीन दुष्परिणाम होत असून अनेक त्याचे बळी पडत आहेत. या मायाजालावर नियंत्रण प्राप्त करणे दुरापास्त आहे. वस्त्रे-प्रावरणे, आरोग्य, शिक्षण, मनोरंजन क्षेत्रात भुरळ पाडणारे पावलागणिक प्रसंग येत आहेत.

आपल्या सर्व संतानी या भ्रम, मायाजालची सत्यता पडताळून उपदेश करून आपणास भानावर आणण्यासाठी आयुष्य खर्ची घातले. एखाद्या व्यक्तीच्या बाह्यरूपावरून (रंग, रूप, वेशभूषा, भाषा) त्याचे विश्लेषण करणे म्हणजे त्या व्यक्तीचे आकलन होऊ नये. त्याचे अंतर्मनातील भाव, सद्गुण कळण्यासाठी वरलिया रंग रुपी मायेचा पडदा दूर करून, विवेकबुद्धीने विश्लेषण होणे महत्त्वाचे ठरते. या विरुद्ध आकर्षक व्यक्तीच्या रंग, रूप, शिक्षण, बोली यावरून फसगत होण्याची संभावना अधिक असू शकते. यातून नैराश्य, बुद्धिभेद, अविश्वास, गैरसमज, धननाश इत्यादीचा सामना करावा लागतो म्हणून संत तुकाराम महाराज यांनी समर्पक ओळीत बोध केला आहे.

**संजय पाठक**/नागपूर

### हस्तलिखित : ज्ञान माध्यम



हस्तलिखित म्हणजे हाताने लिहिलेल्या कोणत्याही मजकुराला ही संज्ञा दिली जाते. पूर्वीच्या काळी टंकलेखन अस्तित्वात नव्हते. त्याचा शोध लागावयाचा होता. मुद्रण कलेचा शोध लागण्यापूर्वी ज्ञान आणि माहिती यांच्या संप्रेपणचे सर्व व्यवहार हस्तलिखिताद्वारे होत असत. हाताने लेखन करणे ही अनिवार्यता होती. हस्तलेखनासाठी भरपूर वेळ लागत असे. साधे-सोपे काम नव्हते, सहज साध्य लेखन होत नसे. हस्तलिखितासाठी प्रयास पडायचे. कागद अस्तित्वात नसताना, हस्तलिखिताचे कार्य प्रारंभ झालेले आहे. कागदाची उपलब्धी व्हावयाच्या पूर्वी ग्रंथकारांनी, लेखकांनी, साहित्य निर्मितीसाठी पपायरस चर्मपत्र, भूजपत्र, ताडपत्र व तत्सम माध्यम असणाऱ्या साधनांवर लेखन केलेले आढळते.

हस्तलिखितांमधून त्या काळच्या तत्कालीन संस्कृतीची विशेषतः व्यापार चालीरीती, कौटुंबिक जीवन, साहित्य, शासन व्यवस्था या सर्वांची सखोल, सविस्तर आणि इत्थंभूत माहिती मिळायची. हस्तलिखितांचा प्रारंभ कधी झाला हे निश्चितपणे सांगता येत नसले तरी तमिळ संघम साहित्याची हस्तलिखिते इ. स. पूर्व ४००, इ. स. पूर्व २०० या काळात लिहिली गेली असावीत असा अंदाज वर्तविला जातो. एकूण हस्तलिखितांपैकी काही साहित्यकृती नष्ट झाल्या असून काही भाग सुदैवाने उपलब्ध आहेत. उपलब्ध असलेल्या हस्तलिखित ग्रंथात धर्मशास्त्र, न्यायशास्त्र, वास्तुशास्त्र, शिल्पकला, तंत्रज्ञान इत्यादी विषयांवर विद्वानांनी लिहिलेली हस्तलिखिते उपलब्ध आहेत. त्यात अक्षर रूपातील हस्तलिखिते तर आहेतच. काही हस्तलिखितांमध्ये मात्र सचित्र पोथ्या उपलब्ध आहेत. काही हस्तलिखितांवर ग्रंथकारांचे नाव लिहिलेले असते. परंतु काही ग्रंथांवर त्या ग्रंथकाराचे नाव, रचनाकार यांचा निर्देश नसल्याचे दिसून येते. त्यांच्या साहित्याखाली रचनाकार अज्ञात म्हणून लिहिले जाते.

हस्तलिखितांमुळे त्या काळातील संस्कृतीचा परिचय होतो. प्राचीन संस्कृतीचे संदर्भ मिळतात. पूर्वी ऋषी, मुनी, संत यांनी अनेक विषयांवर लेखन केलेले आहे. जसे - धार्मिक, आध्यात्मिक सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजनैतिक आदि समस्त प्रकारावर हस्तलिखितांद्वारे प्रकाश टाकला आहे. या हस्तलिखित साहित्याचा फार मोठा लाभ पुढील पिढीला प्राप्त होतो. हस्तलिखितांपासूनच साहित्य निर्मिती सुरुवात झालेली आढळते. गीता, ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, दासबोध इत्यादी धर्मग्रंथ हस्तलिखित रूपात लिहिले गेले आहे.

मध्ययुगात तवारिखा, बखरी, सनदा, कैफियती तह इत्यादींची हस्तलिखित कागदपत्रे ही ऐतिहासिक साधने म्हणून उपयुक्त ठरली. छत्रपती शिवाजी महाराज आणि राजा जयसिंह यामधील पुरंदरच्या तहाचा ताडपत्रावरील हस्तलिखित तहनामा सात किलोमीटर लांबीचा असून तो बिकानेरच्या पुरातत्त्व संग्रहालयात आहे. मुद्रण कलेचा शोध लागल्यावरही शेकडो वर्षे हस्तलिखिते नकलून घेण्याची पद्धत अव्याहत सुरू आहे. हस्तलिखिताचे धार्मिक, सामाजिक, ऐतिहासिक व राजकीय मूल्ये वादातीत आहे.

विज्ञान युगात सर्वच क्षेत्रात बदल झाला. इंटरनेट, मोबाईल, संगणक या सर्व माध्यमांद्वारे व्यवहार व्हावयास लागले. विनासायास, कमी वेळात काम करणारी यंत्रसामुग्री आली मुद्रणकलेतही परिवर्तन झाले. या सर्व पृष्ठभूमीवर हस्तलिखितांचा विचार केल्यास, हस्तलिखितांचे प्रमाण कमी झाले मात्र ते संपुष्टात आले नाही. हस्तलिखिते ही निरंतर चालणारी कला आहे. हस्तलिखिते म्हणजे साहित्य क्षेत्रातील अमूल्य ठेवा होय.

**मंजूषा शिनखेडे**/९०९६४९९७९७

### क्रांती की विकृती..!

आज एआयने प्रत्येकाच्या घरात आणि मनात प्रचंड धुमाकूळ घातला आहे. तरुणाई काय, महिला काय याचा गैरवापर करत आहेत. आर्टिफिशियल इंटेलिजन्स ही एक क्रांती आहे की विकृती हा एक मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे एक आव्हान जगाच्या पातळीवर जाणवू लागल्यानंतर सत्य काय असत्य काय आणि ही विकृती कशी आहे यावर मानसशास्त्रीय संशोधन सुरू आहे. आज फेसबुकवर या एआयने धुमाकूळ घातला आहे. रील्सच्या माध्यमातून कधी दहशत वाढणारे तर कधी अत्यंत दुर्लक्षित करण्यायोग्य असणारे भाग घातले जातात जे अतिशय घातक आहे. सर्वसामान्य लोकांना या नव्या माध्यमातून चुकीच्या दिशेने मार्ग मिळतो हे वास्तव आहे. नुकताच वाघाने लहान मुलावर केलेला हल्ला या बनावट रीलने दहशत पसरवली आहे. बरेचदा यामुळे सत्य परिस्थिती डावलली जाते. माणसाची ही विकृती भयावह आहे. अशा प्रकारे रील्स तयार करणे हा एक खेळ झाला आहे. याला कुठेतरी आळा घालणं गरजेचं आहे. प्रगत विज्ञान हे प्रगतिपथावर घेऊन जाते, पण त्याचा गैरवापर मात्र अधोगतीला घेऊन जाते याचा विचार करण्याची वेळ आली आहे. दुष्ट मने एआयमुळे अकारण भीतीचे वातावरण समाजात निर्माण करत आहे. मानवी मेंदू अतिशय तल्लख आहे. त्याची निर्मिती हे एक आश्चर्य आहे हे मान्य करावेच लागेल पण याच मेंदूच्या आणि विज्ञानाच्या माध्यमातून अनुचित काही घडू नये इतकेच अपेक्षित आहे.

**संगीता वाईकर**/नागपूर

### छत्रपतीनगरवासीयांची सर्व बाजूंनी कोंडी

नागपूर शहरात गेल्या काही वर्षांपासून सर्वत्र विकासकामे होत आहे. विकासकामाला नागरिकांचा विरोध नाही पण ज्या प्रकारे ती होत आहे त्यामुळे लोक त्रस्त झाले आहेत ही वस्तुस्थिती आहे. सिमेंट रोड बनविले. त्याच्या बाजूला काँक्रिट ब्लॉक बसविले गेले पण हे करताना इतर विभागाचा समन्वय नसल्याने कधी इलेक्ट्रिक केबलकरिता रस्ते तोडले जातात तर कधी पाण्याची पाईप लाईन टाकण्यासाठी तर कधी पावसाचे पाणी वाहण्यासाठी पाईप टाकण्याकरिता रस्ते फोडले जातात. सर्वत्र धुळीचे साम्राज्य असते. या सर्व कामामुळे ट्रॅफिक ब्लॉकेज होते हे अजून तापदायक. छत्रपती नगरमधील विविध लेआऊटमध्ये वर्धा रोडकडून जाण्यासाठी ४ मार्ग आहेत. त्यापैकी मेट्रो स्टेशन बाजूचा रस्ता सदैव बस, कार, ऑटो, तिथे असल्यामुळे दिसतच नाही. जुन्या जनता हायस्कूलच्या बाजूचा रस्ता कित्येक दिवसापासून मोठे पाईप ठेवून बंद केला आहे. रेडिसनच्या अलिकडील रस्ता सुद्धा पाण्याच्या पाईपलाईनच्या कामामुळे खराब झाला आहे. त्या रस्त्याने रात्री जाणे धोकादायक झाले आहे. दक्षिण-पूर्व भागात जो श्रीनगरकडे रेल्वे ओव्हर ब्रिज आहे त्याच्या सर्व्हिस रोडने छत्रपती नगरकडे जो रस्ता आहे तो सुद्धा नवीन बनत असलेल्या पाण्याच्या टाकीकरिता टाकलेल्या पाईपलाईनने तुटला आहे. त्यामुळे तिथे सर्वत्र खड्डे पडले आहे. रिंग रोडवरून छत्रपती नगर मध्ये ३ रस्त्यांपैकी छत्रपती सभागृहाकडून एक रस्ता छत्रपतीनगरमध्ये येतो. तो सुद्धा आज पाईपलाईनचे काम असल्याने बंद केला आहे. एकूण सर्व बाजूंनी या नगरातील लोकांची गळचेपी करण्याचा विडाच प्रशासनाने उचलला आहे असे दिसत आहे.

**मोहन द. पांडे**/नागपूर

### चांदीला सोन्यासारखी चकाकी

गेल्या काही दशकांपासून दीर्घकाळ दुर्लक्षित असलेल्या चांदीने स्टॉक मार्केटमध्ये अद्वितीय कामगिरी केल्याने सोन्याहून अधिक परतावा गुंतवणूकदारांना दिला. आर्थिक वर्ष २०२५ मधील सर्वांत फायदेशीर गुंतवणूक म्हणून ती उदयास आली आहे. चांदीच्या ईटीएफने या कॅलेंडर वर्षात सरासरी १०२ टक्के परतावा देऊन गुंतवणूकदारांचे पैसे दुप्पट केले आहेत. मागणी आणि पुरवठ्याच्या कमतरतेच्या वादळात अडकलेल्या चांदीने



सर्व विक्रम मोडले आहेत आणि अलिकडेच स्टॉक मार्केटमध्ये १.८ लाख रुपयांच्या जवळपास व्यवहार केला आहे. विश्लेषकांनी दीर्घकालीन लक्ष्य प्रतिकिलो दोन लाख रुपये इतके उच्च असल्याचे भाकीत केले आहे. विविध विश्लेषकांच्या अंदाजानुसार, भारतातील चांदीच्या एक्स्चेंज -ट्रेडेड फंड प्रचंड मोठा परतावा देणारे ठरले आहेत. ज्यामुळे इकर्मी गुंतवणूक झाली आहे आणि ते लक्षवेधी परतावा देतही आहेत. परंतु तज्ज्ञांचा असा इशारा आहे की ही वाढ स्वतःहून पुढे जात आहे.

जागतिक चांदीच्या किमती प्रति औंस ५० पर्यंत वेगाने वाढल्या आहेत. चार दशकांहून अधिक काळातील सर्वोच्च पातळीवर भारतातील चांदी पोहोचली असून चांदीच्या गुंतवणूकदारांना ईटीएफसाठी परतावा वाढवत आहेत. एका प्रकाशनातील अहवालानुसार, भारतातील अनेक चांदीच्या ईटीएफ आता त्यांच्या सूचक निव्वळ मालमत्तेच्या मूल्यापेक्षा लक्षणीय प्रीमियमवर व्यवहार करत आहेत. म्हणजेच गुंतवणूकदार मूळ चांदीच्या वास्तविक मूल्यापेक्षा जास्त पैसे देत आहेत. हे एक लक्षण आहे की मागणी पुरवठ्यापेक्षा खूपच जास्त आहे. विशेषतः चांदीच्या ईटीएफ त्यांच्या युनिट्सना भौतिक चांदीने परत करतात, जे घट्ट जागतिक पुरवठा साखळींमध्ये मिळवणे कठीण झाले आहे. एका आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमांनी दिलेल्या चांदीच्या ईटीएफमध्ये ८६०३ कोटी रुपयांचा ओघ आला होता. जो गेल्या वर्षीच्या एकूण ओघापेक्षा जास्त आहे. आणखी एका प्रसारमाध्यमाने दिलेल्या माहितीनुसार काही चांदीच्या ईटीएफने या वर्षी आतापर्यंत पन्नास ते पंचावन्न टक्के एवढा परतावा दिला आहे, जो सोने आणि इक्विटी बेंचमार्कपेक्षा खूपच जास्त आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### मोदी नाम केवलम

''मोदी नाम केवलम'' ही घोषणा बिहार निवडणुकीच्या निकालांनी पुन्हा एकदा प्रतिध्वनित केली आहे. जनतेच्या मनात विश्वास, विकासाची आकांक्षा आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना यांचे प्रतीक म्हणून नरेंद्र मोदींचे नाव उभे राहिले आहे. निवडणुकीच्या निकालात रालोआला २४३ पैकी २०० पेक्षा अधिक जागा मिळाल्या. ज्यात भाजप ८९ जागांसह सर्वांत मोठा पक्ष ठरला. विरोधकांचे गड कोसळले, महागठबंधनाला अपेक्षित पाठिंबा मिळाला नाही. बिहारमध्ये पुन्हा एकदा नितीश कुमार मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेणार असले तरी, विजयाचा मुख्य आधार मोदींचे नेतृत्व आणि रालोआची एकजूट ठरली आहे. ''मोदी नाम केवलम'' ही घोषणा केवळ राजकीय विजयाची नाही, तर जनतेच्या मनातील श्रद्धेची अभिव्यक्ती आहे. विकास, स्थैर्य आणि राष्ट्रीय अभिमान यांचे प्रतीक म्हणून मोदींचे नाव बिहारच्या जनादेशातून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

**श्रीकांत भास्कर तिजारे**/९४२३३८३९६६

### इंडिया आघाडीचा बिहारमध्ये सुपडा साफ

बिहार विधानसभा निवडणुकीच्या निकालांनी मोठे राजकीय ध्रुवीकरण आणि सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या बाजूने स्पष्ट कौल दर्शवला आहे. मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड बहुमत मिळवत पुन्हा एकदा बिहारमध्ये सत्ता स्थापन केली आहे. या निवडणुकीतील सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे काँग्रेसप्रणीत इंडिया आघाडीचा झालेला दारुण पराभव, ज्याला सुपडा साफ असे संबोधले जात आहे.

मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा मुख्यमंत्री म्हणून मोठा कार्यकाळ आहे. यावेळी बिहारचे मुख्यमंत्री म्हणून ते दहाव्यांदा शपथ घेतील, जो एक विक्रम असेल. जितनराम मांझी यांचा २७४ दिवसांचा मुख्यमंत्रिपदाचा कार्यकाळ वगळता, गेल्या २० वर्षांपासून ते मुख्यमंत्री आहेत. या निवडणुकीत रालोआने एकहाती सत्ता मिळवली असून, महाआघाडीला (ज्यात काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल आणि डावे पक्ष यांचा समावेश होता) फार कमी जागांवर समाधान मानावे लागले. भाजप हा रालोआमधील सर्वांत मोठा पक्ष म्हणून उदयास आला आहे, तर जेडीयूनेही आपली ताकद कायम राखली आहे. या निकालांनी हे सिद्ध केले की बिहारच्या मतदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचा करिष्मा आणि नितीश कुमार यांच्या प्रशासनावर पुन्हा एकदा विश्वास दर्शवला आहे.

**अविनाश देशपांडे**/९४२२९५०७५०

### लाडू प्रसादातील भेसळ, भक्तांच्या श्रद्धेचा अपमान

तिरुमला तिरुपती देवस्थानातील लाडू प्रसादात भेसळयुक्त तुपाचा मोठा घोटाळा उघडकीस आल्याची बातमी अतिशय धक्कादायक आहे. मंदिरांकडे केवळ पैसा कमावण्याचे साधन म्हणून पाहण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे, ही अत्यंत चिंतेची बाब आहे. श्रद्धाळू भक्तांच्या आरोग्याशी असा खेळ करणारे कोणतेही आस्थापन असो, त्यांनी केलेली ही कृती क्षमायोग्य नाही. गेल्या पाच वर्षांपासून लाखो किलो बनावट तूप लाडूंसाठी वापरले गेले आणि ते भक्तांच्या पोटात गेले आहे. यामुळे भक्तांच्या आरोग्यावर काही गंभीर परिणाम झाले असतील, तर त्याला जबाबदार कोण? जिथे प्रसाद हा भक्तांच्या धार्मिक भावना आणि जिव्हाळ्याचा विषय असतो, तिथेच भेसळ करून श्रद्धेचा व्यापार करणाऱ्यांना कधीच माफी नसावी. हा फक्त आर्थिक घोटाळा नसून धर्माची हानी आहे.

देवस्थान व्यवस्थापनाने अशा प्रकारच्या भेसळीविरोधात कठोर पावले उचलून भविष्यातील सर्व प्रक्रिया पारदर्शक करणे गरजेचे आहे. श्रद्धा आणि आरोग्य यांचा असा अपमान कधीही सहन केला जाऊ नये.

**अनिकेत शेटे**/पुणे

## आजचे संघगीत-४४

रविवार, १६ नोव्हेंबर २०२५

### नमन करें इस मातृभूमि को

नमन करें इस मातृभूमि को, नमन करें आकाश को
बलिदानों की पृष्ठभूमि पर, निर्मित इस इतिहास को ॥धृ॥

इस धरती का कण-कण पावन, यह धरती अवतारों की है।
ऋषि-मुनियों से वन्दित धरती, धरती वेद-पुराणों की है।
मौर्यगुप्त सम्राटों की यह, विक्रम के अभियानों की है।
महावीर गौतम की धरती, धरती चैत्य विहारों की है।
नमन करें झेलम के तट को, हिममंडित कैलाश को ॥१॥

याद करें सन सत्तावन की, उस तलवार पुरानी को हम।
रोटी और कमल ने लिख दी, युग की अमिट कहानी को हम।
माय मेरा रंग दे बसंती चोला, भगतसिंह बलिदानी को हम।
खून मुझे दो आज़ादी लो, इस सुभाष की वाणी को हम।
गुरु गोविन्दसिंह की कलियों के उस, अजर अमर बलिदान को ॥२॥

आओ हम सब मिल-जुल कर यह, संगठना का मंत्र जगायें।
व्यक्ति-व्यक्ति के हृदय में, राष्ट्रभक्ति के दीप जलायें।
हिन्दू-हिन्दू सब एक संग हो, भारत माँ का मान बढायें।
अन्नपूर्णा भारतमाता, जग के सब दुख दैन्य मिटाये।
अर्पित कर दें मातृभूमि हित, तन मन धन और प्राण को ॥३॥

## महत्वाचे...

### दारुच्या नशेत आजीला मारहाण, नातवाविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

दारूच्या नशेत आजीला मारहाण करणाऱ्या नातवाविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रूक्मिणी मारुती क्षिरसागर (वय ८०, रा. आदर्श नगर, शेळगी, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून अभिषेक धनाजी पात्रे (रा. आदर्श नगर, शेळगी, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी आदर्श नगर येथे मिना धनाजी पात्रे हिच्या घरी परडा भरल्या असल्याने रुक्मिणी क्षिरसागर व त्यांची मुलगी या पात्रे यांच्या घरी गेल्या होत्या. त्यावेळी रुक्मिणी क्षिरसागर यांचा नातू अभिषेक पात्रे याने दारू पिऊन नशेत रुक्मिणी यांना तु येथे का आली म्हणून शिवीगाळ करून तु चाड्या लावते म्हणून रुक्मिणी यांना लाकडी बांबूने डाव्या पायास, गुडघ्याला मारहाण करून तुला बघून घेतो अशी धमकी दिली. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार वाघमारे पुढील तपास करीत आहेत.

### कासेगाव येथे तरुणाचा गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

कासेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथे तरुणाने गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला.सोमनाथ लहू काळे (वय २४, रा. कासेगाव) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. सोमनाथ काळे याने १५ नोव्हेंबर रोजी साडेबाराच्या सुमारास राहत्या घरात पत्र्याच्या लोखंडी अँगलला अज्ञात कारणावरून गळफास घेण्याचा प्रयत्न केला. ही बाब निदर्शनास आल्यानंतर नातेवाईकांनी सोमनाथ यास गळफासातून सोडवून उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### वीजेच्या धक्क्याने बांधकाम मजूर जखमी

**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

पंढरपूर येथे घराचे बांधकाम करताना वीजेचा धक्का लागून काम गार जखमी झाला. यशपाल मल्हार बनसोडे (वय २६, रा. पंढरपूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या कामगाराचे नाव आहे. १० नोव्हेंबर रोजी दुपारी तीनच्या सुमारास पंढरपूर येथील चव्हाण यांच्या घराचे बांधकाम करीत असता असताना एमएसईबीच्या इलेक्ट्रिक वायरला खोचून घेतल्याने विजेचा धक्का लागून बनसोडे हा पत्र्यावर पडून जखमी झाला. यामध्ये बनसोडे यांचे सर्वांग भाजून जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी भाऊ सौरभ याने सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# महाराष्ट्रातील रस्ते की मृत्युचा सापळा?

## ६ वर्षात अपघातात ९५,७२२ जणांनी गमावला जीव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर -**

पुण्यातील नवले पुलाजवळ गुरुवारी (दि. १३) भयंकर अपघात घडला. या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला. हा अपघात इतका भीषण होता, की प्रवाशांना बाहेर पडायलाही वेळ मिळाला नाही. याआधी जळगाव येथे एक कार दुभाजकाला आदळल्याने गर्भवती महिलेचा गाडीतच जळून मृत्यू झाला. असे अपघात महाराष्ट्रात रोज घडत असतात. महाराष्ट्रात गेल्या काही वर्षात रस्ते अपघातांचे प्रमाण वाढले आहे. जानेवारी २०१९ ते सप्टेंबर २०२५ या सहा वर्षांत राज्यात तब्बल ९५,७२२ लोकांचा रस्ते अपघातांत मृत्यू झाला आहे.

वाहतूक विभागाच्या आकडेवारीनुसार याच काळात २,१९,०३९ अपघात घडले असून ज्यात १,२९,६७० लोक गंभीर जखमी झाले आणि ५३,०३६ जणांना



किरकोळ दुखापत झाली आहे. हा आकडा फारच भयावह आहे. वाहतूक विभागाच्या अधिकृत आकडेवारीनुसार, या वर्षाच्या पहिल्या तिमाहीत २६,९२२ अपघात घडले असून ११,५३२ लोकांचा मृत्यू झाला आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत २६,७१९ अपघातांमध्ये ११,५७३ जणांचा मृत्यू नोंदवण्यात आला होता. या सहा वर्षांमध्ये २०२० मध्ये रस्ते अपघातांची संख्या कमी झाली. कारण या काळात कोरोनाच्या साथीमुळे वाहतुकीवर निर्बंध होते. मात्र, नंतरचे आकडे सातत्याने वाढत आहेत.

राष्ट्रीय पातळीवर २०२३ मध्ये भारतात रस्ते अपघातांत १,७२,८९० लोकांचा मृत्यू झाला. त्यात १५,३६६ मृत्यूंसह महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर होता, तर तामिळनाडू पहिल्या आणि उत्तर प्रदेश दुसऱ्या क्रमांकावर होता. राज्यातील प्रमुख शहरांमध्ये मुंबईत सर्वाधिक १, ८७८ अपघात घडले, तर नाशिक ग्रामीण जिल्हा मृत्यूच्या दृष्टीने आघाडीवर आहे, जिथे ६५६ अपघातात अनेक मृत्यू नोंदवले गेले.

तज्ज्ञांच्या मते, महामार्गावरील अपघातांचे मुख्य कारण म्हणजे कमकुवत रस्ते, रस्त्यावरील खड्डे, बेजबाबदारपणे वाहन चालवणे, चालकाचे अपुरे प्रशिक्षण आणि ओव्हरलोड वाहनांची वाहतूक. वाहतूक विभागाने अपघात कमी करण्यासाठी अनेक उपाय राबवले तरी, अपघातांचे प्रमाण अजूनही चिंताजनक आहे, त्यामुळे नागरिकांनी वाहन चालवताना अधिक सतर्क राहण्याची गरज आहे.

### सोलापूर शहरात २६ टक्के वाढ...


यावर्षी जानेवारी ते सप्टेंबर दरम्यान सोलापूर जिल्ह्यात अपघातांमध्ये २६ टक्के वाढ झाली आहे. त्यानंतर धाराशिव (२७ टक्के), वाशिम (३७ टक्के) आणि सांगली (२५ टक्के) यांचा क्रमांक आहे. मृत्यूच्या दृष्टीने बुलढाणा जिल्हात ५९ टक्के वाढ झाली आहे. सांगली (५४ टक्के), सोलापूर शहर (५० टक्के), लातूर (३३ टक्के), भंडारा (३३ टक्के), छत्रपती संभाजीनगर ग्रामीण (२९ टक्के) आणि अमरावती (२५ टक्के) यांचा उल्लेखनीय सहभाग आहे.

# मुंबई-चेन्नई सुपरफास्ट मेलला एलएचबी डबे जोडले जाणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

रेल्वेतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा लांब पल्ल्याचा रेल्वे प्रवास आता अधिक सुरक्षित आणि आरामदायी होणार आहे. मुंबई सीएसएमटी चेन्नई एग्मोर - मुंबई सीएसएमटी सुपरफास्ट मेल २२१५ ७ / २२१५ ८ या गाडीला नवीन एलएचबी अधिक डबे जोडण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे.

हे एलएचबी डबे हलके सुरक्षित आणि उच्च वेगाने स्थिर चालणारे असल्याने प्रवाशांना अधिक सुखद धक्का रहित व शांत प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. याशिवाय या डब्यांची



सुरक्षा तंत्रज्ञान आधारित असल्यामुळे अपघातांमध्ये धोका कमी होतो. या बदलामुळे मुंबई - चेन्नई मार्गावर प्रवास करणाऱ्या सोलापूरकरांना अधिक आधुनिक आरामदायी आणि सुरक्षित प्रवासाचा लाभ मिळणार आहे.

या डब्यांमध्ये एलएजीबी डबे हे स्टेनलेस स्टील पासून तयार केलेले आहेत. यात अँटी क्लाइंबिंग यंत्रणा, अग्निरोधक साहित्य, एलईडी प्रकाश व्यवस्था, पाच पिन चार्जिंग सर्किट्स, डिस्क ब्रेक, एसी टू टीअर वाढवण्यात आले. स्लीपर कोचेस घटले. दिव्यांगजन अनुकूल कोच यथावत, नवीन लगेज कम ब्रेक व्हॅन मुंबई सीएसएमटी वरून दि. १४ जानेवारी २०२६ पासून तर चेन्नई एग्मोर वरून १७ जानेवारी २०२६ पासून अंमलबजावणी होणार आहे.

# बल्करने दाबल्याने कार डिव्हायडरला धडकली; तीन लाखांचे नुकसान

## बल्करचालकाविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ नोव्हेंबर-**

जुना पूना नाका येथील घाण पाण्याच्या पुलावर बल्करचालकाने कारचालकास दाबल्याने कार डिव्हायडरला धडकून कारचे ३ लाख रुपयांचे नुकसान झाले. याप्रकरणी बल्करचालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सोमनाथ शहाजी गायकवाड (वय ३९, रा. शेळगाव, ता. बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन इरण्णा मल्लिकार्जुन चिंचोळे (रा. माशाळ, ता. अफजलपूर, जि. गुलबर्गा, कर्नाटक) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १३ नोव्हेंबर रोजी रात्री सोमनाथ गायकवाड हे एमएच १३ डीएम ४४१५ क्रमांकाची कार चालवित बार्शीकडून सोलापूरकडे येत होते. जुना पूना नाका येथील घाण पाण्याच्या पुलावर गायकवाड यांची कार आली असता केए ३२ एबी ६८२६ क्रमांकाच्या बल्करचा चालक इरण्णा चिंचोळे याने त्याच्या ताब्यातील बल्करने गायकवाड यांच्या कारला समोरून डाव्या बाजूस दाबल्याने गायकवाड यांची कार ही डिव्हायडरला धडकून जागेवरच थांबली.

या अपघातात गायकवाड यांच्या कारचे ३ लाख रुपयांचे नुकसान झाले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार ढोबळे पुढील तपास करीत आहेत.

# राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा उद्या पुण्यात मोर्चा

## आश्वासित प्रगती योजनेसह अन्य मागण्या मंजूर करा : सोलापूर जिल्ह्यातून हजारो कर्मचाऱ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर -**

राज्यातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या मागण्या तत्काळ मान्य कराव्या या मागणीसाठी १७ नोव्हेंबर रोजी सकाळी दहा वाजता पुण्यातील ऐतिहासिक शनिवारवाड्यापासुन शिक्षण आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे.

गेल्या अनेक वर्षापासून राज्यातील शाळांमधील शिक्षकेतर कर्मचारी न्यायाच्या प्रतीक्षेत आहे. माध्यमिक शाळातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे नवीन सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा १०/२०/३० वर्षानंतरचा लाभ तात्काळ लागू करण्यात यावा या प्रमुख मागण्यासह अन्य म गण्यासाठी हा मोर्चा काढण्यात येणार असून सोलापूर जिल्ह्यातून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा अध्यक्ष रविकांत सुर्वे, सचिव मुस्ताक शेतसंदी आणि संघटनेचे मार्गदर्शक श्रीशैल तळवार यांनी केले आहे.

**या आहेत कर्मचाऱ्यांच्या मागण्या**

माध्यमिक शाळांमध्ये शिक्षण पदासाठी पात्र असणारे शिक्षकेतर कर्मचारी यांना वेतनश्रेणी संरक्षणासह शिक्षक पदावर विनाअट पदोन्नती देण्यात यावी. चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची २४ वर्षानंतर वेतन निश्चिती एस फोर मध्ये न करता पूर्वीप्रम णे एस फाईव्ह मध्येच केली पाहिजे. माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देण्यात आलेला २४ वर्षांचा दुसरा लाभ हा राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमा णे पूर्वलक्षी प्रभावाने लागू करावा. गेल्या अनेक वर्षापासून बंद असलेली पदभरती तात्काळ सुरू करण्यात यावी. महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शाळांम ध्ये चतुर्थश्रेणी कर्मचारी यांची नियुक्ती कंत्राटी पद्धतीने न करता पूर्वीप्रमाणे नियमित वेतनश्रेणीत करण्यात यावी. माध्यमिक शाळातील वरिष्ठ लिपीक, मुख्य लिपीक, प्रयोगशाळा सहाय्यक, ग्रंथपाल अतिरिक्त झाल्यास सेवानिवृत्त होईपर्यंत वेतनास व वेतनश्रेणीस संरक्षण मिळावे. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या लिपिक, प्रयोगशाळा सहाय्यक, ग्रंथपाल, शिपाई यांच्या वेतनातील त्रुटी तात्काळ दूर करण्यात याव्यात. शिक्षकेतर कर्मचारी यांची अर्जित रजा साठवण्याची मर्यादा काढून टाकावी.

दैनिक तरुण भारतमध्ये दि. ११/११/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिर समन्समध्ये केस नं. ७९०/२५-२६ हे चुकीने प्रसिध्द करण्यात आले नव्हते. त्या चुकीची दुरुस्ती खालीलप्रमाणे

**जाहीर समन्स**

**मा. उपबिंधक, सहाकरी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी वॅक्स को. ऑप असोसिएशन लि. सोलापूर**
१३३ (अ) सिद्धेश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

**शरद नागरी सहकारी बँक लि., सोलापूर** - अर्जदार
२१८/२१९ ब, गोल्ड फिंच पेठ, लकी चौक सोलापूर
विरूद्ध
(खालील तपशिलातील नमूद केलेले थकबाकीदार सभासद) - जाब देणार

| अ. क्र. | केस नं. | दावा रक्कम | नाव देणार क्र. | नाव देणार नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ७९०/२५-२६ | १,००,६०४ | ४ | भडकुंबे शिलाबाई कुमार रा. ३७/३७, कल्याण नगर, जुळे सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या जाब देणार यांनी पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.
**उपनिर्दीष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार मंगळवार दि. २५/११/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रांसह या कार्यालयात हजर राहावे.**
या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळवर हजर न राहील्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनवणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल. आज दिनांक ०७/११/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

**सही-**
**उपनिबंधक**
सहकारी संस्था (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स
को. ऑ. असोसिएशन लि. सोलापूर

**जाहीर प्रगटन**

सोलापुर जिल्हयातील व धाराशिव जिल्हयातील तसेच तुळजापुर तालुक्यातील तमाम जनतेस सुचित करण्यात येते की , आमचे अशील १. रकान अब्दुल करीम शेख रा . खाजा नगर , गाझी मैदान , खातुन मंजील , धाराशिव ( उस्मानाबाद ) ता . जि . धाराशिव २. सुरेद्र गोविंदरराव हौसलमल रा . धाराशिव यांनी दिलेल्या माहिती व अधिकारपत्रावरून तसेच दाखवलेल्या कागदपत्रावरून खालीलप्रमाणे जाहिर प्रगटन देण्यात येत आहे. आमचे अशील रकान अब्दुल करीम शेख यांनी सुजीतसिंह उदयसिंह दिखखत रा. अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड यांचे स्वसंपादीत मालकी व कब्जेवहिवाटीची मौजे होनसळ ता . उ . सोलापुर जि . सोलापुर खरेदी प्रमाणे शेतजमीन गट नं.३३ /२/ ब पैकी दक्षिणेची जमीन ऑनलाईन ७/१२ प्रमाणे शेतजमीन गट नं.३३/५ मधील जमीन क्षेत्र ०० हे ८०.२५ आर, आकर ०० रु ६ ९ पैसे ज्याच्या चतुर्सिमा पुर्वेस- शिव रस्ता , पश्चिमेस गट नंबर ३३/२ अ ( ३३/२ ) , दक्षिणेस रस्ता, उत्तरेस - गट नंबर ३३/४ . येणेप्रमाणे चतु : सिमेच्या आतील जमीन मिळकत खरेदी घेण्याचा आमचे अशिलांनी खरेदी घेण्याचा तोंडी ठराव केलेला आहे. सदर वर नमुद जमीन मिळकतीवरती , राष्ट्रीयकृत किंवा खाजगी बँक , पतसंस्था , सोसायटी व इतर कोणत्याही शासकीय व निमशासकीय संस्थेचा कर्ज बोजा , दान , गहाण , तारण , साठेखत , करारनामा अथवा इतर कुठलाही लेखी दस्तवेज संदर्भात व मिळकतीच्या हक्क व मालकी संबंधी जर कोणाची काही हरकत किंवा तकार असेल आमचे अशिलासी आठ दिवसाच्या आत संपर्क साधावा . मुदतीत कोणाची हरकत किंवा आक्षेप आला नाही तर सदर वर नमुद जमीनीचा खरेदी व्यवहार आमचे अशील सुजीतसिंह उदयसिंह दिखखत यांच्याकडून खरेदीदस्त नोंदवुन दुय्यम निबंधक कार्यालय धाराशिव येथे पुर्ण करतील परत येणाऱ्या हरकतीचा किंवा तक्रारीचा कसलाही विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी . सबब हे जाहीर प्रगटन कोणाची फसगत होवु नये करिता देण्यात येत आहे. दिनांक- १३/११/२०२५

**जाहिर प्रगटन देणार**
**अब्दुल करीम शेख**

**सही/-**
**तर्फे ॲडव्होकेट**
**ॲड. प्रविण बन्सीलाल सुतार, धाराशिव**
**बी. एलएल.बी. जिल्हा व सत्र न्यायालय, धाराशिव**
**मो.नं. ९४२०२०१२५२**

# रेल्वेतून विनातिकीट प्रवास करणाऱ्यांकडून ६ कोटी ७२ लाखांची वसुली

## सात महिन्यांच्या काळात १ लाख ४१ हजारांचा दंड वसूल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर -**

रेल्वे प्रवास सुरक्षित, सुगम आणि आरामदायी बनवण्यासाठी रेल्वे प्रशासनाने विनातिकीट प्रवासावर नियंत्रण ठेवण्यासाठी आपल्या प्रयत्नांना अधिक वेग दिला आहे. याच अनुषंगाने, रेल्वे विभागाने विनातिकीट प्रवास करणाऱ्या फुकट्या प्रवाशांना मोठा चाप दिला आहे. यामध्ये सोलापूर विभागाने २०२५-२६ या आर्थिक वर्षातील एप्रिल ते ऑक्टोबर २०२५ या सात महिन्यांच्या काळात, १ लाख ४१ हजार अनधिकृत आणि विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून दंड म्हणून तब्बल ६ कोटी ७२ लाखाची विक्रमी वसुली करण्यात आली आहे.

प्रवाशांच्या तक्रारींवर त्वरित प्रतिसाद देण्यासाठी रेल्वे विभागाने २४७ कार्यरत असलेले एक विशेष पथक नेमले आहे. या पथकाशी संपर्क साधण्यासाठी व्हॉट्सअॅप तक्रार क्रमांक ७२०८८१९९८७ उपलब्ध करून देण्यात आला आहे. या सुविधेमुळे प्रवाशांना त्यांच्या समस्यांवर तातडीने उपाय मिळण्यास मदत



होणार आहे. सोलापूर विभागाने सुव्यवस्थित आणि सखोल तिकीट तपासणी मोहिमेद्वारे हे यश मिळवले आहे. ही कारवाई रेल्वे नेटवर्कमध्ये सुव्यवस्था राखण्यासाठी आणि महसूल वाढवण्यासाठी रेल्वे प्रशासन कटिबद्ध असल्याचे पहायला मिळत आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**यांत्रिक काम**
**निविदा सूचना क्रमांक ११-२०२५**
**दिनांक १४.११.२०२५**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने डीआरएम(एम) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर खालील काम ांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा मागवत आहे. कामाचे नाव त्याच्या परिसरासह : सोलापूर विभागातील (LHB) AC कोचम ध्ये आरएमपीयूच्या खाली FRP ट्रफच्या जागी मेटल ट्रफ (SS Drip Tray) अंमलबजावणीचे कंत्राटी काम. निविदा प्रणाली सिंगल पॅकेट सिस्टम., कामाची अंदाजे किंमत-रु.50,85,715.95/-, निविदा फॉर्मची किंमत-शून्य, निविदा फॉर्म जिथून खरेदी करता येईल त्या कार्यालयाचा पत्ता - डीआरएम (एम) कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर, जमा करावयाची रक्कम -रु.1,01,800/-, काम पूर्ण करण्याचा कालावधी - काम सुरू झाल्यापासून सहा महिने. निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ 08.12.2025 रोजी दुपारी 3.00 वाजता, निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ 08.12.2025 रोजी दुपारी 3.30 वाजता. वेबसाइट तपशील आणि सूचना फलक ठिकाण जिथे निविदेची संपूर्ण माहिती पाहता येईल - www.ireps.gov.in

SUN 91 **Sr. DME/Solapur**

टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः मौजे हिंगणगाव (बु.) व ता. परंडा, जि. धाराशिव (उस्मानाबाद) येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, अ) मिळकतीचे वर्णन डी. धाराशिव (उस्मानाबाद) सब. डी. व ता. परंडा पैकी मौजे हिंगणगाव (बु.) येथील, ता. पं. समिती परंडा व ग्राम पंचायत हिंगणगाव (बु.) हद्दीतील जमीन याचा गट नं. १५०/क, याचे एकूण क्षेत्र हे. १०- २५ आर., याचा आकार रुपये ०२ १४ पैसे आहे, यापैकी पूर्व बाजूकडील बार्शी शिव रस्त्यास लगत जिरायत जमीन याचे क्षेत्र हे. ०१- ९८ आर याचा आकार रु. ००-४२ पैसे अशी जिरायत जमीन.. यासी चतुःसीमा पूर्वेसः शिव रस्ता बार्शी.. दक्षिणेस गट नं. १५०/क पैकी उर्वरित जमीन.. पश्चिमेस : गट नं. १५०/ब जमीन, उत्तरेसः राहुल खारवणे यांची जमीन, येणे प्रमाणे चतुःसीमा पूर्वक जमीन, सदर जमीनीत जाणेयेणे साठी गटाच्या पूर्व बाजूच्या रस्त्याने जाणेयेणेसाठी रस्ता याच्या वापराच्या हक्कासह. येणे प्रमाणे तदंगभूत वस्तू हक्कासह जमीन.

ब) मिळकतीचे वर्णन डी. धाराशिव (उस्मानाबाद) सब. डी. व ता. परंडा पैकी मौजे हिंगणगाव (बु.) येथील, ता. पं. समिती परंडा व ग्राम पंचायत हिंगणगाव (बु.) हद्दीतील जमीन याचा गट नं. १५०/ब, याचे एकूण क्षेत्र हे. १९८० आर., याचा आकार रुपये ०४७२ पैसे आहे, यापैकी जिरायत जमीन याचे क्षेत्र हे. ०७ ९० आर याचा आकार रु. ०१- ९२ पैसे अशी जिरायत जमीन.. यासी चतुः सीमा पूर्वेस गट नं. १५०/क पैकी जमीन., दक्षिणेसः गट नं. १५०/ब पैकी उर्वरित जमीन., पश्चिमेस गट नं. १५०/ब पैकी उर्वरित जमीन, उत्तरेसः गट नं. १६६ ची जमीन, येणे प्रमाणे चतुःसीमा पूर्वक जमीन.

सदर वर नमूद जमीनी या श्री. नागेश हरिभाऊ अक्कलकोटे यांच्या खरेदी मालकीच्या व कब्जे वाहिवाटीच्या असून ७/१२ हक्कपत्रकी त्यांच्या नावाची नोंद आहे. सदरच्या जमीनी श्री. नागेश हरिभाऊ अक्कलकोटे विक्री करू इच्छितात. सदर जिरायत शेत जमीन विक्री निघाले बाबत आमचे अशिलास समजलेने आमच्या अशिलाने योग्य ती किंमत देऊ केलेने श्री. नागेश हरिभाऊ अक्कलकोटे यांनी सदरच्या जिरायत शेत जमीनी विक्री करणे बाबतचा करार आमच्या अशीलाशी केला त्या व्यवहारापोटी आमच्या अशिलाकडून साक्षीदारासमक्ष इसार रककम स्वीकारली आहे. व खरेदीखत करून देण्याचा व्यवहार आमच्या अशील बरोबर ठरविला आहे.

सदर मिळकतीवर कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ७ दिवसाचे आत आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही, असे गृहीत धरून मिळकत बिनबोजाची, क्लेअर टायटल आहे असे गृहीत धरून सदर मिळकत खरेदी करतील. खरेदी नंतर कोणाची कसलेही हरकत आलेस आमचे अशीलाच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये या करिता खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. दि. १५/११/२०२५.

**सही -**
**ॲड. कुलदिप संजय क्षीरसागर,**
**पत्ता. ऑफिस - कुलदिप लिगल अस्सोसिएट,**
**गाळा नं. ५१, बाबासाहेब आंबेडकर शॉपिंग सेंटर,**
**भाजी मांडी जवळ, बार्शी, ता. बार्शी,**
**जि. सोलापूर (अशिला तर्फे ॲडव्होकेट)**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** - डि. व सब डि. सोलापूर, ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगर पालिका हद्यवाढ भागातील कसबे सोलापूर येथील नवीन सर्व्हे नं. १८९/१/१ यांसी ऑनलाईन उताऱ्याप्रमाणे नवीन सर्व्हे नं. १८०/१/२ खरेदी दस्तानुसार सर्व्हे नं. १८०/१/१ पैकी **'नियोजीत म्हेत्रे नगर'** या नावाने ओळखले जाणारे नगर मधील प्लॉट नं. ५१ पैकी पुर्वेकडील यांसी हद्द पुर्वपश्चिम २० फुट व दक्षिणोत्तर ४० फुट असे एकुण क्षेत्र ८००.०० चौ. फुट अथवा ७४.३४ चौ. मी. अथवा ऑनलाईन उताऱ्याप्रमाणे ०.००.७४ आर.चौ.मी. असून, यांसी चतुःसिमा पुर्वेस- रस्ता, पश्चिमेस-सदर प्लॉट जागापैकी राहिलेली जागा, दक्षिणेस-प्लॉट नं.५२, उत्तरेस-रस्ता, येणेप्रमाणे वर नमुद वर्णनातील प्लॉट जागा त्यातील दगड, माती वगैरे तद्ंगभूत वस्तूंसह, मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्कासह.

वर नमूद प्लॉट जागा **श्री मल्लिनाथ चंद्रशेखर हिरेमठ** रा. सोलापुर, यांचे मालकीचे व कब्जेवहिवाटीचे असुन, त्यांनी **१) उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक सोलापुर २) श्री अरुणोदय मल्टी स्टेट को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि. सोलापुर** यांचेकडुन वर नमुद मिळकत तारण ठेवून कर्ज घेतलेले होते. सदर कर्ज थकीत असल्यामुळे, उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने सोलापुर येथील मुख्य न्यायदंडाधिकारी सोलापुर यांचे न्यायालयात ड्ठङ्गएड्ख लीं-२००२ कलम १४ अन्वये क्रि.कि. अर्ज क्रं.६४४/२०२४ चा अर्ज दाखल केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने मे. न्यायालयाने वर नमुद मिळकतीचे जप्तीचे आदेश दिलेले आहे. सदर आदेशांतर्गत वर नमुद मिळकत जप्त केलेली आहे. त्यानुसार वर नमुद मिळकत जप्त केलेली उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक व श्री अरूणोदय मल्टी स्टेट को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि. सोलापुर यांनी कायदेशीररित्या लिलावात विक्रीस काढले असता, आमचे अशिलांनी वर नमुद मिळकत त्याचे नांवे मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्काने कायम खुष खरेदीने देण्याचे ठरवून सदर बँकेत कर्जाची थकीत रक्कम भरलेली आहे.

तरीपरंतु वर नमूद मिळकतींच्या संदर्भात कोणाचाही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, साठेखत, खरेदीखत, पोटगी, टाच, जप्ती, बोजा, कोर्ट केस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क वा हितसंबंध वा वाद असल्यास त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे लेखी कळवावे, मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास ही मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची अगर यावर कोणाचाही कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपूर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. तद्नंतर मात्र कुणाचेही कसलीही तक्रार व हरकत चालणार नाही, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ही जाहिर नोटीस दिली ता. १५/११/२०२५

**सही -**
**श्रीधर गोविंद मागनूर**
**ॲडव्होकेट**
**नोटरी (भारत सरकार)**
**पत्ता- प्लॉट नं.३०, बालाजी विला सोसायटी, गांधी नगर, विडी घरकूल रोड सोलापूर मो.-९९२३५९२८५१**
**अशिल श्री विजयकुमार शिवशरण गुजले तर्फे ॲडव्होकेट**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ४६/२०२५

**अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर यांचे. कोर्टात**

१) रजिया गुलाब माशाळे
वयः ४९, वर्षे, धंदाः- घरकाम
रा.मु.पो. लिंबी चिंचोळी, उत्तर सोलापूर, वळसंग, सोलापूर
२) रियाना अब्बास अली हुन्नूटगी
वयः ६५ वर्षे, धंदाः- घरकाम,
रा. नागधान, व्ही.टि.सि. बिजापूर, कर्नाटक
३) रुबीना फिरोज माशाळे
वयः- ४१ वर्षे, धंदाः- अंगणवाडी सेविका
४) नसिमा सलीम मुल्ला -- **अर्जदार**
वयः- ४३ वर्षे, धंदाः- घरकाम
अर्जदार नं.३ व ४ रा. ५११, डीसीसी बँक जवळ, मु. पो. जेऊर, तालुकाः- अक्कलकोट, जिल्हा सोलापूर
५) कौसर सलीम मुल्ला
वयः- २५ वर्षे, धंदाः घरकाम
रा. रेवणसिद्ध नगर, होटगी रोड, सोलापूर
६) पैगंबर सलीम मुल्ला
वयः- २३ वर्षे, धंदाः- शिक्षण
रा. ५११, डीसीसी बँक जवळ, मु.पो. जेऊर, तालुकाः- अक्कलकोट, जिल्हा सोलापूर
विरुद्ध
कोणी नाही -- **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार नं. ४ हि मयत सलीम म. हनिफ मुल्ला यांची पत्नी तर अर्जदार नंबर ५ हि मुलगी तर अर्जदार नंबर ६ मुलगा हे आहेत. तर हसन म. हनिफ मुल्ला विना विवाह विना अपत्य मयत झालेले असून, त्यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार नंबर १ ते ३ बहिणी या नात्याने तर अर्जदार नंबर ४ वहिनी या नात्याने तर अर्जदार नंबर ५ व ६ हे भावाची मुले या नात्याने कायदेशीर वारसदार झालेले आहेत. सदरची मिळकत हि मयत हसन व सलीम यांचे वडील होती. ते मयत झाले असून, त्यांना अर्जदार नंबर १ ते ३ हेच कायदेशीर वारस आहेत. मयत्त सलीम म. हनिफ मुल्ला व हसन म. हनिफ मुल्ला यांचे नावावर सोलापूर डि।। व सब डि।। पैकी ता. अक्कलकोट पैकी मौजे जेऊर येथील नगर परिषद हद्दीतील सी.टी.एस. नंबर ३७७ यांसी क्षेत्र १५३.८० चौ.मी. हि घरजागा मिळकत आतील तदंगभूत वस्तुसह व एजमेंटच्या सर्व हक्कासह आहे. या मिळकतीस अर्जदार नं १ ते ६ यांचे नावाची नोंद होऊन मिळणेसाठी वारसा दाखला मिळणेकरीता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार व्यक्तीरिक्त इतर कोणी वारसदार असल्यास व त्याप्रमाणे कोणाची काही हरकत अथवा म्हणणे असल्यास ही जाहीर प्रसिध्दकरण प्रसिध्द झाल्यापासून में कोर्टानी नेमलेली तारीख.०९/१२/२०२५ रोजी स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणणं माडावे मुदतीत काहीही हरकत नाही अस समजून या अर्जाची चौकशी होऊन में. कोर्ट पूढील योग्य ते आदेश करतील.

आज दि. १५ केलं असे माहे. ११/२०२५ रोजी आमचं सहीने व कोर्टाच्या शिक्याने प्रसिध्द केले आहे.

**सही/-**
**क. लिपीक**

**शिक्का**

**हुकूमावरुन**
**सही/-**
**सहा अधिक्षक दिवाणी न्यायालय, सोलापूर**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






## चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

भाग – ३९

## जगातील रनिंग रेसचे प्रकार

रनिंग स्पर्धा मुख्यतः अंतर, पृष्ठभाग, फॉर्मॅट आणि कालावधी यावर आधारित असतात. यातील ठराविक स्पर्धा ऑलिम्पिकमध्ये अधिकृतरीत्या नोंदवलेल्या आहेत.

- **ट्रॅक रेस**

यात १००मी २००मी आणि ४००मी या स्प्रिंट रेसशुद्ध वेगाची परीक्षा.पुढे ८००मी व १५००मी. या मिडल-डिस्टन्स रेस येतात, ज्यात वेग आणि स्टॅमिनाची एकत्रित गरज असते.ट्रॅकवरील लांब पल्ल्याच्या रेसमध्ये ३०००मी, ५०००मी आणि १०,०००मी या प्रमुख स्पर्धा घेतल्या जातात.

- **रोड रेस**

सर्वात लोकप्रिय प्रकार. यात ५किमी, १०किमी, हाफ मॅरेथॉन (२१.१की) आणि फुल मॅरेथॉन (४२.२की) या स्पर्धा घेतल्या जातात.रोडचा पृष्ठभाग सपाट किंवा सौम्य उतारचढाव असू शकतो. टायमिंग मॅटमुळे वेळ आणि अंतर अचूकपणे मोजले जाते.

- **अल्ट्रा मॅरेथॉन**

फुल मॅरेथॉनपेक्षा जास्त अंतर असलेल्या सर्व स्पर्धा. यात ५०की, ८०की, १००की, १०० माईल तसेच २, ३ किंवा ६ दिवसांच्या मल्टी-डे अल्ट्रा स्पर्धा घेतल्या जातात.याचबरोबर टाइम-बेस्ड रेस ६ तास, १२ तास, २४ तास, ४८ तास आणि ७२ तास अत्यंत कठीण मानल्या जातात. यापैकी काही स्पर्धा स्टेडियममध्येही होतात, ज्यांना स्टेडियम रन म्हणतात.

- **ट्रेल रन**

नैसर्गिक भूभागावर आधारित रेस जंगलातील रस्ते, दगड, मातीचे मार्ग, टेकड्या अशा कच्च्या पथांवर घेतल्या जातात.माउंटन रनमध्ये सतत चढउतार असतात; स्काय रनिंग ही अतिशय उंच, तांत्रिक पर्वतरांगांवरील रेस आहे.याशिवाय डेजर्ट रन, स्नो रन, बीच रन या हवामानाशी झुंज देणाऱ्या स्पर्धा आहेत.

- **बॅकयार्ड अल्ट्रा**

अल्ट्रा मॅरेथॉनमधील वेगळा व लोकप्रिय फॉर्मॅट. प्रत्येक तासाला ६.७ किमी धावून पूर्ण करावे लागते. प्रत्येक तासाला नवीन ''लॅप'' सुरू होते. शेवटपर्यंत उभा राहिलेला एकच धावपटू विजेता ठरतो.

- **स्टेज रेस**

या फॉर्मॅटमध्ये धावपटू अनेक दिवस विविध टप्प्यांमध्ये धावतात. उदा.: ६२ दिवसांत ६२ मॅरेथॉन पूर्ण करण्यासारखे जागतिक विक्रम.

- **टीम-आधारित स्पर्धा**

यात ४१००मी रिले ४४००मी रिले आणि मॅरेथॉन रिले यांचा समावेश होतो.

- **स्टीपलचेस रेस**

ही अडथळ्यांसह चालणारी ट्रॅक रेस. लोकप्रिय अंतर ३००० मीटर. रेसमध्ये एकूण २८ अडथळे (बारियर्स) आणि ७ वॉटर जंप पार करावे लागतात.

- **ऑब्स्टॅकल रेस**

भारतात वेगाने लोकप्रिय होत असलेली रेस. साधारण ५ अंतर आणि त्यात १५ कठीण अडथळे पार करावे लागतात. तांत्रिक कौशल्य व ताकद आवश्यक.

- **फन रन**

मनोरंजनासाठी घेतल्या जाणाऱ्या २३५ किमी रन/वॉक स्पर्धा.यात टाइमिंगपेक्षा उत्साह, अनुभव आणि सहभागाला अधिक महत्व दिले जाते.

अशा प्रकारे अंतर, भूगोल आणि आवडीनुसार रनिंग जगात असंख्य स्पर्धा उपलब्ध आहेत. प्रत्येक प्रकार वेगळा अनुभव देतो आणि धावपटूला नवीन शारिरीक व मानसिक आव्हान स्वीकारण्यास प्रेरित करतो.

**- अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रामॅरेथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूर.
मो. ९१७५८२८२०३

# दुसरा दिवसही गोलंदाजांनी गाजविला

### खेळपट्टीची धूळधाण, एकाच दिवशी १५ बळी

### सायमन हार्मर, रवींद्र जडेजाचे प्रत्येकी ४ बळी

### भारताला विजयाची आशा

◆ **कोलकाता, १५ नोव्हेंबर**

ईडन गार्डन्स स्टेडियमवर खेळल्या जात असलेल्या भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यादरम्यानच्या पहिल्या कसोटी सामन्याचा दुसरा दिवस गोलंदाजांनी गाजविला. पहिल्या दिवशी ११ बळी गेल्यानंतर आज दुसऱ्या दिवशी १५ फलंदाज बाद झालेत. पहिल्या दिवशी वेगवान गोलंदाज पूर्ण प्रदर्शनात असताना, फिरकी गोलंदाजांनी फलंदाजांना आपल्या तालावर नाचायला लावले. दुसऱ्या दिवशी खेळ संपला तेव्हा दक्षिण आफ्रिकेची दुसऱ्या डावांत ७ बाद ९३ धावा अशी स्थिती झाली होती, त्यांची आघाडी केवळ ६३ धावांवर होती. त्यामुळे भारताच्या विजयाच्या आशा पल्लवीत झाल्या आहे.

पहिल्या दिवशी दक्षिण आफ्रिकेचा संघ पहिला डाव केवळ १५९ धावांवर आटोपला.भारताने १ बाद ३७ धावांवरून पुढे दुसऱ्या दिवसाच्या खेळास सुरुवात केली आणि संपूर्ण संघ १८९ धावांत बाद झाला. पहिल्या डावात भारताला केवळ ३० धावांची आघाडी मिळविता आली. आतापर्यंत सामन्यात एकही फलंदाज ४० धावांपर्यंत पोहोचू शकलेला नाही.



रवींद्र जडेजाचे (मध्य भागी) अभिनंदन करताना भारतीय खेळाडू

**जखमी निवृत्त गिल फलंदाजीसाठी परतला नाही**

१८ धावांवर यशस्वी जयस्वाल (१२) बाद झाल्यानंतर टीम इंडिया अडचणीत आली. दरम्यान, केएल राहुलने वॉशिंग्टनसोबत दुसऱ्या गड्यासाठी ५७ धावांची भागीदारी करत संघाला सावरले. दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात वॉशिंग्टन सुंदरने ८२ चेंडूत २९ धावा केल्या, तर केएल राहुलने ३९ धावा केल्या. कर्णधार गिल चौथ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आला. पहिले दोन डॉट बॉल खेळल्यानंतर गिलने पुढच्या चेंडूवर चौकार मारला, परंतु दरम्यान, त्याच्या मानेमध्ये वेदना जाणवू लागल्या, त्यानंतर गिल जखमी निवृत्त झाला.

हार्मरने चार फलंदाजांना बाद केले. उपकर्णधार ऋषभ पंत पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला आला. त्याने २४ चेंडूत २७ धावा केल्या, ज्यात दोन षट्कार व दोन चौकारांचा समावेश होता. रवींद्र जडेजानेही २७ धावा केल्या. भारताने १८९ धावांवर नववा फलंदाज गमावला, परंतु गिल फलंदाजीला परतला नाही. यामुळे भारतीय डावाचा शेवट झाला. दक्षिण आफ्रिकेकडून सायमन हार्मरने सर्वाधिक ३० धावांत ४ बळी, तर मार्को जॅन्सनने ३५ धावांत ३ बळी घेतले.केशव महाराज, बॉशने प्रत्येकी १ बळी टिपला.

**दक्षिण आफ्रिकेची दुसऱ्या डावाची वाईट सुरुवात**

अष्टपैलू रवींद्र जडेजाच्या नेतृत्वाखालील फिरकी गोलंदाजांनी वर्चस्व गाजवले. दक्षिण आफ्रिकेच्या दुसऱ्या डावाची पुन्हा एकदा वाईट सुरुवात झाली. कुलदीप यादवने रायन रिकेलटनला बाद करून दक्षिण आफ्रिकेला पहिला धक्का दिला, तो पायचित झाला. त्यानंतर रवींद्र जडेजा मैदानात आला. पहिल्या डावात एकही बळी न मिळालेल्या जडेजाने एकामागून एक दक्षिण आफ्रिकेच्या चार फलंदाजांना बाद केले. एडेन मार्कराम ४, विआन मुल्डर ११, टोनी झोर्झी २ आणि ट्रिस्टन स्टब्स ५ धावा काढून तंबूत परतले.

यानंतर अक्षर पटेलने काईल व्हेरेनला त्रिफळाचित केले. त्याने केवळ ९ धावा केल्या. मार्को जॅन्सनने मोठा शॉट खेळण्याचा प्रयत्न केला आणि १३ चेंडूत १३ धावा काढल्यानंतर कुलदीप यादवने त्याला बाद केले.

दुसऱ्या दिवसाचा खेळ आटोपला, तेव्हा कर्णधार टेम्बा बावुमाने ७८ चेंडूत नाबाद २९ धावाची खेळी केली, तर कॉर्बिन बोर्श एका धावेवर नाबाद राहिला.

रवींद्र जडेजाने आतापर्यंत ४ बळी घेतले आहेत तर कुलदीप यादवने २ बळी घेतले आहेत. अक्षर पटेलला एक यश मिळाले आहे. ◂(वृत्तसंस्था)

# महिलांच्या करारांच्या मूल्यात वाढ होणार : हरमनप्रीत कौर

◆ **नवी दिल्ली, १५ नोव्हेंबर**

भारतीय महिला क्रिकेट संघाच्या एकदिवसीय विश्वचषक विजयानंतर बीसीसीआयच्या पुरुष आणि महिलांच्या केंद्रीय करारांचे मूल्य आता जवळ येईल, पुरुषांप्रमाणे महिला खेळाडूंचेही मानधन वाढेल, असा विश्वास भारताची कर्णधार हरमनप्रीत कौर हिने व्यक्त केला.

बीसीसीआयने २०२२ मध्ये महिला क्रिकेटपटूंचे सामना शुल्क पुरुषांच्या बरोबरीने आणले होते, परंतु जेव्हा केंद्रीय करारांचा विचार केला जातो तेव्हा संख्या तुलना करण्यासारखी नाही. मानधनाची रक्कम रचना बाजारातील शक्तींमुळे चालते, असे स्मृती मंधानाचा विश्वास आहे आणि कर्णधार त्या मताशी सहमत दर्शविली आहे.

पुरुषांच्या सर्वोच्च श्रेणीतील क्रिकेटपटूंना दरवर्षी ७ कोटी रुपये, तर महिलांना ५० लाख रुपये दिले जातात.

आता केंद्रीय करारांचे मूल्य बदलेल असे मला वाटते. २०१७ नंतर (भारत अंतिम फेरीत पोहोचला तेव्हा) बरेच बदल झाले. त्याआधी, आमचा केंद्रीय करार १५ लाख रुपयांचा होता, असे भारतीय कर्णधार हरमनप्रीतने वृत्तसंस्थेच्या मुख्यालयाला भेट देताना सांगितले. तिथे तिने एका विशेष मुलाखतीत तिच्या प्रवासाबद्दल आणि भारतीय महिला क्रिकेटच्या वाढीबद्दल सांगितले.


हरमनप्रीत कौर

पुरुषांच्या क्रिकेटमधून बहुतेक उत्पन्न मिळते, हे हरमनप्रीतने मान्य केले परंतु या महिन्याच्या सुरुवातीला महिलांच्या एकदिवसीय विश्वचषक विजयानंतर, तिने सांगितले की बदल आधीच सुरू आहे.

२ नोव्हेंबर रोजी नवी मुंबईत झालेल्या अंतिम सामन्यानंतर महिला क्रिकेटपटूंचे बाजार मूल्य आधीच वाढले आहे. जर आपण ती ट्रॉफी जिंकली नसती, तर आपण अजूनही तिथेच अडकलो असतो. जर आपल्याला बदल घडवायचा असेल, तर आपल्याला देशासाठी तितक्याच ट्रॉफी जिंकण्याची वेळ आली पाहिजे. मग लोक आपोआप आपल्याला पुरुषांइतकेच मूल्य देऊ लागतील, असे भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौर म्हणाली. २०२६ च्या इंग्लंडमध्ये होणाऱ्या टी-२० विश्वचषकात हरमनप्रीत संघाचे नेतृत्व करेल अशी अपेक्षा आहे, पण पुढील एकदिवसीय विश्वचषक चार वर्षांनी होईल तेव्हा ३६ वर्षीय खेळाडू तिथे असेल का? हे बघणेउत्सुकतेचे ठरणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

## इव्हेरेव्हला नमवून फेलिक्स ऑगर एटीपी फायनल्सच्या उपांत्य फेरीत

◆ **ट्यूरिन (इटली), १५ नोव्हेंबर**

फेलिक्स ऑगर-अलियासिमने दोन वेळा विजेता अॅलेक्झांडर इव्हेरेव्हला हरवून एटीपी फायनल्सच्या उपांत्य फेरीत शेवटचे स्थान पटकावले.

आठव्या मानांकित ऑगर-अलियासिमने ६-४, ७-६ (४) असा विजय मिळवत ब्योर्न बोर्ग गटातून जॅनिक सिनरसोबत आघाडी घेतली. तत्पूर्वी, सिनरने आधीच बाहेर पडलेल्या बेन शेल्टनला ६-३, ७-६ (३) असे हरवून राऊंड-रॉबिन सामन्यांमध्ये एकहाती विजय मिळवला. सिनरचा पुढचा सामना सातव्या मानांकित अॅलेक्स डी मिनौरशी होईल. अंतिम सामना रविवारी होणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

# संगमेश्वर कॉलेजच्या मुले व मुलींना उपविजेतेपद

### शालेय क्रिकेट स्पर्धेतील कामगिरी

**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

शालेय शहर क्रिकेट स्पर्धेत संगमेश्वर कॉलेजने १९ वर्षांखालील मुले व मुलींच्या गटात उपविजेतेपद संपादिले.

संघास शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते, प्रा. शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रसाद कुंटे आदींनी अभिनंदन केले.



**संघ : मुले :** कर्णधार रत्नपारखे शुभम नागनाथ, अर्श शकील पटेल, प्रविण हणमंत आयवळे, प्रथम प्रभाकर मिस्कीन, यज्ञेश रमेश जोशी, निहाल नौशाद शेख, भाग्योदय संतोष कोटे, दिग्विजय मारुती गवळी, रोहित राजकुमार उपासे, ओम पांडुरंग पवार, श्रावण राहुल म्हेत्रे, शिवचरण सत्यनारायण कट्टा, सुगुर महमदसाबीर उस्मान, थोरात सुरज राजकुमार, घुगे अतुल शैलेंद्र, झंपले अथर्व भारत.

**मुली :** कर्णधार पाटील गौरी प्रशांत, केतकी नागेश चौगुले, अनन्या संतोष दुबे, गायत्री रमेश काकडे, देशमुख पालक संजय, अनुष्का प्रताप सगर, शेख अरफा अन्वरूल हक, संजना धोंडप्पा बिराजदार, स्नेहा अनिल व्हनमने, सुरवसे तृप्ती मारुती, राधिका नागनाथ माळी, भाग्यश्री राजकुमार माळी, वैभवी सचिन पवार, आद्रशिवे स्नेहा कल्याणी, ऐमन सैपन बिराजदार, बनसोडे समृद्धी गणेश.

# न्यू इरा पब्लिक स्कूल चिखलठाणच्या दोघांची विभागीय स्पर्धेसाठी निवड

**जेऊर दि.१५ नोव्हेंबर-**

न्यू इरा पब्लिक स्कूल चिखलठाणच्या दोघांची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. शालेय जिल्हा कुस्ती स्पर्धेत अनुष्का महेंद्र शिंदे हिने १७ वर्षे वयोगटात ४६ किलो वजनीगटातून प्रथम क्रमांक पटकाविला. तसेच श्रद्धा उमेश बोराडे हिने जिल्हा धनुर्विद्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला. दोघांची या कामगिरीवर विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.




# उमाबाई श्राविका विद्यालयास दुहेरी मुकुट

### शालेय टेनिक्काईट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

राजीव गांधी इनडोअर स्टेडियमवर झालेल्या शालेय टेनिक्काईट (रिंग टेनिस) स्पर्धेत उमाबाई श्राविका विद्यालयाने १७ व १९ वर्षांखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. १९ वर्षांखालील मुलींना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. १४ व १७ मुलींनी तृतीय स्थान मिळविले.

त्यांचे श्राविका संस्थेचे सचिव यतीन शहा, विश्वस्त देवई शहा, विश्वस्त करण शहा, मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, वरिष्ठ दिप्ती शहा, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांनी अभिनंदन केले. त्यांना क्रीडाशिक्षक सुहास छंचुरे यांचे मार्गदर्शन लाभले.



**यशस्वी संघ : १७ वर्षांखालील :** संभाजी शिंदे, तपन दास ,आदित्य मुळकुटकर, यश बळ्ळे, राजवर्धन घोडके, कृष्णा दराडे.

**१९ वर्षांखालील : मुले :** हर्ष गायकवाड, विराट कसबे, सुदर्शन खर्डेकर, आदित्य होनपारखे, शुभम पोळ, हर्षवर्धन घोडके. **मुली :** समृद्धी जगताप, अनुष्का टोणपे, कार्तिकी चुंगे, श्रेया इंगळे, आदिती गजरे, विशाखा गुमटे.

**१४ वर्षे मुली :** उन्नती काटकर, श्रद्धा कांबळे, भाग्यश्री पाटील, धनश्री मुद्दे, आर्या कोष्टी, पियुषा हंचे.

**१७ वषे मुली :** अनुष्का केत कृष्णाली पेंडकर दिव्या कसबे, प्रिया शिंदे, धनश्री होनपारखे, अंकिता फडतरे

# राज्य शालेय मैदानी स्पर्धेत विराट अॅकॅडमीला सहा पदके

### पूजा राठोड व स्वरा जाधवची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

राज्य शालेय मैदानी स्पर्धेत नेहरूनगर शासकीय मैदानावरील विराट करिअर अॅकॅडमीच्या खेळाडूंनी सहा पदकांची कमाई केली.

रत्नागिरी येथे झालेल्या या स्पर्धेत पूजा राठोड व स्वरा जाधव यांची राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली. या स्पर्धेत पूजाने १००. व २००मीटर धावण्याच्या शर्यतीत प्रथम क्रमांक पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. स्वरा जाधवने तिहेरी उडीमध्ये द्वितीय स्थान मिळविले. भक्ती थोरातने लांब उडी व १०० मीटर अडथळा शर्यतील तृतीय स्थान संपादिले. अथर्व पाटोळेने ४ बाय १०० मीटर रिलेमध्ये तृतीय स्थान मिळविले. या सर्व खेळाडूंना भारती सूर्याजी लिंगडे यांचे मार्गदर्शन लाभले.








सोलापूर : मार्कंडेय तलावावर शनिवारी झालेल्या राज्य शालेय डायव्हिंग स्पर्धेतील पदकविजेते खेळाडू. दुसऱ्या छायाचित्रात उद्घाटनप्रसंगी मान्यवर.

# सोलापूरच्या डायव्हरचे वर्चस्व; श्रावणी सुर्यवंशी, अपुर्वा अंधारेला दुहेरी मुकुट

### राज्य शालेय डायव्हिंग स्पर्धा : एसव्हीसीएसच्या मनस्वी मानेला सुवर्ण

**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

राज्य शालेय डायव्हिंग स्पर्धेत सोलापूरच्या डायव्हर्सनी वर्चस्व प्राप्त केले. १९ वर्षांखालील गटात देगाव आश्रमशाळेच्या श्रावणी सुर्यवंशीने तर १७ वर्षांखालील गटात इंडियन मॉडेल स्टेट बोर्डाच्या अपुर्वा अंधारने हायबोर्ड व तीन मीटर स्प्रींग बोर्डमध्ये प्रथम क्रमांक पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. हायबोर्डमध्येच १४ वर्षांखालील गटात एसव्हीसीएस हायस्कूलच्या मनस्वी माने हिने प्रथम क्रमांक पटकाविला.

अशोक चौकातील मार्कंडेय जलतरण तलावावर या स्पर्धांचे उद्घाटन पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांचे हस्ते झाले. जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्ता वरकड, तांत्रिक समिती सदस्य राजेंद्र अतनूर, श्रीकांत शेटे, मनीष भावसार, सोलापूर जिल्हा शिक्षण संस्था संघटनेचे दशरथ गुरव, स्पर्धा प्रमुख भारत श्रीराम हे उपस्थित होते. स्पर्धा पार पडण्यासाठी पंच म्हणून श्रीकांत दोरनाल, श्रीशैल जेवरे, विजयकुमार गुल्लापल्ली, खंडेराव शिंदे, सचिन गाडेकर, विठ्ठल कुंभार हे काम पाहत आहेत.


**अंतिम निकाल (कंसात विभागाचे नाव) : ३ मीटर स्प्रिंग बोर्ड : १९ वर्षांखालील : मुले:** स्वराज लाड(मुंबई), विपुल कुडक्याल (पुणे, संगमेश्वर कॉलेज सोलापूर), रितेश लिगाडे (पुणे, एस.आर. चंडक बाळे). **मुली :** श्रावणी सुर्यवंशी (पुणे, आश्रमशाळा देगाव), हर्षदा गोली (पुणे, वालचंद कॉलेज सोलापूर), नेहा पास्ते(मुंबई).

**१७ वर्षांखालील : मुले :** संकेत लिगाडे (पुणे, ज.रा. चंडक, बाळे), रणवीर खाडे (पुणे, बी.एफ. दमाणी सोलापूर), श्रेयश सपकाळ (मुंबई). **मुली :** अपुर्वा अंधारे (पुणे, इंडियन मॉडेल स्कूल स्टेट बोर्ड, सोलापूर), जानवी परसवाणी (मुंबई), श्रेया गुरव (पुणे, एस.आर.चंडक सोलापूर).

**हायबोर्ड : १९ वर्षांखालील : मुले :** स्वराज लाड, रितेश लिगाडे, युवराज अंजीखाने (दोघे पुणे). **मुली :** श्रावणी सुर्यवंशी, हर्षदा गोली,नेहा पास्ते.

**१७ वर्षांखालील : मुले :** श्रेयश सपकाळ, रणवीर खाडे, संकेत लिगाडे. **मुली :** अपुर्वा अंधारे, श्रेया गुरव, जानवी परसवाणी.

**१४ वर्षांखालील : मुले :** मीत वलंत्रा, (मुंबई), आयुश केजरीवाल, सिद्धय्या राजकडे (पुणे, महेश स्कूल, सोलापूर). **मुली :** मनस्वी माने (पुणे, एसव्हीसीएस सोलापूर ), गीतिका सालियन(मुंबई), कणक शंकु (पुणे).


विपुल कुडक्याल याचा डायव्हिंग करतानाचा टिपलेला क्षण : (छायाचित्र : केवल तिवारी)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# तबबल आठ वर्षांनंतर राऊत-वाणी यांच्यात झाले मनोमिलन

## बार्शी नगरपरिषदेच्या राजकीय समीकरणात होणार बदल

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, १५ नोव्हेंबर -**

बार्शी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज शहराच्या राजकारणात मोठा राजकीय भूकंप घडला आहे. अनेक दिवस गुप्तपणे सुरु असलेल्या बैठका, पडद्यामागील चर्चा आणि विविध गटांची रणनीती अखेर उघड झाले आहे. बार्शीतील प्रभावशाली आणि निर्णायक मतदार असलेल्या वाणी कुटुंबाने विनोदनाना वाणी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला.

यानिमित्ताने माजी आमदार राजेंद्र राऊत आणि वाणी परिवार यांच्यात तब्बल आठ वर्षांनंतर मनोमिलन झाल्याचे पहावयास मिळाले. माजी आमदार राजेंद्र राऊत व वाणी परिवार यांच्यात मोठा दुरावा निर्माण झाला होता. मात्र, या प्रवेश सोहळ्याप्रसंगी



माजी आमदार राजेंद्र राऊत आणि विनोदनाना वाणी हे दोघे एकाच व्यासपीठावर आले होते.

या प्रवेशामुळे भाजपात नवा जोश निर्माण झाला आहे. वाणी कुटुंबाची तीन प्रभागांवरील पकड, त्यांचा समाजातील प्रभाव आणि युवा वर्गातील वाढती लोकप्रियता लक्षात घेता, नगराध्यक्षपदाच्या उमेदवार तेजस्विनी प्रशांत कथले यांच्या प्रचाराला मोठा लाभ होणार असल्याचे सांगण्यात येते. विनोदनाना वाणी हे शिवसेना उबाठा गटाचे तालुका प्रमुख म्हणून काम पाहत होते. त्यांच्या नेतृत्वाखाली वाणी कुटुंबातील विशाल वाणी, बंडू वाणी, पांडुरंग वाणी, त्र्यंबक बापू वाणी, श्रीकांत वाणी आणि अनिलअण्णा वाणी भाजपात दाखल झाले.

वाणी कुटुंबातील भैया वाणी यांची युवकांमधील पकड, संघटनशक्ती आणि मोठ्या प्रमाणातील युवा संपर्क हे महत्त्वाचे घटक आहेत. त्यामुळे युवा वर्ग भाजपाच्या पाठीशी येईल, असा राजकीय अंदाज व्यक्त केला जात आहे.

**गुप्त बैठकींच्या चर्चेने हादरली होती बार्शी**
गेल्या काही आठवड्यांपासून माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या गुप्त बैठकींच्या चर्चेने संपूर्ण बार्शी हादरली होती. त्या बैठकींचे पहिले मोठे फलित आजच्या या पक्षप्रवेशाच्या रुपाने समोर आले आहे. अजून कोणाचा भाजपा प्रवेश होणार? याकडे बार्शीवासीयांचे लक्ष लागून राहिले आहे.

---

सांगोला नगरपरिषद निवडणूक

# शनिवारी अध्यक्षपदासाठी ५ तर सदस्यपदासाठी २५ अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि. १५ नोव्हेंबर -**

सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक अंतर्गत शनिवार, दि.१५ नोव्हेंबर अखेर अध्यक्षपदासाठी ५ नामनिर्देशन पत्र तर सदस्यपदासाठी ९ प्रभागातून २५ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सैपन नदाफ यांनी दिली.

सदस्यपदासाठी प्रभाग क्र.२ अ-(अनू.जाती) १ अर्ज, प्रभाग क्र.३ ब-(सर्वसाधारण) ४ अर्ज, प्रभाग क्र.४ अ-(सर्वसाधारण महिला) २ अर्ज, प्रभाग क्र.५ अ-(ना.मा.प्र.) ५ अर्ज, ५ ब-(सर्वसाधारण महिला) २ अर्ज, प्रभाग क्र.६ अ-(ना.मा.प्र.महिला) २ अर्ज, ६ ब-(सर्वसाधारण) २ अर्ज, प्रभाग क्र.७ अ -(ना.मा.प्र.) १ अर्ज, प्रभाग क्र.८ अ-(अनू. जाती महिला) १ अर्ज, प्रभाग क्र.१० अ-(सर्वसाधारण महिला) १ अर्ज, १० ब-(सर्वसाधारण) २ अर्ज, प्रभाग क्र.११ अ-(ना.मा.प्र.महिला) १ अर्ज, ११ क-(सर्वसाधारण) १ अर्ज असे एकूण २५ अर्ज दाखल करण्यात आले. यामध्ये १५ पुरुष व १० महिला उमेदवारांचा समावेश आहे, असे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी सांगितले.

---

# बार्शी नगरपालिका निवडणूक; नगराध्यक्ष पदासाठी एकही अर्ज नाही

- सहाव्या दिवशी अठरा अर्ज दाखल
- दाखल झालेले बहुतांश अर्ज भाजपाचे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १५ नोव्हेंबर-**

बार्शी नगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या सहाव्या दिवशी नगरसेवक पदासाठी १८ उमेदवारी अर्ज दाखल झाले. यापूर्वी दाखल झालेल्या तीन अर्जासह एकूण २१ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

नगराध्यक्ष पदासाठी अद्याप एकही अर्ज दाखल झाला नसल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तैमुर मुलाणी यांनी दिली. नगरपालिका निवडणुकीसाठी १० डिसेंबरपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. पहिल्या चार दिवसात एकही अर्ज दाखल झाला नव्हता. मात्र शुक्रवारी तीन उमेदवारांनी तर शनिवारी १८ जणांनी ऑफलाइन पद्धतीने प्रत्यक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले. दाखल झालेले सर्व अर्ज हे भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांचे आहेत. आज रविवार (दि.१६ नोव्हेंबर) सुट्टीचा दिवस असला तरी निवडणूक आयोगाने अर्ज दाखल करण्यासाठी परवानगी दिली आहे. त्यामुळे नगरसेवक पदासाठी मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल होतील अशी शक्यता वर्तविली जात आहे. सोमवार, १७ नोव्हेंबर रोजी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असून यादिवशी बहुतांश उमेदवार आपला अर्ज दाखल करतील. शनिवारी प्रामुख्याने भाजपकडील संभाव्य उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. अर्ज दाखल केल्यानंतर नगरपालिकेच्या आवारात सामूहिकरित्या विजय राऊत यांच्या उपस्थितीत फोटो काढत असल्याचे चित्र दिसून आले. आज दिवसभरात भाजपकडून विद्यमान नगरसेवक संदेश काकडे, रोहित लाखाळ, महेश जगताप, दीपक राऊत, विजय चव्हाण, मदनलाल गव्हाणे यांच्यासह रोहित पाटील, संतोष पाटील, कांता मोहिते, नम्रता हगरे, राजेंद्र मांगडे, चंद्रकला कांबळे, पंकज ठाकरे, दिलशाद शेख, सुशीला डिसले, शमा रिकीबे, सादिक मुल्ला, फरजना जलसे तर सुरज मुल्ला आणि ओमकार गायकवाड यांनी अपक्ष अर्ज दाखल केला आहे.

ऑनलाइन अर्ज दाखल केले तरी ऑफलाईन अर्ज दाखल करणे गरजेचे आहे. जोपर्यंत ऑनलाइन अर्ज दाखल होत नाही तोपर्यंत तो गृहीत धरला जात नसल्याचे तैमुर मुलाणी यांनी सांगितले.




---

# न.पा.निवडणूक : अक्कलकोट ३४ तर दुधनीमध्ये ४ अर्ज दाखल

**अक्कलकोट, दि. १५ नोव्हेंबर**

अक्कलकोट नगरपालिकेच्या नगरसेवक पदासाठी सहाव्या दिवशी ३४ तर दुधनी नगरपालिकेच्या नगरसेवक पदासाठी ४ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. अक्कलकोटच्या नगराध्यक्षपदासाठी कटारे सुनील अप्पाराव यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

दुधनी नगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेनेकडून प्रभावती सातलिंगप्पा हौदे-८ ब, बसवराज रायप्पा हौदे-१० ब, ढगे पल्लवी गुरुशांत-८ अ, भांडारी रेखा तिमान्ना-३ ब या प्रभागासाठी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. अक्कलकोट नगरपालिकेच्या नगरसेवक पदासाठी अर्ज दाखल केलेले उमेदवार याप्रमाणे; ताराबाई रुद्रेश कुंभार-१२ ब, लवटे निलेश मालेश-६, आकाश अशोक शिंदे-८ ब, रामेश्वर रेवाप्पा पाटील-१० ब, वैशाली रामेश्वर पाटील-१० अ, गगनगौडा श्रीशैल आनंदप्पा-२ ब, पाटील हर्षदा गणेश-१० अ, आळगी सिद्धाराम कल्लाप्पा-६ ब, कापसे रमेश पंचप्पा-५ ब, शेख जहिराबी शकूर ३-ब, शेख शबाना बरकत-३ ब, सोमवंशी अक्षय अनिल-१० ब, भकरे राहुल सुभाष-१० ब, शिंदे सोनाली विक्रम-१० अ, अलविकर विजयालक्ष्मी कल्लप्पा-२ अ, इंगळे महेश कल्याणराव-११ ब, अल्लोळी सुश्मिता श्रीशैल-५ अ, पिरजादे सय्यद महोद्दीनपाशा-५ ब, राठोड शैलेश चंद्रसेन-५ ब, राठोड रेणुका शैलेश-५ अ, राठोड नवनीत चंद्रसेन-५ ब, सिद्धलिंग हणमंत लाळशेरी-१० ब, मानसी मंगेश जाधव-२, चौगुले स्वामिनाथ शिवाजी-२ ब, मडिखांबे संदीप नागनाथ-११ब, जमगे लक्ष्मण कल्याणी-१० ब, शिंदे गिताबाई सुरेश-७ ब, मंगरूळे रविकांत सिद्धाराम-१० ब, डांगे नविद रफिक-७ अ, गायकवाड पूनम इंद्रजीत-९ अ, सरिता अनिल कुर्ले-११अ, कोरबू मुबारक रज्जाक-११ ब, सद्दामहुसेन नूरअहमद शेरीकर-९ ब, राठोड ऋतुराज टोपू-१२.

---

# पंढरपूर नगरपरिषदेसाठी शनिवारी २० अर्ज

- एकूण दाखल अर्जांची संख्या ३६
- नगराध्यक्षपदासाठी एकही अर्ज नाही

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १५ नोव्हेंबर-**

पंढरपूर नगरपरिषदेसाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या सहाव्या दिवशी अर्थात शनिवार, दि.१५ नोव्हेंबर २०२५ रोजी २० उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. आजअखेर दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची संख्या ३६ इतकी झाली आहे. मात्र नगराध्यक्षपदासाठी अद्यापपर्यंत एकही नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आले नाही. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सोमवार, १७ नोव्हेंबर २०२५ ही अंतिम तारीख आहे, अशी माहिती पालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

शनिवारी दाखल झालेले प्रभागनिहाय उमेदवारांची नावे याप्रमाणे; प्रभाग १४-शरद मोहन बंदपट्टे, प्रभाग ६-निलेश बजरंग जाधव, अमृत अर्जुन माळवदे, प्रभाग १७-लोकेश नागनाथ यादव, प्रभावती दिगंबर मुडके, उमेश भगवान सर्वगोड, प्रभाग १२-शांताबाई माणिक काळे, प्रभाग १-संतोष गोरख धोत्रे, स्वाती दत्तात्रय काळे, दत्तात्रय तुकाराम काळे, प्रभाग ५-सुमित संभाजी शिंदे, प्रभाग १६-मोनिका निलेश शिंदे, प्रमिला अरुण कबाडे, प्रभाग १३-रंजना दिलीप हजारे, प्रभाग १०-साधना सुधीर धोत्रे, संजय जवाहरलाल बंदपट्टे, प्रभाग २-शुभम संतोष महाजन, प्रणिता किरण घाडगे, मयुर भारत भिंगे.

या अगोदर दाखल झालेले अर्ज-पहिल्या दिवशी आदित्य चंद्रकलेश्वर फत्तेपूरकर यांचा अर्ज दाखल करण्यात आला. दुसऱ्या दिवशी नगरसेवक व नगराध्यक्ष पदासाठी एकही अर्ज दाखल झाला नाही. तिसऱ्या दिवशी रुक्मिणी धनाजी धोत्रे यांचा अर्ज दाखल झाला आहे. चौथ्या दिवशी अमित अशोक डोंबे, अदिती अमित डोंबे, गौतम काशिनाथ गाजरे, प्रशांत शिवाजी मलपे यांनी अर्ज दाखल केला. शुक्रवारी आरती बळीराम बनसोडे, नितीन पद्मकुमार गांधी, प्रमिला अरुण कबाडे, वैभव शहाजी भोसले, शाम प्रभु गोगाव, अर्जुन संतोष धोत्रे, सुरेखा भारत धोत्रे, प्रिती विशाल कदम, संदीप अशोक शिंदे असे अर्ज दाखल झालेले आहेत.

---

# मंगळवेढा नगरसेवक पदासाठी शनिवारी २४ उमेदवारी अर्ज दाखल

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा, दि.१५ नोव्हेंबर-**

मंगळवेढा नगरपरिषद पंचवार्षिक निवडणूक उमेदवारी अर्ज भरण्याच्या सहाव्या दिवशी नगरसेवक पदासाठी २४ उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले आहेत. सर्वाधिक प्रभाग क्र.९ मध्ये ७ उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले आहेत. सोमवार दि.१७ नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्याने त्या दिवशी उमेदवारी अर्ज भरण्याचे अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे.

**निवडणूक उमेदवारी आलेले अर्ज याप्रमाणे - प्रभाग :** क्र.१ सय्यद अंजूम इरफान(अपक्ष). क्र. ३ रेखा खंदारे (अपक्ष), निकिता खंदारे (अपक्ष), क्र.५ हणमंतराव कोष्टी (भाजपा), अनिल बोदाडे (अपक्ष), निलेश सुर्यवंशी (अपक्ष), निलेश सुर्यवंशी (भाजपा), सोनम मुढे (अपक्ष), क्र.६ संजय नलवडे (भाजपा), सुहास मुदगूल (अपक्ष), क्र.७ अश्विनी धोत्रे (अपक्ष), क्र.८ सोमनाथ हुशारे (भाजपा), राजामती कोंडुभैरी (अपक्ष), शरयू हजारे (अपक्ष), क्र.९ अनिता भोसले (अपक्ष), नंदा नाईकवाडी (शिवसेना उबाठा), शोभा हजारे (अपक्ष), रुबीनाबी इनामदार (अपक्ष), सुदर्शन यादव (भाजपा), प्रशांत यादव (नॅशनल कॉँग्रेस पार्टी (शरद पवार), मुझम्मील काझी (अपक्ष), क्र.१० विक्रम शेंबडे (अपक्ष)



मंगळवेढा : नगरपालिका निवडणूक नगरसेवक पदासाठी निवडणूक निर्णय अधिकारी मदन जाधवांकडे उमेदवारी अर्ज दाखल करताना.

---

# मोहोळ : सहाव्या दिवसअखेर ३९ जणांचे अर्ज

**तभा वृतसेवा,**
**मोहोळ, दि. १५ नोव्हेंबर-**

नगरपालिका निवडणुकीच्या प्रक्रियेला सुरुवात झाल्यानंतर ६व्या दिवसाअखेर ३९ जणांनी अर्ज दाखल केले आहेत. शनिवार अखेर नगराध्यक्ष पदासाठी वर्षा गौतम क्षीरसागर (भाजप) आणि गायत्री रविकांत अष्टूळ (शिवसेना शिंदे) यांनी अर्ज दाखल केले. शनिवार अखेर अर्ज दाखल करणाऱ्या प्रमुख उमेदवारांमध्ये भाजपचे तालुका अध्यक्ष सतीश काळे आणि शिवसेना उबाठाचे शहर प्रमुख विकी देशमुख यांचा समावेश आहे.

**दाखल अर्ज याप्रमाणे :** प्रभाग : क्र.१ उत्तर मंडलाध्यक्ष सतीशकाळे (भाजपा), क्रं. २: रणजीत रामकिसन देशमुख (उबाठा), अजय अनिल कुर्डे (शिवसेना). क्र. ३ : नूरजहा नसरुद्दीन मोमीन (अपक्ष), क्रं ८ : प्रमोद मोहन डोके (भाजपा). क्रं. ७ : विक्रम पंडितराव देशमुख (शिवसेना उबाठा)

क्र. १० : सीना दिनकर गडदे (शिवसेना), कुरेशी अझरुद्दीन अनिस आणि भारती भारत बरे ( दोघे भाजपा), कुरेशी अझरुद्दीन अनिस आणि बरे भारती भारत. चैतन्य पद्माकर देशमुख (शिवसेना शिंदे).




---



# हॉटेल कामगाराला नग्न करून लोखंडी पाईपने मारहाण

## मालकाविरुध्द गुन्हा

**टेंभुर्णी, दि.१५ नोव्हेंबर-**

एका हॉटेल कामगारास नग्न करुन लोखंडी पाईपने मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना टेंभुर्णी येथील हॉटेल ७७७७ मध्ये घडली. याप्रकरणी हॉटेल मालक लखन हरिदास माने यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

ऑगस्ट महिन्यातील एका रात्री ११ वाजण्याच्या सुमारास हॉटेल ७७७७ च्या मालकाने आप्पासाहेब नकाते (वय-४४) या कामगाराच्या अंगावरील कपडे जबरदस्तीने काढले व त्याच्याकडे असलेली २ हजार रुपये घेतली. आणि त्यास नग्नावस्थेत हॉटेलच्या बाहेर असलेल्या इतर कामगारांसमोर उभा करुन शिवीगाळ करत अपमानित केले. तसेच लोखंडी पाईपने पाठीवर जबर मारहाण केली. 'तू तक्रार दिलीस किंवा काम सोडलेस तर तुला जिवे ठार मारीन', अशा धमकी दिली. या घटनेदरम्यान आरोपीने त्या कामगाराचा नग्नावस्थेतील व्हिडिओ शूट करुन तो सोशल मीडियावर व्हायरल केला.

सदर प्रकरण उघडकीस येताच १५ नोव्हेंबर २०२५ रोजी टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी हॉटेल ७७७७ चा मालक लखन माने यास तातडीने अटक करण्याचे आदेश दिले. टेंभुर्णी बीटचे तांबोळी यांनी गुन्हा दाखल केला. पुढील तपास सपोनि चौधरी यांच्या देखरेखीत सुरु आहे.

---

# आप्पाशा गायकवाड यांचे निधन

**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**



मजरेवाडी भागातील गजानन नगर मधील रहिवाशी आप्पाशा सदाशिव गायकवाड (मिस्त्री) यांचे शनिवारी पहाटे ४:३० वाजता दुःखद निधन झाले. ते ७६ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. पत्रकार विजय गायकवाड यांचे ते वडील होत.

---

# ट्रम्प टेरीफमुळे भारतीय अर्थव्यवस्था धोक्यात नाही

## डॉ. शैलेश देवळणकर; पंढरपूर अर्बन बँक व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१५ नोव्हेंबर-**

भारताचा विकास हा न टाळता येण्याजोगा विषय आहे येत्या काही दिवसांत भारत जगातील तिसरी अर्थव्यवस्था आर्थिक महासत्ता असलेला देश असेल, ट्रम्प टेरीफमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला धोका नाही. आपल्या देशाचे भवितव्य अतिशय उज्वल आहे असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक डॉ. शैलेंद्र देवळणकर यांनी केले.

ते पंढरपूर अर्बन बँक आयोजित देशभक्त बाबुराव जोशी बौद्धिक व्याख्यानमालेत पहिले पुष्प ट्रम्प टेरिफ आणि भारत, या विषयावर बोलत असताना केले, यावेळी व्यासपीठावर माजी आमदार प्रशांत परिचारक, बँकेचे अध्यक्ष सतीश मुळे, उपाध्यक्षा सौ माधुरी जोशी, हरीश ताठे आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ शैलेंद्र देवळणकर म्हणाले, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १०वर्षात ८२देशांना भेटी दिल्या म्हणून टीका केली जाते. पण देशाचे आर्थिक हितसंबंध, व्यापार वाढवायचा असेल तर यापेक्षा जास्त देशांना भेटी दिल्या पाहिजेत, जागतिक पातळीवर प्रभाव वाढविण्यासाठी विदेश दौरे आवश्यक आहेत. जगाच्या आर्थिक बाजारपेठेत भारतीय नागरिकांचे महत्वाचे योगदान आहे, अमेरिकेत ५२लाख भारतीय राहतात, एकूण विद्यार्थ्यांपैकी एक तृतीयांश विद्यार्थी हे भारतीय असून भारतामुळे मोठ्या प्रमाणात कररूपी उत्पन्न अमेरिकेस मिळत आहे.

संपूर्ण जग हे आता एक कुटुंब बनले असून प्रत्येक घटकावर जागतिक राजकारणाचा परिणाम जाणवणार आहे, रशिया युक्रेन युद्धाच्या झळा भारतासह ईतर देशांना सोसाव्या लागत आहेत. दहशतवादी हल्ले हे आता केवळ जम्मू काश्मीर आणि दिल्लीपर्यंतच मर्यादित राहिलेले नसून ते आपल्या पर्यंत येणार आहेत. रशियाकडून भारताने पस्तीस अब्ज डॉलर चे कच्चे तेल घेतल्याने आज पेट्रोल च्या किंमती स्थिर आहेत, अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता रशिया कडून तेल घेतल्याने डोनाल्ड ट्रम्प चिडला असून इगो दुखावला आहे यामुळे टेरिफ वाढविले असून याचा फटका सोलापूर कापड उद्योगाला बसला आहे. अमेरिकेचे सफरचंद किंवा बदाम जेनेटिकली मॉडी फाईड असल्याने त्यातील पोषणमूल्ये कमी आहेत, त्यामुळे ती स्वस्त आहेत. याउलट भारतातील फळे, भाजीपाला आहेत. कृषी, दुग्धोत्पादन आणि मत्स्योद्योग यावरील आयात कर शून्य करा अशी ट्रम्प यांनी मागणी केली होती मात्र भारताने त्या स्पष्ट नकार दिल्याने डोनाल्ड ट्रम्प यांचा हर्ट झाला असून त्यामुळे त्यांनी भारताविरोधात कुरघोडी करण्यास सुरुवात केली आहे. भारत अमेरिकेत रत्न, दागिने, चामड्याच्या वस्तू, ऑटोपार्ट, गारमेंट्स, बासमती तांदूळ, मासे, दूध निर्यात करतो. ट्रम्प टेरीफमुळे केवळ ३२ अब्ज डॉलर निर्यात थंडावली आहे. मात्र आपण भारतीय बचत करत असल्याने आपल्या अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत आहे ही मोठी जमेची बाजू आहे. मध्यमवर्गीय भारतीय ग्राहक हा भारतीय अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा कणा आहे या देशाला हलवणे इतके सोपे नाही दबाव टाकणं हा ट्रम्प यांचा स्वभाव आहे.भारताला ते टारगेट करण्यासाठी पाकिस्तानला जवळ करीत आहेत. मात्र ट्रम्प यांच्या दबावाला आपण बळी पडता कामा नये.

भारताचा जीडीपी ७टक्के असून जगात भारतीय तरुणांची मागणी वाढते भारताविषयी सकारात्मक असणे गरजेचे आहे. यावेळी पंढरपूर अर्बन बँकेच्या ११३वर्षांच्या यशस्वी वाटचालीसाठी हळदणकर यांनी आश्चर्य व्यक्त करून कौतुक केले. सुरुवातीला माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी पुष्पहार घालून स्वागत केले. माधुरी जोशी यांनी परिचय करून दिला. सूत्रसंचालन एस.पी. कुलकर्णी यांनी केले तर आभार हरीश ताठे यांनी मानले.




**अमेरिकेला भारताची दुप्पट गरज**
प्रत्येकाने आपले युद्ध आपणच लढावे लागणार असून कोणतीही जागतिक संघटना मदतीस येणार नाही. अधिक टेरीफ लावले तरी भारत झुकत नाही हा ट्रम्प यांचा पराभव असून भारतीय अर्थव्यवस्था अजिबात धोक्यात आलेली नाही.

---

# चिमूट आणि मूठ

काल आपण सगळे आपल्या साठे बाईंच्या स्मृतिप्रीत्यर्थ अनौपचारीक रित्या जमलो होतो. आमच्या सगळ्यांच्या आग्रहास्तव तू ऐनवेळी ठरून आपल्या साठे बाईंच्या अतिशय लाडक्या कवितेवर बोललास थोडा वेळ समर्पक आणि समायोचित. मला त्या भाषणातले सगळ्यात जास्त काय आवडले असेल तर तू वंदे मातरम्ची दीडशे वर्षे आणि बालकवींची औदुंबर ही कविता यांची घातलेली सांगड बालकवींची ही कविता आपल्या साठे बाईंची अतिशय आवडती आकाराने अतिशय चिमूटभर अशी ही कविता आशयाने अक्षरशः मूठभर अशीही ही कविता तोच प्रकार वंदे मातरम्चा. तू सुरुवात केलीस आपल्या साठे बाईंच्या स्मरणाने आणि मग ऐलतटावर पैलतटावर हिरवाळी घेऊन या पहिल्या ओळीची सांगड तू सुजलाम, सुफलाम शी घातलीस आणि मग एक एक ओळ घेत तू पुढे पुढे गेलाससगळ्यात कळस म्हणजे बालकवींच्या या कवितेतील शेवटची ओळ ... पाय टाकूनी जळात बसला असला औदुंबर ... म्हणे ... या कवितेची ही ओळ म्हणजे वंदे मातरम् या आपल्या राष्ट्रगीतात अभिप्रेत असलेली सामर्थ्यवानांची सावध स्थिती.

नक्की सांगतो. काल हे ऐकायलाआपल्या साठे बाई असत्या ना तर खूप खुश झाल्या असता. तसाही तू त्यांचा आवडता ... हे ऐकून त्या तुला नेहमी जो आशीर्वाद देत असत तो त्यांनी तुला काल पुन्हा दिला असता चिमटी चिमटीने सतत विद्या मिळवत राहा ; आणि त्याचे मनन , चिंतन करून इतरांना मुठी मुठीने आनंद देत राहा तूही मग त्यांना अनेकदा आधी विचारायच्या तसे पुन्हा विचारले असतेस देताना मूठ , मूठ आणि घेताना चिमूट आणि मग साठे बाईही म्हणाल्या असत्या. विद्या मिळवावी लागते आणि मिळालेली विद्या आधी टिकवावी आणि मग ती सातत्याने वाढवावी लागते.

ही प्रक्रिया सतत चालणारी आणि म्हणून संथ असते . म्हणून घेताना चिमूट चिमूट पण देताना कंजुषी करू नये म्हणून मूठ मूठ . हे तुझ्याही डोक्यात असणार. नक्की असणार अगदी जरूर असणार. म्हणून कदाचित ... हा संदर्भ न देता तू म्हणालास ... राष्ट्रांकडून घेताना चिमूट चिमूट .. पण वारंवार आणि राष्ट्राला देताना मूठ मूठ. असे मूठभर नागरिक चिमूटभर जरी करत राहिले तरी राष्ट्रपुरुष समर्थ बनतो आणि स्वस्थ बसू शकतो. तुझ्या कालच्या भाषणातले शेवटचे वाक्य होते.

आपल्या राष्ट्रपुरुषाला पाय टाकूनी जळात बसला असला औदुंबर असे बसण्याची संधी कधीतरी आपण आपल्या परीने देणार का ? असे स्वतः स्वतःला विचारणे म्हणजे वंदे मातरम् ची १५० वी जयंती सादर करणे. आणि हे औदुंबर कविता व वंदे मातरम् यांचे नाते आहे. Knowledge based Economy असे स्वतःचे वर्णन करायचे तर शिक्षकांची आठवण करताना हे आठवावे लागेल. साठे बाईंचा चिमूटभर उंचीचा लाडका विद्यार्थी काल मूठभर तत्व.

**- चन्द्रशेखर टिळक**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### सोलापूर महापालिकेच्या सर्व जागा लढण्यासाठी सर्वार्थाने ताकद उभी करणार

**सोलापूर, दि.१५ नोव्हेंबर**

सोलापूर शहराचा आढावा घेत सहसंपर्क मंत्री बनसोडे यांनी येत्या काळामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीसाठी जास्तीत जास्त वेळ देणार असून सोलापुरातील २६ प्रभागांमध्ये १०२ उमेदवार सक्षमपणे लढण्यासाठी सर्वांनी जोमाने प्रयत्न करावेत असे आवाहन केले. राष्ट्रवादी काँग्रेस सोलापूर शहर जिल्ह्याचे नूतन सहसंपर्कमंत्री तथा महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पिंपरी चिंचवड येथील जनसंपर्क कार्यालयात सोलापूर शहरातील प्रमुख पदाधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सोलापूर शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांनी सोलापूर शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा आढावा सादर केला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार साहेब प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे साहेब संपर्कमंत्री दत्तात्रय भरणे साहेब आणि स्वतः मी प्रत्येक असे आम्ही सर्वजण प्रत्येक उमेदवाराला सर्वार्थाने ताकद देण्याचे काम करणार आहोत,आपण निर्धास्तपणे ही निवडणूक लढवून ऐतिहासिक विजय मिळवावा असेही ते म्हणाले. सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने नूतन सहसंपर्कमंत्री ना.अण्णा बनसोडे यांचा शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सर्वांच्या वतीने सोलापूर दौऱ्यावर येण्याचे निमंत्रण दिले.प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव,प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे,ज्येष्ठ नेते तोफिक शेख,प्रदेश चिटणीस आनंद मुस्तारे,प्रदेश ओबीसी सरचिटणीस डॉ.बसवराज बगले, नगरसेवक सिद्धेश्वर आनंदकर, नगरसेवक गणेश पुजारी,ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. बैठकीत प्रमुख पदाधिकारी जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, प्रदेश सचिव इरफान शेख,नजीब शेख, शहर उत्तर विधानसभा अध्यक्ष प्रकाश जाधव,सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष अनिल बनसोडे,विद्यार्थी अध्यक्ष अनिकेत व्हसुरे,शहर उपाध्यक्ष उमेश जाधव आदि उपस्थित होते.

**विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांची ग्वाही!**

**सोलापूर शहराच्या पदाधिकाऱ्यांची झाली पुण्यात बैठक**

# 'लोकमंगल'चा आज सर्वधर्मीय सामुहिक विवाह सोहळा

### ५२ जोडपी होणार विवाहबध्द

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

लोकमंगल फाउंडेशनतर्फे दरवर्षी परंपरेप्रमाणे होणारा सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे यंदाही आयोजन करण्यात आले आहे. हा ४६ वा सामूहिक विवाह सोहळा रविवार, दि. १६ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५.०८ वाजता, गोरज मुहूर्तावर विजापूर रोड येथील शिवाजी अध्यापक विद्यालयाच्या प्रांगणात पार पडणार आहे. यंदाचे विवाह सोहळ्याचे २० वे वर्ष असून, यावेळी ५२ जोडपी विवाहबद्ध होणार आहेत.

दरम्यान, या लग्नसोहळ्यासाठी गेल्या आठवड्यापासूनच लगीनघाई सुरू झाली असून, सर्व परिवार या सोहळ्यासाठी सज्ज झाल्याची माहिती युवा नेते मनिष देशमुख यांनी दिली. याबाबत मनिष देशमुख पुढे म्हणाले की, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व नववधू-वरांच्या कुटुंबांना दिलासा मिळावा हा उद्देश असून, विवाहासाठी आवश्यक सर्व खर्च लोकमंगल फाउंडेशन मार्फत करण्यात येणार आहे. वधू-वरांना आयुष्यभर उपयोगी पडणाऱ्या गृहउपयोगी साहित्याची भेटवस्तू म्हणून देण्यात येणार आहे. भोजन व्यवस्थेपासून ते नववधू-वरांचे कपडे व सर्व सुविधा फाउंडेशनतर्फे पुरवल्या जाणार आहेत. याशिवाय वधू वरांची शहरातील प्रमुख मार्गाने रथामधून मिरवणूकही काढण्यात येणार आहे. शिवाय प्रत्येकाच्या धर्माप्रमाणे विवाह लावून दिले जाणार आहेत. यंदा ४९ जोडप्यांमध्ये ३ बौद्ध जोडपे तसेच ४६ हिंदू जोडपे आहेत. सोहळ्याचे संपूर्ण स्थळ २५० बाय २०० फूट क्षेत्रफळामध्ये तयार करण्यात येणार असून, भोजन व्यवस्था ९० बाय १५० फूट जागेत असेल. संपूर्ण कार्यक्रम स्थळावर आकर्षक सजावट करण्यात आली आहे. या विवाह सोहळ्यात दोन्हीकडील सुमारे २५-३० हजार वऱ्हाडी मंडळींना भोजनाची सोय करण्यात आले आहे. या नवविवाहात जोडप्यांना संसार सुखाचा करण्याबाबत सूचना देणारा समुपदेशनाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला आहे.




### जिल्हा पर्यटनाची थीम ठरणार आकर्षण



यंदाच्या विवाह सोहळ्याला विशेष आकर्षण मिळणार आहे. आमदार सुभाष देशमुख यांनी सुरू केलेल्या 'जिल्हा पर्यटन महोत्सवा'च्या धर्तीवर या विवाह सोहळ्यातही जिल्हा पर्यटन थीम राबविण्यात येत आहे. विवाह सोहळा आयोजित करण्यात येणाऱ्या ग्राउंडवर जिल्ह्यातील विविध गावांची वैशिष्ट्ये आणि पर्यटनस्थळांची माहिती आकर्षक पद्धतीने प्रदर्शित केली जाणार आहे. पर्यटनदृष्ट्या महत्वाची असणारी ठिकाणे, सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा दर्शविणारे पॅनेल्स, माहिती फलक आणि मांडणी याचा समावेश असेल. विशेष म्हणजे, अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराजांची मूर्ती सोहळा स्थळी ठेवण्यात येणार असून भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे हा प्रेरणादायी संदेशही झळकविण्यात येणार आहे.

**- मनिष देशमुख, युवा नेते भाजपा**

# दुचाकीस्वाराच्या मृत्युप्रकरणी सिटी बसचालकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

शहरातील अक्कलकोट रोडवरील एमआयडीसी परिसरातील विजयनगर रस्त्यावर सिटी बसच्या धडकेने दुचाकी स्वराचा मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी सायंकाळी पावणे सातच्या सुमारास घडली. याप्रकरणी सिटी बस चालकाविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

देविदास लिंगय्या दासरी (वय ४०, रा. चंद्रोदय नगर, जे बी बार जवळ, कुंभारी रोड, सोलापूर) असे मृत दुचाकीस्वाराचे नाव आहे. याबाबत लक्ष्मी देविदास दासरी (वय ३७, रा. चंद्रोदय नगर, जे बी बार जवळ, कुंभारी रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सिटी बस क्र. एमएच १३ बी ९६८० चा चालक कृष्णा विठ्ठल इरकल यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुक्रवारी सायंकाळी सहाच्या सुमारास देविदास दासरी हे त्यांच्या एमएच १३ बीटी ५.२५०२ क्रमांकाच्या दुचाकीवरून एम आयडीसी ते विजयनगर असे जात होते. त्यावेळी विनायक नगर येथील देशी दारू दुकानाच्या पुढे मनपा बस क्रमांक एम एच १३ बी ९६ ८० चा चालक कृष्णा इरकल यांने सिटी बस दुचाकीला ओव्हरटेक करताना दुचाकीला धक्का दिला. त्यामुळे दुचाकी वरील देविदास दासरी हे खाली पडून त्यांच्या डोक्यास मार लागून गंभीर जखमी होऊन बेशुद्ध झाले. त्यामुळे त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असता डॉक्टर पूजा लवटे यांनी बासरी यांना मृत घोषित केले.

दासरी यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक बंडगर पुढील तपास करीत आहेत.



### जननायक बिरसा मुंडा यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

नवी पेठ येथील महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळात जननायक बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ,महेश वालावलकर, सारंगा अंजीखाने, अमोल गायकवाड, अबरार डोंगरी, तुकाराम भोसले, भालचंद्र साखरे, सचिन साखरे आदी उपस्थित होते.

# नगरपालिका निवडणूक : अर्ज दाखलसाठी उद्या शेवटचा दिवस

### शनिवारपर्यंत अध्यक्षासाठी ४८ तर सदस्यासाठी ८२० अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

राज्यातील २४६ नगर पालिका व ४२ नगरपंचायतीच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु असून, या निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल केले जात आहेत. सोलापुरात ११ नगरपालिका आणि १ नगरपरिषदेसाठी ही निवडणूक घेण्यात येत असून, या निवडणुकीसाठी जिल्ह्यातून आजतागायत अध्यक्षपदासाठी ४८ तर सदस्यपदासाठी ८२० अर्ज दाखल झाले आहेत. तर ऑफलाईनद्वारे अध्यक्षासाठी २ तर सदस्य पदासाठी ५४ अर्ज दाखल झाले आहेत. तर ऑफलाईनद्वारे अध्यक्षपदासाठी ६ आणि सदस्यासाठी ११४ अर्ज दाखल झाले आहेत. दरम्यान, सोमवार, दि. १७ नोव्हेंबर ही अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे.

राज्यातच एकीकडे राजकिय पक्षांकडून उमेदवार जाहीर करून उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या हालचाली सुरु आहेत तर दुसरीकडे उमेदवारी अर्ज दाखल करून घेणे, आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी, निवडणूक प्रक्रिया व प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया राबविणे यासाठी प्रशासनाकडून युध्दपातळीवर तयारी केली जात आहे.

आज शनिवार, दि. १५ रोजी जिल्ह्यातून अध्यक्षपदासाठी १५ आणि सदस्यासाठी ३७८ जणांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. तर आज ऑफलाईनद्वारे अध्यक्षपदासाठी ५ आणि ६३ अर्ज सदस्यपदासाठी दाखल झाले आहेत. गेल्या ६ दिवसात अध्यक्षपदासाठी ४८ तर सदस्यपदासाठी ८२० अर्ज दाखल झाले आहेत. दरम्यान, या निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आता सोमवारचा एकच दिवस बाकी आहे. तर ता. १८ नोव्हेंबर रोजी छाननी, ता. २१ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज माघारी घेता येणार असल्याचे जाहिर करण्यात आले. यानंतर किती उमेदवार निवडणूक रिंगणात राहणार हे येणारा काळच सांगणार आहे.

# अतिवृष्टीमुळे उजनीसह इतर प्रकल्पांतही १०० टक्के पाणीसाठा

### उन्हाळ्यात पाणी जपून वापरण्याची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

येथील उजनी धरणाच्या इतिहासात यंदा प्रथमच धरण मे महिन्यातच जिवंत साठ्यात आले होते; गेल्या वर्षीही हे धरण एकशे दहा टक्के भरल्यानंतर जिवंत साठा संपून वजा २३ टक्केपर्यंत धरणाची पातळी खालावली होती; म्हणजेच पाण्याच्या वापराचा अतिरेक झाला होता. सध्याही या धरणात १०० टक्के पाणीसाठा आहे म्हणजेच ११० टीएमसीच्यावर पाणीसाठा आहे. उजनी धरणक्षेत्रातच नाहीतर अवघ्या जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याने आणि महापूर आल्याने जवळपास सर्वच तलावात आजही १०० टक्के पाणीसाठा आहे. तरीही शेतकरी बांधव आणि इतर नागरिकांनी आगामी उन्हाळ्यात पाण्याचा वापर जरा जपूनच करावा, असे आवाहन जिल्हा प्रशासन आणि उजनीच्या संबंधित यंत्रणेकडून करण्यात येत आहे.

उजनी हे महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या धरणांपैकी एक आहे. या धरणाची पाणी क्षमता ही ११७ टीएमसी आहे. यंदा या धरणक्षेत्रात अतिवृष्टी झाल्याने मोठा विसर्ग येत होता; यामुळे लाखो क्युसेसने पाणी नदीपात्रात सोडण्यात आले. यामुळे खालील गावांना पुराचा तडाकाही बसला. सध्या धरणाखालील नदीपात्रात आणि शेतकऱ्यांच्या शेतातील विहिरीत, शेततळ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणीसाठा असल्याने अद्यापपावेतो पाणी मागणी होत नाही. शेतकऱ्यांच्या आसपासचे साठवण तलाव, पाझर तलावातही मोठ्या प्रमाणात पाणी आहे; यातूनच शेतकरी आपल्या पिकांची तहान सध्या भागवत आहेत. पिण्याच्या पाण्याचीही नागरिकांची सोय असल्याने धरणातून सोडण्यात येणारे पहिले पाणी आवर्तनही लांबणार आहे. मागील वर्षी देखील चांगला पाऊस झाला होता. त्यामुळं धरण पूर्ण क्षमतेनं भरलं होतं. या धरण क्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर बागायती शेती अवलंबून आहे. विशेषत ऊस शेती मोठ्या प्रमाणावर आहे. त्याचबरोबर केळी, डाळिंब, द्राक्षांच्या बागांचं क्षेत्र देखील मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळं उजनी धरण भरणे, ही शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारी बाब ठरते. एकंदरीत, उजनी धरण ओव्हरफ्लो झाले की, जिल्ह्यातील शेतकरी बांधव बिनधास्त असतात.



पुणे, सोलापूर आणि नगरकरांसाठी जीवनदायिनी ठरलेल्या उजनी धरणात यंदा अपेक्षेपेक्षा जास्तच पाणीसाठा झाला आहे. यंदा पुणे जिल्ह्याच्या घाटामाथ्यावर आणि उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाऊस पडला होता.

उजनी धरणाची एकूण पाणी साठवण क्षमता १२३ टीएमसी इतकी असून, जेव्हा धरण ११७ टीएमसी इतकं भरलं जातं तेव्हा ते १०० टक्के क्षमतेने भरतं. आजतागायत तरी उजनीत १०० टक्के पाणीसाठा आहे आणि याचा फायदा उन्हाळ्यात तीन जिल्ह्यातील शेतकरीबांधव, नागरिकांना होणार आहे. यामुळे गतवर्षीप्रमाणे पाणी वापराचा अतिरेक न करता यंदा पाणी जपूनच वापरावे, असे आवाहन संबंधित यंत्रणेकडून करण्यात येत आहे.

# मंद्रुपचे तहसीलदार बनले हिंगोलीचे सहजिल्हा निबंधक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**

मंद्रूप अप्पर तहसीलचे तहसीलदार सुजित नरहरे यांना पदोन्नती मिळाली असून त्यांची हिंगोली येथे सह जिल्हा निबंधक या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. तहसीलदार नरहरे यांनी दीड वर्षापूर्वी मंद्रूप अप्पर तहसीलचा पदभार घेतला होता.



या काळात शेतकरी नुकसानभरपाई, शेतरस्ते, अवैद्य मुरूम व वाळू उपसा या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांनी दोन वर्षापासून ते पदोन्नतीच्या प्रतीक्षेत होते. अखेर शासनाने उपजिल्हाधिकारी पदाचे पदोन्नती दिली आहे. दीड वर्षाच्या काळात मंद्रूप परीसरातील शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. तसेच या काळात शाळेच्या विद्यार्थ्यांना विनाविलंब व विनाझंझट दाखले मिळवून देण्यासाठी काम केल्याचे तहसीलदार नरहरे यांनी सांगितले. निवडीनिमित्त तलाठी संघटनेचे अध्यक्ष महेश शेड्याळ, माजी अध्यक्ष रावसाहेब कोकरे, आदींनी अभिनंदन केले.

# स्थानिक निवडणुकांसाठी पुणे विभागातून पाच उपजिल्हाधिकारी आले सोलापुरात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ नोव्हेंबर-**


राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार सध्या नगरपालिका व नगरपंचायतीच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. पुढील आठवड्यात जिल्हा परिषदेच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु होण्याची शक्यता आहे. त्यामुळे निवडणुकीच्या कामाचा अतिरिक्त भार महसूल खात्यावर वाढला आहे. महसूल खात्यात मुळातच अधिकारी व कर्मचारी यांची वाणवा असल्याने प्रशासनावर कामाचा ताण वाढला होता. मात्र पुणे विभागीय कार्यालयाकडून सोलापूरसाठी पाच उपजिल्हाधिकारी यांची खास निवडणुकीसाठी नियुक्ती करण्यात आली असल्याने हे अधिकारी प्रशासनाच्या मदतीला धावून आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी दिली.

नगरपालिका व नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी तहसीलदार व प्रांताधिकारी हे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहत आहेत. अशातच काही तहसीलदारांची पदोन्नती झाली आहे. मात्र निवडणूक कामकाज संपल्याशिवाय या तहसीलदारांना कार्यमुक्त न करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती व महापालिका निवडणुकीच्यावेळी महसूल खात्याची यंत्रणा निवडणूक कामात व्यस्त असणार आहे. मतदार यादी प्रसिध्द करण्यापासून ते मतदान व मतमोजणीची सर्व प्रक्रिया ही प्रामुख्याने महसूल खात्यातील अधिकारी व कर्मचारी यांच्यावर अवलंबित आहे. मात्र जिल्हा प्रशासनात अनेक अधिकारी व कर्मचारी यांची पदे रिक्त असल्याने पुणे विभागीय आयुक्तांनी सोलापूर महसूल खात्याकडे पाच विशेष उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती निवडणूक कालावधीसाठी केली असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी दिली. पुढील आठवडयात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे.

यासाठी समन्वय अधिकारी यांच्या नेमणुकाही करणे आवश्यक आहे. विभागीय आयुक्त यांच्याकडून देण्यात आलेल्या उपजिल्हाधिकाऱ्यांमुळे या कामात अधिक नियंत्रण व गती येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाकडून निवडणूक कामासाठी उपजिल्हाधिकारी अनिल कारंडे, किरण काकडे, नितीन गवळी, राधिका बारटक्के, सुनिता आस्वदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार हे अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालयात रुजू झाल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी पाटील यांनी दिली.









**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

लातूर
# दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## कॉक्सिटमध्ये शुक्रवारी राष्ट्रीय परिसंवाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ नोव्हेंबर :** येथील रॉयल एज्युकेशन सोसायटीच्या कॉक्सिट महाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान विभागातर्फे शुक्रवारी (दि. २१) राष्ट्रीय पातळीवरील एक दिवसीय सेमिनाराचे आयोजन करण्यात आले आहे.

या सेमिनारमध्ये मूल्यवर्धित जैव उत्पादनांची निर्मिती, कमी किमतीच्या रॉ-मटेरियलपासून बायो-हेल्थ प्रॉडक्ट्सची निर्मिती, उद्योग संशोधनातील नवनवीन प्रवाह तसेच आंतरराष्ट्रीय संशोधन व उच्च शिक्षणातील संधी यांसारख्या विषयांवर चर्चा होणार आहे.

या सेमिनारासाठी देश-विदेशांतील तज्ज्ञ उपस्थित राहणार आहेत. त्यात थायलंडच्या हत्याई येथील प्रिन्स ऑफ सॉंगकोला विद्यापीठाचे प्रोफेसर डॉ. बेंजाकूल व शैक्षणिक संशोधक डॉ. उमेश पाटील, राष्ट्रीय कृषी-अन्न व जैव उत्पादन संस्था मोहाली येथील डॉ. शिवराज निळे, पुण्याच्या नॅशनल केमिकल लॅबोरेटरीचे डॉ. महेश पाटील मार्गदर्शन करणार आहेत.

शुक्रवारी (दि. २१) सकाळी ९ वाजता उद्घाटन होणार आहे. मर्यादित जागांमुळे पूर्वनोंदणी आवश्यक आहे. विद्यार्थी व संशोधकांनी सहभागी होऊन या परिसंवादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थाध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील, प्राचार्य डॉ. विनायक जाधव यांनी यांनी केले आहे.

# भाजपमधील अंतर्गत गटबाजी संपली तरच मिळणार निर्भेळ यश?

**त.भा. वृत्तसेवा/श्रीधर स्वामी**

**लातूर, १५ नोव्हेंबर :** मागच्या काही वर्षात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा बालेकिल्ला अशी असलेली लातूर जिल्ह्याची ओळख आता कालबाह्य झाली आहे. त्यामुळे कधीकाळी काँग्रेसमय असणारा हा जिल्हा आता भाजपमय झाल्याचे दृष्टीपथास येते. आज भाजपमध्ये जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात नेत्यांचे, पदाधिकारी-कार्यकर्त्यांचे मजबूत जाळेही निर्माण झाले आहे. जिल्हा भाजपमध्ये आजमितीस केवळ नेतेच वाढले आहेत असे नसून त्याबरोबरच अंतर्गत गटबाजी, मतभेद-मनभेदही वाढल्याचे सर्वज्ञात आहेच. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षाचे प्राबल्य लक्षणीय आहे. तरीही भाजपमधील अंतर्गत गटबाजी संपली तरच निर्भेळ यश मिळेल. अन्यथा काहीही होऊ शकते, असा मतप्रवाह निष्ठावंत कार्यकर्त्यांतून व्यक्त होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

नुकत्याच जाहीर झालेल्या बिहार विधानसभेच्या निकालाने केवळ लातूर जिल्ह्यातीलच नव्हे तर संपूर्ण राज्यभरातील भाजप नेते आणि पदाधिकाऱ्यांचा उत्साह दुणावला आहे. महाराष्ट्र विधानसभेच्या निकालाचीच पुनरावृत्ती बिहारमध्येही झाल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे येणाऱ्या काळात महाराष्ट्राप्रमाणे बिहारच्या निकालांवरही संदेह व्यक्त केला गेल्यास नवल वाटू नये. मागच्या तीन साडेतीन वर्षांच्या कालखंडानंतर राज्यात आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे पडघम सुरु झाले आहेत. या निवडणुका तीन टप्प्यात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पहिल्या टप्प्यात मुदती संपून गेलेल्या नगर परिषदा, नगर पंचायतच्या निवडणूक होत आहेत. लातूर जिल्ह्यातील अहमदपूर, औसा, निलंगा, उदगीर या नगर परिषदांच्या तर शिरूर अनंतपाळ व रेणापूर नगर पंचायतच्या निवडणुका होत आहेत. या निवडणुकांसाठी भारतीय जनता पार्टीने जिल्हा निवडणूक प्रमुख म्हणून आ. अभिमन्यू पवार, लातूर शहर निवडणूक प्रमुख म्हणून डॉ. सौ. अर्चनाताई शैलेश पाटील चाकूरकर यांची तर जिल्हा निवडणूक प्रभारी म्हणून माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांची नेमणूक केली आहे. या नेत्यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली स्थानिक स्वराज्यच्या जिल्ह्यातील निवडणुका पार पाडल्या जाणार आहेत.

भाजपच्या जिल्ह्यातील नेत्यांत कोणाचे, कोणाशी किती सख्य आहे, हे चाणाक्ष मतदारांना स्पष्ट शब्दात सांगण्याची आवश्यकता नाही. जिल्ह्यातील भाजपच्या कोणत्या नेत्यांतून विस्तवही जात नाही, ही बाब भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनाही चांगलीच ज्ञात आहे. त्यामुळेच जिल्ह्यातील ही अंतर्गत गटबाजी संपविण्याच्या दृष्टीनेच निवडणूक प्रमुख आणि प्रभारींच्या नेमणुका करण्यात आल्याची चर्चाही जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात चालू आहे.

जिल्ह्यात काही नेते परस्परांवर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात आपलेही आणि पक्षाचेही नुकसान करुन घेत असलेले पाहायला मिळाले आहे. कोणी कितीही नाही म्हटले तरी लातूर शहर विधानसभा मतदार संघातून भाजपच्या उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील यांचा पराभव अंतर्गत गटबाजीच्या कारणावरुनच झाल्याची चर्चा आजही लातूरच्या राजकारणात चवीने केली जाते. त्यामागच्या कारणांचा शोध घेतल्यास त्यातील बारकावे राजकीय विश्लेषकांच्या दृष्टीपथास येऊ शकतात. किमान अशी वेळ भविष्यात पार पडणाऱ्या कोणत्याही निवडणुकीत येणार नाही, याची दक्षता घेण्यासाठीच प्रदेश भाजपने निवडणूक प्रमुख आणि प्रभारींचा पर्याय निवडल्याचे सांगण्यात येते. त्याची सुरुवात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपासून करण्यात आली आहे. आज लातूर जिल्ह्यात भाजपची ताकद एवढी आहे की, प्रमुख नेत्यांनी ठरविल्यास ते काहीही करु शकतात. फक्त संबंधितांनी केवळ आपले हितसंबंध न पाहता प्रामाणिकपणे पक्षासाठी कार्य करण्याचा निर्धार केल्यास ते सहज शक्य आहे. काही नेत्यांचे स्वपक्षातील नेत्यांपेक्षा अन्य पक्षातील नेत्यांशी निकटचे संबंध असल्याचेही दृष्टीपथास येते. अन्य पक्षातील नेत्यांसोबत त्यांनी जरूर निकटचे संबंध ठेवावेत.पण, निवडणुकीपुरते तरी आपल्या पक्षाशी, पक्षाच्या विचारांशी प्रामाणिक राहावे, अशा अपेक्षा निष्ठावंत भाजप पदाधिकाऱ्यांतून व्यक्त होताना पाहायला मिळतात. म्हणूनच भाजपमधील अंतर्गत गटबाजी संपली तरच पक्षाला निर्भेळ यश मिळू शकते, असा मतप्रवाह जिल्ह्यात वाढीस लागला आहे.

## बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त 'जनजातीय गौरव' दिवस



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ नोव्हेंबर :** भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात जिल्हास्तरीय जनजातीय गौरव दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसीलदार संतोष बनकर होते. लातूर जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त विस्तार अधिकारी राजाराम आत्राम, गृहपाल विनायक बिरादार, पांडुरंग नागरगोजे, श्रीमती उर्मिला गव्हाणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आदिवासी विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेवून आपल्या कुटुंबाच्या आणि समाजाच्या प्रगतीसाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन तहसीलदार श्री. बनकर यांनी केले. सेवानिवृत्त विस्तार अधिकारी श्री. आत्राम यांनी क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमात आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थिनींनी आदिवासी लोकनृत्य व लोकगीतांचे सादरीकरण केले. शासकीय सेवेत दाखल झालेल्या वसतिगृहातील माजी विद्यार्थ्यांचा, पालकांसह यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक पांडुरंग नागरगोजे, गृहपाल यांनी, विनायक बिरादार यांनी उपस्थितांचे आभार मानले. सूत्रसंचालन कु. माधवी कोटमाळे व कु. शिल्पा शिंदे यांनी केले. कार्यक्रमास आदिवासी मुलांचे व मुलींचे वसतिगृह येथील कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



## श्री केशवराज विद्यालयात बिरसा मुंडा जयंती उत्साहात साजरी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ नोव्हेंबर :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि.१५ नोव्हेंबर २०२५ शनिवार रोजी स्वातंत्र्य सेनानी, आदिवासी समाजाचे जननायक भगवान बिरसा मुंडा यांची जयंती तसेच भगवान बिरसा मुंडा जनजाती गौरव पंधरवडा उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता व बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

याप्रसंगी मंचावर विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, पर्यवेक्षक धनंजय कुलकर्णी, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, परिपाठ प्रमुख लता कुलकर्णी, ज्ञानोपासक मंडळ प्रमुख श्रीमती तेजस्विनी सांजेकर, कार्यक्रम प्रमुख श्रीमती प्रज्ञा नाईक यांची उपस्थिती होती.

यावेळी कार्यक्रमात विद्यार्थिनींनी क्रांतिकारक बिरसा मुंडा यांच्या तेजस्वी जीवनचरित्रावर आधारित विविध कलाकृती आणि माहिती सादर करून त्यांच्या योगदानाला आदरांजली वाहिली. इयत्ता आठवी 'अ' वर्गातील विद्यार्थिनी कु. माहेश्वरी मेघराज पाटील हिने भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवन चरित्रावर आधारित विषय मांडणी केली. तिने बिरसा मुंडा यांचे स्वातंत्र्यलढ्यातील कार्य, आदिवासी समाजासाठी दिलेले योगदान आणि त्यांचे धरती आबा हे स्वरूप उपस्थितांना समजावून सांगितले.

तसेच कु. मैथिली साधू जाधव या विद्यार्थिनीने बिरसा मुंडा यांच्या जीवनचरित्रावर आधारित एक आकर्षक आणि माहितीपूर्ण भित्तिपत्रक तयार केले. या भित्तीपत्रकात त्यांच्या कार्याचा आणि संघर्षाचा प्रवास उतरवण्यात आला होता. तसेच कु. सायली दत्ता सुडके या विद्यार्थिनीने बिरसा मुंडा यांचे सुंदर आणि बोलके चित्र रेखाटून आपल्या कलागुणांचे दर्शन घडवले.

याप्रसंगी मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी बिरसा मुंडा यांचा जीवनपरिचय व त्यांचे कार्य विद्यार्थ्यांना सांगितले. ज्ञानोपासक मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या या शासकीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रज्ञा नाईक यांनी केले. यावेळी विद्यालयातील आठवी ते दहावी विभागातील विद्यार्थी आणि शिक्षकांची उपस्थिती होती.

## सहकारी पतसंस्था संघाच्या वतीने सहकार मंत्री पाटील यांचा सत्कार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ नोव्हेंबर :** लातूर येथे सहकार भवन मंजूर केल्याबद्दल राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा शनिवारी लातूर जिल्हा सहकारी पतसंस्था संघाच्या वतीने हृद्य सत्कार करण्यात आला.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पतसंस्था संघाचे अध्यक्ष व जिल्हा बँकेचे संचालक अशोक गोविंदपुरकर यांनी राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्याकडे लातूर शहरातील डालडा फॅक्टरीच्या रिकाम्या जागेत सहकार भवनची इमारत बांधण्याची मागणी केली होती. ती मागणी सहकार मंत्र्यांनी त्याच वार्षिक सभेत मान्य केली.

एवढेच नव्हे तात्काळ पुढील मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठवाड्यातील या दुसऱ्या सहकार भवनासाठी ३२ कोटीचा निधीही मंजूर करून दिला. त्याबद्दल सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा शिरूर ताजबंद या ठिकाणी जाऊन जिल्हा पतसंस्था संघाचे वतीने सत्कार करुन त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

यावेळी जिल्हा सहकारी पतसंस्थेच्या वतीने सहकार मंत्री पाटील यांच्याकडे इमारतीमध्ये सहकार न्यायालयासाठी सुद्धा जागा उपलब्ध करून द्यावी,



अशी मागणी करण्यात आली. जेणेकरून सर्व सहकाराची कार्यालय एका छताखालीच असतील. त्याचा जनतेस फायदा होईल अशी मागणी केली.

या सत्कार प्रसंगी पतसंस्था संघाचे अध्यक्ष अशोक गोविंदपुरकर यांच्यासह उपाध्यक्ष मंचकराव पाटील, सचिव ॲड. शिवराज सुगरे, संचालक सर्वश्री बाबुराव सोमवंशी, धोंडीबा वंगाटे, शिवाजी कांबळे, रमेश बिराजदार, जाधव आदी उपस्थित होते. याप्रसंगी उदगीर येथील सर्वपल्ली राधाकृष्णन कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने सहकार मंत्री महोदयांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

## माजी आमदार कव्हेकरांकडून शेख परिवाराचे सांत्वन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ नोव्हेंबर :** जननायक संघटनेच्या लातूर शहर अध्यक्षा साहेराबी



शेख यांचे पती व लातूर शहरातील इंडिया नगर भागातील रहिवासी कै. फैय्याज शेख (६५ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना-नातवंडे असा परिवार आहे. या घटनेची माहिती मिळताच भाजपा नेते तथा भाजपा राष्ट्रीय किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी त्यांच्या इंडिया नगर, भागातील निवासस्थानी भेट देऊन शेख परिवाराचे सांत्वन केले.

यावेळी बोलताना माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले की, आम्ही आपल्या दु:खात सहभागी आहोत आपणास या दु:खातून सावरण्याचे बळ मिळो ही ईश्वरचरणी प्रार्थना अशी भावनिक प्रार्थनाही त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली.

यावेळी शेख परिवारातील साहेराबी शेख, मुजफर शेख, मजहर शेख, नाहीद मुलानी, समीर मुलानी यांच्यासह शेख परिवारातील सदस्य उपस्थित होते.

## काशिलिंगेश्वर रहिवाशांना असुविधामुळे मानसिक त्रास

### दुसऱ्यांदा कार्यकारी अभियंता यांना निवेदन



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ नोव्हेंबर :** लातूर शहरालगत काशिलिंगेश्वर नगर ग्रामपंचायत हद्दी मधून जाणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक ते हॉटेल दिग्विजयपर्यंत राष्ट्रीय महामार्गावर दोन्ही बाजूस व विशेषतः रेल्वे उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूस सर्व्हिस रोड व नाली काम करणे आणि या महामार्गावरील दुभाजक मध्ये पथदिवे बसवणे बाबत दुसऱ्यांदा कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, लातूर यांना निवेदन देण्यात आले.

याच गंभीर समस्या बाबत दिनांक ९ मे २२ रोजी पहिले निवेदन देण्यात आले होते. आत्तापर्यंत त्या निवेदनातील केवळ एकच मागणी ती म्हणजे अपघात होणाऱ्या ठिकाणी गतिरोधक तयार करणे ही मागणी पुर्ण करण्यात आली आहे, त्यामुळे अपघाताचे प्रमाण पुर्णपणे घटले आहे. परंतु इतर महत्त्वाच्या समस्या जसे की, आपल्या हद्दीतून जाणाऱ्या या राष्ट्रीय महामार्गावर आपल्या ग्रामपंचायतीचा भाग येतो जो की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक ते दिग्विजय हॉटेलपर्यंत आहे. या महामार्गावर दोन्ही बाजूस सर्व्हिस रोड, नाली बांधकाम व दुभाजक मध्ये स्ट्रीट लाईट बसवणे हे अत्यंत महत्त्वाचे व खूप गरजेचे आहे. विशेषतः रेल्वे उड्डाणपूलाच्या आसपास राहणाऱ्या रहिवाशांना या सुविधा नसल्यामुळे प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

सदरील कामे संबंधित विभागाने आत्तापर्यंत पूर्ण करणं खूप गरजेचे होते, परंतु संबंधित विभागाकडून अद्याप कोणतीही कारवाई याबाबत करण्यात आलेली नाही. सदरील निवेदन देताना ॲड. किरण आर.बडे, ॲड. प्रभाकर केदार, महादेव जमादार, विष्णु शिंदे, उदय गोजमगुंडे, बस्वराज खानापुरे, विलास शिंगडे, परमेश्वर माने, रघुनाथ गिरी, दशरथ फड, दादासाहेब मिसाळ, लक्ष्मण बसपुरे, गोविंद दहिफळे, सदानंद गर्जे महाराज, संदीप डोंगरे, सुर्यकांत उडगे, गोविंद भुसनवाड, चित्रानंद कराड, ॲड. योगेश बनसुडे, ॲड. सतिष धायगुडे आदी उपस्थित होते.

## लोकशाही मजबुतीसाठी विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक महत्त्वाची : तहसीलदार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ नोव्हेंबर :** भारत हा लोकशाही प्रधान देश आहे आणि लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी शालेय स्तरावर विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक अत्यंत महत्त्वाची ठरते. या प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांना निवडणूक व्यवस्थेची जवळून ओळख होते व त्यांच्यात नेतृत्वगुण, जबाबदारीची जाणीव आणि नागरिकत्वाचे भान विकसित होते, असे मत लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी व्यक्त केले. साने गुरुजी माध्यमिक विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ च्या विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक उपक्रमाच्या समारोप समारंभ प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. पुढे म्हणाले की, साने गुरुजी विद्यालयाने राबवलेला हा आदर्शवत



उपक्रम विद्यार्थ्यांना मतदानाचे स्वरूप, महत्त्व आणि निवड प्रक्रिया जवळून अनुभवण्याची संधी देतो. या उपक्रमांमुळे भविष्यातील जागरूक नागरिक घडतात.

याप्रसंगी माध्यमिक विभागाच्या (नियोजन) शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, सानेगुरुजी शैक्षणिक संकुलाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज माने, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी गोविंद माने, नागोराव कांबळे, उषा राठोड, शाळेचे मुख्यालय इस्माईल शेख, रवी कुलकर्णी आदि उपस्थित होते.

या प्रसंगी उपस्थित शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हणाल्या, विद्यालयाने राबवलेल्या चुनावी पाठशाळा अर्थात विद्यार्थी प्रतिनिधी निवडणुक या उपक्रमात मतदान करणारे सर्व विद्यार्थी हे केवळ शाळेचे विद्यार्थी न राहता, आता आमचे प्रतिनिधी आणि मित्रदेखील झाले आहेत. त्यांची जबाबदारी आता वाढली असून, त्यांनी आपल्या कुटुंबातील सदस्य, नातेवाईक तथा परिसरातील मतदारांना मतदानाचे महत्त्व सांगून मतदानासाठी प्रेरित करून मतदानाचा टक्का वाढवावा जेणेकरून लोकशाही जिवंत राहील.

या विद्यार्थी प्रतिनिधी निवडणुकीमध्ये ९१५ विद्यार्थी मतदाराने आपल्या मतदानाचा हक्क बजावला. ज्यामध्ये १२५ मते घेत चि. ढवळे धैर्यशील बाळासाहेब या विद्यार्थ्याने शाळेचा विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून बाजी मारली तर कुमारी राठोड पुनम अविनाश या विद्यार्थिनीने ११५ व चि. धपाटे विनायक अशोक यांनी १०६ मते घेत अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. या निवडणूक प्रक्रियेत शाळेचे मुख्याध्यापक इस्माईल शेख यांनी निवडणूक निर्णय अधिकारी व विभाग प्रमुख गंगाधर डिगोळे यांनी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक इस्माईल शेख यांनी तर आभार गंगाधर डिगोळे यांनी मानले. सूत्रसंचलन गणेश परळे यांनी केले.

या कार्यक्रमासाठी सहशिक्षक स्मिता कावळे, शशिकांत पवार, कमल काळगापुरे, मीनाक्षी यादव, सचिन माने, हरिदास कोयले, शिवगंगा जगताप, कोमल डोणगावे, सतीश गायकवाड, अमोल पवार, नवनाथ वडवळे, वैभव धोत्रे, सुनंदा पाटील, दयानंद लहाडे, पौर्णिमा बनसोडे यांनी परिश्रम घेतले.

# शाश्वत शेती-समृद्ध शेतकरी अभियानांतर्गत निलंगा तालुक्यात प्रक्षेत्र भेट

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, १५ नोव्हेंबर :** शाश्वत शेती-समृद्ध शेतकरी या अभियानांतर्गत शुक्रवार दि. १४ नोव्हेंबर रोजी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी लातूर यांच्या मार्गदर्शनाखाली निलंगा तालुक्यातील विविध गावांमध्ये आज प्रक्षेत्र भेट व मासिक चर्चासत्र संपन्न झाले.

या दौऱ्यात तालुक्यातील तूर, हरभरा, ज्वारी यांसह केळी, पपई, पेरू, सीताफळ, ड्रॅगनफ्रूट या फळबागांची पाहणी करून शेतकऱ्यांच्या अडचणी जागेवरच सोडविण्यात आल्या. मांजरा कृषी संशोधन केंद्राचे डॉ. सचिन डिग्रसे व कृषी विस्तार विद्यावेत्ता डॉ. वसंतराव सूर्यवंशी यांनी रोगग्रस्त झाडांचे निदान, प्रतिबंधात्मक उपाय, खत व्यवस्थापन, सिंचन तंत्र आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पीक पद्धतीत सुधारण्याबाबत मार्गदर्शन केले. निलंगा उपविभागीय अधिकारी शरद झाडके यांनी प्रतिकूल



परिस्थितीतही उत्कृष्ट फळबागा आणि आधुनिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे कौतुक केले.

यावेळी बोलताना ते म्हणाले, विद्यापीठाने ठरवून दिलेल्या हेक्टरी उत्पन्नापेक्षा जास्त उत्पादन निलंगा तालुक्यातील शेतकरी घेत आहेत. हवामान बदलाचा विचार करून पीक पद्धती बदलणे अत्यावश्यक असून शाश्वत शेतीकडे वाटचाल करण्याची गरज आहे. तूर, हरभरा, ज्वारी, कांदा पिकांची स्थिती केळी, पपई, पेरू, सीताफळ, ड्रॅगनफ्रूट, फळबागांचे निरीक्षण, रोगनियंत्रण, खत नियोजन, सिंचन व्यवस्थापन, शेततळे व सेंद्रिय पद्धतींचा आढावा प्रक्रिया केंद्र, गुळ पावडर, काजू प्रक्रिया युनिटची पाहणी करण्यात आली.

या भेटीदरम्यान पथकाने तालुक्यातील गौर, हणुमंतवाडी मुगाव, केळगाव, निलंगा, अनसरसवाडी, हलगरा, वळसांगवी, कलांडी, अनसरवाडा येथील २ हजार मेट्रिक टन क्षमतेचे गोडाऊन तसेच राज्य कृषी यांत्रिकीकरण योजने तुन घेतलेले किसान ड्रोन याची पण पहाणी केली.

यावेळी डॉ. सचिन डिग्रसे- मांजरा कृषी संशोधन केंद्र, डॉ. वसंत सूर्यवंशी - कृषी विस्तार विद्यावेत्ता,

तालुका कृषी अधिकारी, नाथराव शिंदे - निलंगा, सचिन बावगे - अहमदपूर, नितीन कांबळे - रेणापूर, शिवचंद्र पाल जाधव - चाकूर, प्रमोद राठोड - लातूर, दत्तात्रेय हाके - औसा, संदीप वळकुंडे - उदगीर, संजयकुमार ढाकणे - शिरूर अनंतपाळ, कृष्णा मुंडे - देवणी, कृषी पर्यवेक्षक - सुनील घारुळे, वाघमारे, येवले, कदम, साहेबराव सोनकांबळे या प्रक्षेत्र भेटीत शेतकऱ्यांच्या विविध शंकांचे समाधान करत आधुनिक शेतीतून अधिक उत्पादन घेण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन देण्यात आले.



## लालबहादूर शास्त्री विद्यालयात बिरसा मुंडा जयंती उत्साहात

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १५ नोव्हेंबर :** लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात बिरसा मुंडा जयंती उत्साहात संपन्न झाली. याप्रसंगी व्यासपीठावर उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर, प्रमुख पाहुणे राहुल नेटके, मनिषा आचार्य, मंजुषा रुद्रवार, स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शंकरराव लासुणे, ॲड. शिवाजीराव बिराजदार, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले, बिरसा मुंडा यांच्यावेशभुषेत सौम्यक जोंधळे मयंक अनंतवाळ उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे राहुल नेटके यांनी आजचा दिवस जनजाती गौरव दिन म्हणून साजरा केला जातो.आदिवासी जमाती फार प्राचीन काळापासूनची जमात आहे भारतीय संस्कृती, कला यांचे जतन व पर्यावरणाचे संरक्षण करणारी ही जमात असून बिरसा मुंडा यांनी आदिवासींना ब्रिटिश सत्तेच्या शोषणापासून वाचवण्यासाठी लढा दिल्याचे सांगितले. मनिषा आचार्य यांनी बिरसा मुंडा यांच्या कार्याची माहिती दिली तर मंजुषा रुद्रवार यांनी बिरसा मुंडा यांचा धगधगता संघर्षमय इतिहास विद्यार्थ्यांसमोर मांडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रास्ताविक व आभार विद्यार्थ्यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनिता येलमटे, निलेश मांडवकर, लक्ष्मी चव्हाण यांसह व्यवस्थेतील सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले.

# स्थानिक स्वराज्य संस्थेत काँग्रेसचा झेंडा फडकवणार : साळुंके

## बाळासाहेब सूर्यवंशी हलकीकर यांचा भाजपातून काँग्रेस प्रवेश

**त.भा. वृत्तसेवा**

**निलंगा, १५ नोव्हेंबर :** निलंगा विधानसभा मतदारसंघातील बाळासाहेब सूर्यवंशी हलकीकर यांनी मोठे शक्ती प्रदर्शनाने दोनशे वाहनांच्या ताफ्यासह शेकडो कार्यकर्त्यांसह शुक्रवार दिनांक १४ नोव्हेंबर रोजी निलंगा येथे भाजपातून काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

यावेळी प्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांचे स्वागत करताना काँग्रेसचे लातूर जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे म्हणाले, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नगरपरिषद, नगरपंचायत, जिल्हा परिषद, व पंचायत समिती निवडणुकीत कार्यकर्त्यांच्या बळावर काँग्रेस पक्षाचा झेंडा फडकवणार असल्याचे ग्वाही दिली.

या पक्षप्रवेशावेळी जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे, डॉ. अरविंद भातांब्रे, शिरूर अनंतपाळ तालुका अध्यक्ष बाबासाहेब पाटील उजेडकर, सुधाकर पाटील, तिरुपती शिंदे,, बालाजी गोमसाळे, विठ्ठल पाटील, गोविंद सूर्यवंशी, अंबादास जाधव आदी उपस्थित होते. यावेळी बाळासाहेब सूर्यवंशी हलकीकर यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपमधून काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केले.

**वाहनांच्या ताफ्याने शहरवासियांचे लक्ष वेधले**

काँग्रेस पक्षात प्रवेश करण्यापूर्वी बाळासाहेब सूर्यवंशी हलकीकर यांनी निलंगा शहरातील मुख्य रस्त्यावरून काढलेल्या दोनशे वाहनांच्या ताफ्याने शहरवासियांचे लक्ष वेधून घेतले. शहराच्या मुख्य रस्त्यावरून २०० वाहनांच्या रांगामुळे शहरात थोड्या वेळासाठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.



यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे यांनी सत्ताधारी भाजप आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्यावर पदाचा गैरवापर करून विकास कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला असल्याची टीका केली. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीत गटातटाचे राजकारण न करता काँग्रेस पक्षाच्या सामान्य कार्यकर्त्याला सत्तेत येण्यासाठी बळ देणार असल्याचे सांगत स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काँग्रेस पक्षाचा झेंडा फडकवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# बिहार विजयाचा औशात जल्लोष

**त.भा. वृत्तसेवा**

**औसा, १५ नोव्हेंबर :** बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएला २४३ पैकी २०० पेक्षा अधिक जागा मिळाल्या.या भव्य विजयाचा जल्लोष औशात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

शहरातील भाजप कार्यकर्त्यांनी फटाके फोडून ढोल-ताशांच्या गजरात जल्लोष व्यक्त केला. या आनंद सोहळ्यात आमदार अभिमन्यू पवार आणि अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या हस्ते पेढे वाटून विजयाचा आनंद कार्यकर्त्यांनी आणि नागरिकांनी साजरा केला.



औसा नगरपालिकेतही 'कमळ' फुलणारच - डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर

अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या, बिहारच्या विजयाचा जल्लोष आपण साजरा करतो आहोत. मात्र हा उत्सव इथंच थांबणार नाही. औसा नगरपालिकेतही आपल्या विजयी भगव्या काफिल्याचा जल्लोष लवकरच सर्वत्र दिसेल. जनता विकासाला मत देते आणि औशाची जनता निश्रि्चतच विकासाचा मार्ग निवडेल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

आ.अभिमन्यू पवार म्हणाले, विकासाच्या बळावर भाजपा औसा नगरपालिकेत सत्ता स्थापन करणार आहे. बिहारमधील जंगलराज ला पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नितीशकुमार यांनी पूर्णविराम दिला. त्याचप्रमाणे औशातील जनता येथे असलेला जंगलराज संपवेल.असा विश्वास आ. पवार यांनी व्यक्त केला.

बिहारच्या विजयानंतर उत्साहाचे वातावरण पसरले असून औसा शहरासह तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये आगामी नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी आत्मविश्वास जाणवत आहे. शहरातील प्रमुख चौक, कार्यालये आणि कार्यकर्त्यांच्या भेटीगाठींमधून निवडणुकीची रंगत आणि विजयाची चाहूल स्पष्टपणे जाणवत आहे. याच विजयाचा फायदा आगामी नगरपालिका निवडणुकीत दिसून येणार आहे. यावेळी मोठ्या प्रमाणात पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# डॉ. विजय भटकर यांची विश्वेश्वर संकुलास ऐतिहासिक भेट



**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, १५ नोव्हेंबर :** भारतातील संगणक तंत्रज्ञानाचे पद्मभुषण, महाराष्ट्र भुषण डॉ. विजय भटकर यांनी औसा तालुक्यातील आलमला येथील विश्वेश्वर शैक्षणिक संकुलास भेट दिली. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या व्यक्तीमत्वाने ग्रामीण भागातील संस्थेला भेट दिल्यामुळे संस्थेच्या इतिहासातील हा ऐतिहासीक क्षण ठरला असून या भेटीतील मार्गदर्शनामुळे या संकुलातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला नवी दिशा मिळणार आहे.

संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, प्राचार्य प्रशांत धाराशिवे, डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, डॉ. कैलास कापसे, प्रशासकीय अधिकारी योगेश धाराशिवे, शिरीष उटगे, अशिष उटगे उपस्थित होते.

डॉ. विजय भटकर म्हणाले, महाराष्ट्रातील एक आदर्श संस्था म्हणुन विश्वेश्वरय्या संस्था उभी रहावी आशी माझी इच्छा आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी जिद्द व प्रामाणिक परिश्रमाच्या जोरावर जगाच्या पातळीवर यश संपादन करू शकतात. यासाठी या संस्थेने दिलेल्या संधीचा वापर करून विद्यार्थ्यांनी यश मिळवावे, असे आवाहन डा. भटकर यांनी केले. त्यांच्या या आव्हानाने उपस्थित विद्यार्थ्यांच्या मनात नवा आत्मविश्वास निर्माण झाला.

यावेळी शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, डॉ. सुरज मालपाणी, प्रा. मयुरी चंद्रवंशी व्दारा लिखीत पुस्तकाचे प्रकाशन डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. अंकुश बिडवे यांनी तर आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे यांनी केले.

**तपपुर्तीला अखेर यश मिळाले : धाराशिवे**

विश्वेश्वरय्या इन्स्टिट्यूट आफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नालाजी महाविद्यालयाने ठेवलेल्या टेक्निकल इव्हेंन्टसाठी १२ वर्षापासून सातत्यपुर्ण पाठपुरावा केला. यानंतर डॉ. विजय भटकर यांनी विश्वेश्वरय्या संकुलास भेट दिली. यामुळे तपपुर्तीला आखेर यश मिळाले. तर संस्थेच्या आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला नवी दिशा व नवी गती मिळाली. असे मत संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे यांनी यावेळी व्यक्त केले.

# रसिका महाविद्यालयात म्हेत्रे यांचे व्याख्यान संपन्न

**त.भा. वृत्तसेवा,**

**देवणी, १५ नोव्हेंबर :** येथील कै. रसिका महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कक्षा अंतर्गत नुकतेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगमार्फत राजपत्रित अधिकारी वर्ग-१ पदी निवड झालेले बोरोळ येथील रहिवाशी आकाश नामदेवराव म्हेत्रे यांचा सत्कार समारोह आणि स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी? या विषयावर व्याख्यान हा कार्यक्रम संपन्न झाला. जीवनात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थांनी शालेय जीवनातच आपले ध्येय निश्चित करुन त्याप्रमाणे मार्गक्रम करणे आवश्यक असते. मेहनतीला पर्याय नाही.

यश प्राप्त करण्यासाठी माणसाची गरिबी, जात, धर्म, परिस्थिती या गोष्टी आडव्या येत नसतात. फक्त योग्य दिशा ठरवून त्याप्रमाणे अहोरात्र प्रयत्न करावे लागतात असे आकाश म्हेत्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले. तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी? यावर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन देवणी शहरातील सोन्या चांदीचे सुप्रसिद्ध व्यापारी कालिदास देवणे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव गजानन भोपणीकर होते.

यावेळी रसिका महाविद्यालयाचे प्राचार्य चंद्रकांत जावळे पाटील, उपप्राचार्य शिवाजी सोनटक्के, शिवाजीराव बिरादार, अभंगराव निटुरे, युवा उद्योजक दत्ता हुरुचनाळे, प्रताप कोयले, सत्यदेव गरड, श्रीकांत बिरादार, अंकुश माने, प्रीतम आष्टूरे, ईश्र्वर पाटील,



आबासाहेब इंग्लिश स्कूलचे प्राचार्य भट, उपप्राचार्य रामदास नागराळे, रसिका महाविद्यालय आणि आबासाहेब इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य तथा ग्रंथपाल डॉ. शिवाजी सोनटक्के यांनी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी माने यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. प्रशांत भंडे यांनी केले.

# प्रा. पांडुरंग मुठ्ठे संपादित ग्रंथाचे प्र. कुलगुरू डॉ. महाजन यांच्या हस्ते प्रकाशन



**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, १५ नोव्हेंबर :** येथील शिवनेरी महाविद्यालयाचे समाजशास्त्र विभाग प्रमुख तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा. डॉ. पांडूरंग मुठ्ठे यांनी संपादीत केलेल्या 'भारतीय समाज : संरचनात्मक बदल आणि सामाजिक समस्याया ग्रंथाचे प्रकाशन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र. कुलगुरु डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते दि. ४ नोव्हेंबर २५ रोजी विद्यार्थी व समाजशास्त्र विषयाच्या प्राध्यापकासाठी उपयुक्त ठरणाऱ्या ग्रंथाचे विद्यापीठामध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन करून करण्यात आले.

यावेळी विद्यापीठाचे विशेष कार्यासन अधिकारी दिगांबर नेटके, रासेयोचे संचालक डॉ. मारोती गायकवाड, समाजशास्त्र अभ्यास मंडळ अध्यक्ष डॉ. एस. पी. घायाळ, शाहजानी औरादचे समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विनोद जाधव, लेखक डॉ. नाथराव मोरे, प्रा. डॉ. महानंदा राऊत खेडकर मॅडम व डॉ.मा.मा. गायकवाड यांची उपस्थिती होती.

# मुलींना स्वसंरक्षणाचे कौशल्य आत्मसात करणे आवश्यक : सरवदे

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १५ नोव्हेंबर :** येथील विद्यावर्धिनी विद्यालयात इनरव्हील क्लबच्या वतीने मुलींसाठी स्वसंरक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेला मार्गदर्शक शिक्षक विशाल सरवदे सरांनी विद्यार्थिनींना स्वसंरक्षण करण्यासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. सुषमा पाटील यांची उपस्थिती होती.

प्रत्येक विद्यार्थिनीने ही कौशल्ये आत्मसात करणे ही आजच्या काळाची खरी गरज आहे. धोक्याच्या वेळी सुरक्षित अंतर राखणे आणि वेगाने प्रतिसाद देणे शिकणे आवश्यक आहे. यासाठी याचे आयोजन केले होते. ललिता किनगावकर यांनी कॅन्सर प्रतिबंधात्मक लसीकरण एचपीव्ही व्हायरस याबाबत माहिती दिली. विशाल सरवदे यांनी कराटे डेमोद्वारे विद्यार्थ्यांना सेल्फ डिफेन्स ही केवळ शारीरिक कला नसून ती आत्मविश्वास, स्वाभिमान आणि स्वावलंबनाचे प्रतिक आहे.

वेगवेगळ्या कृतीतून व प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून माहिती दिली. ही कार्यशाळा ९ ते १४ वयोगटातील विद्यार्थिनींसाठी घेण्यात आली. या कार्यशाळेस इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा पूजा रेड्डी, रजनी महाजन, ललिता किनगावकर, विजया भसारे व कलावती भातांब्रे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक सौ. सुषमा पाटील यांनी, तर सुत्रसंचालन कैवल्या नलवाड यानी केले. शेवटी सौ. कलावती भातांब्रे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



# दान पावलं म्हणत मतांचं दान मागण्यासाठी वासुदेवाची राजकारणात एंट्री

## शहापूर जि.प. मतदारसंघात लोककलावंत व पत्रकार दयानंद काळुंके चर्चेत

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.१५ नोव्हेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील गुळहळ्ळी येथे जन्म व बाभळगाव येथे वास्तव्यास असलेले उच्चशिक्षित पत्रकार, लोककलावंत तसेच वासुदेव दयानंद काळुंके यांनी दान पावलं म्हणून मतांचं दान मागण्यासाठी राजकारणात प्रवेश केला आहे. येत्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत त्यांचा प्रचार विशेष लक्षवेधी ठरणार असल्याची चर्चा शहापूर जिल्हा परिषद मतदारसंघात रंगली आहे.

दयानंद काळुंके हे महाविद्यालयीन जीवनापासून लोककलावंत म्हणून ओळखले जातात. महाराष्ट्रातील लोप पावत चाललेल्या लोककलांना जिवंत ठेवत त्यांनी अवगत कला सादर करून जनतेचे मनोरंजन व प्रबोधन सातत्याने केले आहे. १९९२ मध्ये बीड येथे झालेल्या आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवात त्यांनी वासुदेवाची भूमिका साकारत सुवर्णपदक पटकावले होते. त्या क्षणापासून 'वासुदेव' ही ओळख त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी कायमची जोडली गेली.

गेली ३२ वर्षे त्यांनी जपलेली ही कला आज त्यांच्या राजकीय प्रवासात उपयोगी ठरत आहे.

शहापूर जिल्हा परिषद मतदारसंघ हा अनुसूचित जाती पुरुष आरक्षित वर्गासाठी आहे. अशा परिस्थितीत 'दान पावलं' म्हणत लोकांपर्यंत पोहोचणारा वासुदेव दयानंद काळुंके मैदानात उतरल्याने मतदारसंघात नव्या उत्सुकतेला ऊत आला आहे.

वासुदेव हा केवळ धार्मिक भिक्षेकरी नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील एक महत्त्वाचा प्रबोधनकारक घटक आहे. समाजप्रबोधनाची अनोखी ताकद असलेल्या या वेशभूषेतून काळुंके यांनी शहापूर मतदारसंघातील प्रत्येक गावात जाऊन सम स्यांची जाण घेतली आहे. गावोगावी केलेले प्रबोधन, संवाद आणि मनोरंजन यांच्या माध्यमातून त्यांनी जनतेचा विश्वास संपादन केला आहे. शासकीय योजना लोकांच्या अंगणापर्यंत पोहोचाव्यात, यासाठी ते जिल्हा परिषद निवडणुकीच्या रिंगणात उभे राहत असल्याचे त्यांनी सांगितले.



दयानंद काळुंके यांनी महाविकास आघाडीसमोर उमेदवारीची मागणी केली असून, एका लोककलावंत-पत्रकार-सामाजिक कार्यकर्त्या आणि वासुदेवाला राजकीय तिकीटाचे 'दान' मिळणार की नाही, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, मतदारसंघात त्यांच्या नावाची मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू आहे.

लोकशाही मजबूत व सुरक्षित ठेवण्यासाठी उच्चशिक्षित, स्वच्छ, चारित्र्यसंपन्न, निष्कलंक, निस्वार्थी आणि निर्व्यसनी उमेदवारांची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे. त्यामुळे वासुदेवाची कला जोपासणारे, लोकांम ध्ये मिसळणारे आणि पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक काम करणारे दयानंद काळुंके यांच्यासारखे उमेदवार आजच्या राजकारणाला हवा असल्याची चर्चा मतदारसंघात व्यापक प्रमाणात होत आहे.

# भैरवनाथ शुगर सोनारी : ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यावर दुसरा हप्ता जमा

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१५ नोव्हेंबर -**



परंडा तालुक्यातील सोनारी येथील भैरवनाथ शुगर कारखान्याकडून गाळप हंगाम २०२४-२५ मध्ये एकूण १,३९,६२१ मे.टन ऊसाचे गाळप करण्यात आले होते. गाळपास आलेल्या ऊसास पहिली उचल मे.टनम ागे २,६०० रुपये प्रमाणे शेतकऱ्यांना देण्यात आली होती.

यंदा भूम, परंडा आणि वाशी तालुक्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी परंडा मतदारसंघाचे आम दार प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांच्या पुढाकाराने कारखान्याकडून दुसरा हप्ता मे.टनमागे २०० रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा केल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन अनिल सावंत यांनी दिली.

**चेअरमन अनिल सावंत यांची माहिती**

यामुळे गाळप हंगाम २०२४-२५ मधील ऊसाचा एकूण भाव मे.टनमागे २,८०० रुपये इतका झाला आहे.

दरम्यान, गाळप हंगाम २०२५-२६ आमदार तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच चेअरमन अनिल सावंत आणि व्हाईस चेअरमन विक्रम सावंत यांच्या नियोजनाखाली जोमात सुरू असल्याचेही कारखान्याकडून सांगण्यात आले.

भैरवनाथ शुगरने नेहमीप्रमाणेच शेतकरी हित जपल्याचे नमूद करत, ऊस उत्पादकांनी उत्तम प्रतीचा, परिपक्व ऊस गाळपास पाठवून कारखान्याला सहकार्य करावे, असे आवाहन चेअरमन अनिल सावंत यांनी केले.

# राजा राम मोहन राय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या नोंदणी संदर्भातील कार्यशाळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ नोव्हेंबर -**

धाराशिव येथील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात कोलकाता येथील राजा राम म ोहन राय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या नोंदणी प्रक्रियेविषयी माहितीपर कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा ग्रंथालय अधिकारी ढाकणे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी ग्रंथालय नोंदणी प्रक्रियेचे महत्त्व स्पष्ट करताना सर्व वाचनालयांना शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नोंदणी पूर्ण करण्याचे आवाहन केले.

कार्यशाळेत आर.आर. फाउंडेशन, कोलकाता यांच्या नोंदणी प्रक्रियेची सविस्तर माहिती देण्यात आली.

हे आयोजन श्री संत सावता माळी सार्वजनिक वाचनालय, देवळाली आणि आयडियल कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या सहकार्याने करण्यात आले होते.

कार्यक्रमास जिल्ह्यातील विविध वाचनालयांचे कार्यकर्ते, कर्मचारी आणि प्रतिनिधी म ोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेतून मिळालेली माहिती नोंदणी प्रक्रियेसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे सहभागींचे मत होते.

# नळदुर्ग महाविद्यालयाच्या मुलींचा खो-खोमध्ये विजेतेपदाचा मुकुट



## मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१५ नोव्हेंबर -**

नळदुर्ग येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात आयोजित आंतरमहाविद्यालयीन खो-खो स्पर्धेत येथील मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवून उज्वल यश संपादन केले, तर मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला. या यशाबद्दल महाविद्यालयाच्या परिसरात आणि नळदुर्ग शहरात विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

दि.१३ व १४ नोव्हेंबर रोजी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धेचे उद्घाटन विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अंकुश कदम यांच्या हस्ते झाले. अखिल भारतीय खो-खो महासंघाचे सहसचिव डॉ. चंद्रजित जाधव, माजी प्राचार्य डॉ. मोहन बाबरे, डॉ. अशोक कदम, डॉ. शिवाजी घोडके, डॉ. कपिल सोनटक्के व प्रा. मोतीराम पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष राठोड होते. स्पर्धेत मुलींचे पाच आणि मुलांचे सहा असे एकूण अकरा संघ सहभागी झाले होते. महाविद्यालयाच्या प्रांगणात पार पडलेल्या अंतिम सामन्यात मुलींच्या गटात नळदुर्ग महाविद्यालय विरुद्ध फिजिकल एज्युकेशन कॉलेज (छत्रपती संभाजीनगर) असा सामना रंगला. नळदुर्गच्या मुलींनी दमदार खेळ करत विजेतेपद पटकावले.

मुलांच्या गटात झालेल्या अंतिम फेरीत जवाहर महाविद्यालय, अणदूर यांनी नळदुर्ग महाविद्यालयावर मात करत प्रथम क्रमांक मिळविला, तर नळदुर्गने उपविजेतेपदावर सम ाधानी रहावे लागले.

स्पर्धेत पंच म्हणून प्रभाकर काळे, नितीन ढोबळे, कृष्णा राठोड, संदीप पुरी, राजाभाऊ शिंदे व डॉ. रफीक शेख यांनी काम पाहिले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# स्थानिक नेत्यांचे आदेश : अर्ज भरा, मी आहे ना?; पक्षांत गोंधळ, उमेदवार संभ्रमात

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१५ नोव्हेंबर -**




नगर परिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पदासह २० नगरसेवकांसाठी २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. मात्र अद्याप कोणत्याही पक्षाकडून अधिकृत व्हिप जारी न झाल्याने स्थानिक कार्यकर्ते आणि इच्छुक उमेदवार मोठ्या गोंधळात सापडले आहेत.

स्थिती अशी की अनेक जणांना अर्ज भरा, मी आहे ना! अशा आश्वासनांवर उमेदवारी अर्ज दाखल करण्यास भाग पाडले जात आहे. काहींनी पक्षाच्या वतीने तर काहींनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला असला, तरीही ना घरकाम ना घाटका अशी अवस्था निर्माण झाली आहे.

उद्याच अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असताना, अनेक कार्यकर्ते मनात हताशता बाळगून आहेत. काहींचे म्हणणे- वर्षानुवर्षे कष्ट करून पक्ष उभारला, उमेदवारी मिळेल या अपेक्षेने काम केले. पण धनसंपत्तीच्या जोरावर लढणाऱ्यांसमोर आम्ही कसे टिकणार? तरीही एकनिष्ठ राहून आम्हाला 'अर्ज भर' असा आदेश देण्यात आला.

एक कार्यकर्त्याने तर कटू अनुभव व्यक्त करत म्हटले ज्याच्यासाठी जीव ओतून काम केले, तोच नेता आज माझ्याच डोळ्यासमोर दुसऱ्याला प्राधान्य देतोय. 'तु माझा का होईनास?' अशी स्थिती झाली आहे. पक्षात राहावे की नाही यालाही आता अर्थ उरलेला नाही.

अनेक इच्छुकांमध्ये संभ्रमाचे वातावरण असून, अधिकृत पक्ष निर्णयापूर्वीच उमेदवारी अर्ज दाखल करणे हीच जणू त्यांच्या पुढची 'दयनीय पण अपरिहार्य' परिस्थिती बनली आहे.

# उमरा येथील शाळेत बालदिन उत्साहात साजरा



**विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वितरण...**

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१५ नोव्हेंबर -**

कळंब तालुक्यातील उमरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दि.१४ नोव्हेंबर रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त 'बालदिन' उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त शाळेत विविध उपक्रम ांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात नेहरूंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी भाषण स्पर्धा घेण्यात आली. 'बालदिनाचे महत्त्व', 'नेहरूंचे बालप्रेम' आणि 'राष्ट्रनिर्मितीतील त्यांचे योगदान' या विषयांवर ईश्वरी रामहरी जाधव, अंकिता अक्रुर जाधव तसेच संस्कार सम ाधान बाराते यांनी भावपूर्ण व प्रभावी मांडणी सादर केली.

स्पर्धेत अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावत या विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली.

स्पर्धेनंतर विजेत्यांना बक्षिसे प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी शिक्षक रणजीत चौधरी यांनी बालदिनाचे महत्त्व, नेहरूंचे व्यक्तिमत्त्व व विचार याबाबत मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.

कार्यक्रमाचे आयोजन शिक्षिका आरती कवडे यांनी केले. पालकांचीही उपस्थिती लाभलेल्या या कार्यक्रमात आनंद, उत्साह आणि संस्कारांचा सुंदर संगम पाहायला मिळाला. बालदिनाचा उपक्रम उत्साहात आणि यशस्वीपणे संपन्न झाला.

# सावित्रीबाई फुले विद्यालयात शिक्षक-विद्यार्थी पालक मेळावा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१५ नोव्हेंबर -**

शहरातील सावित्रीबाई फुले विद्यालयात इयत्ता ९ वी व १० वी विद्यार्थ्यांसाठी आयोजित शिक्षक-विद्यार्थी पालक मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य काकासाहेब मुंडे होते.

या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. म ीनाक्षी शिंदे भवर, उपमुख्याध्यापक सोमनाथ सावंत, पर्यवेक्षक शंकर गोंदकर तसेच पालक प्रतिनिधी म्हणून अमर चोंदे, रफिक रंगरेज आणि वैशाली पटेकर उपस्थित होते.

मेळाव्यात विद्यार्थ्यांनी शैक्षणिक अडचणींसह विविध सम स्या मांडल्या. त्यावर विद्यालय प्रशासनाकडून सद्यस्थितीतील उपाययोजना आणि पुढील नियोजनाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. उच्च माध्यमिक विभागाच्या उपप्राचार्य डॉ. म ीनाक्षी शिंदे भवर, सहशिक्षक कमलाकर गिरी व प्रतिभा गांगुर्डे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर सूचना दिल्या.

मुख्याध्यापक काकासाहेब मुंडे यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक नियोजन, परीक्षा तयारी आणि शिस्त याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक शंकर गोंदकर यांनी केले. सूत्रसंचालन परमेश्वर मोरे यांनी तर आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर तोडकर यांनी केले.

# जयप्रकाश विद्यालयात 'आनंददायी शनिवार'

## अंतर्गत आर्ट ऑफ लिव्हिंगतर्फे योग व ध्यानधारणेचे मार्गदर्शन...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ नोव्हेंबर -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे 'आनंददायी शनिवार' उपक्रम ाअंतर्गत आर्ट ऑफ लिव्हिंगतर्फे योग, प्राणायाम व ध्यानधारणेचे म हत्त्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.

शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार 'आनंददायी शनिवार' या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, आत्मविश्वास वाढावा आणि सर्जनशीलता विकसित व्हावी, या हेतूने प्रत्येक शनिवारी विविध कार्यक्रम राबवले जातात.

यावेळी आर्ट ऑफ लिव्हिंगचे धाराशिव जिल्हा समन्वयक लक्ष्मण काकडे यांनी विद्यार्थ्यांना



योगाभ्यास, प्राणायाम पद्धती, मनः शांतीसाठी आवश्यक ध्यानधारणा कशी करावी याबाबत मार्गदर्शन केले. ध्यानधारणा करताना आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवणे, त्यांचा आदर करणे आणि कुटुंबासाठी आधारस्तंभ बनण्याचा संदेश त्यांनी दिला.

या कार्यक्रमाला डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व शिक्षण महर्षी सुभाषदादा कोळगे, रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे तसेच शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उमरगा न.प.तर्फे मतदान जनजागृती रॅली

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१५ नोव्हेंबर -**

नगरपरिषद निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर उमरगा नगरपरिषदेतर्फे दि.१५ रोजी मतदार जागृतीसाठी भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. नगरपरिषद कार्यालयापासून सुरुवात झालेली ही रॅली शहरातील प्रमुख मार्गांनी फिरत नागरिकांना मतदानाचे महत्त्व पटवून देत जागृती करण्यात आली. लोकशाही मजबूत राहण्यासाठी प्रत्येक नागरिकाने मतदानाचा हक्क बजावणे आवश्यक असल्याचा संदेश रॅलीतून देण्यात आला.

या रॅलीचे उद्घाटन नगरपरिषदेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांच्या हस्ते झाले. रॅलीमध्ये नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. त्यामध्ये लेखापाल कृष्णा काळे, संगणक अभियंता महेश शिंदे, नगर अभियंता राजन वाघम ारे, सहाय्यक लेखापाल मनोज जंगले, रोखपाल किरण क्षीरसागर, कार्यालयीन अधीक्षक प्रसाद म ाळी, पाणीपुरवठा अभियंता गणेश पुरी, कर निर्धारण अधिकारी मुसा मुबारक, आस्थापना अधिकारी अरुणा कोडगावे, प्रशासकीय अधिकारी प्रशांत वारभुवन, वरिष्ठ लिपिक विशाल माळी, लिपीक इरफान शेख, रमेश हजारे, स्वच्छता निरीक्षक विकास दनाने, पाणीपुरवठा अधिकारी शेषेराव भोसले, स्वच्छता अधिकारी मंजूर शेख यांसह अनेक कर्मचारी सहभागी झाले. याशिवाय शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थी, विद्यार्थिनी व शिक्षकांनीही रॅलीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

मतदानाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी नगरपरिषदेने उचललेले हे पाऊल नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळवताना दिसले.

**जाहीर प्रगटन**
**नगरपंचायत कार्यालय लोहारा बु.**
**ता. लोहारा, जि. धाराशिव**
जा.क्र./नपलो/नामांतर/ दि.०३/११/२०२५
**घरजागा वाटणीपत्र नामांतर ८ अ नाव नोंदणी**
**श्री. आकाश मल्लिकार्जुन पाटील** यांनी या कार्यालयात दि.०३/११/२०२५ रोजी सर्व्ह नं./ मिळकत नं २६२६ (३९) चे खरेदी खत /कोर्ट डिग्री/वारसा आधारे नावं नोंद/नावं बदलनेसाठी नामांतर विभागात अर्ज दाखल केलेला आहे. व त्यानी ८ अ चा उतारा नक्कल मिळणे बाबत कळविले आहे. वरील घराची चतुरसीमा व लांबी खालील प्रमाणे.
**-जागेची चर्तु:सीमा-**
**पुर्वस** : न.प. रस्ता
**पश्चिमेस** : सौ. उमा मल्लिकार्जुन पाटील
**दक्षिण** : न.प. रस्ता
**उत्तरेस** : बालाजी मक्तेदार
वरील चतुरसीमा आणि जागेची नाव नोंदणी/ करिता आहे. तरी सदरहू जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की ज्या कोणास सदरहू नामांतराबाबत नाव नोंदणी हस्तांतरण बाबत तक्रार असेल तर सदरील जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्यात आलेल्या तारखेपासून पंधरा दिवसाचे आत तक्रार दाखल करण्यात यावी. अन्यथा तक्रार नाही असे गृहीत धरून नामांतर करून दिले जाईल व नाव नोंदणी केली जाईल. पुन्हा कोणाची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत, लोहारा**

**जाहीर प्रगटन**
**नगरपंचायत कार्यालय लोहारा बु.**
**ता. लोहारा, जि. धाराशिव**
जा.क्र./नपलो/नामांतर/ दि.०३/११/२०२५
**घरजागा वाटणीपत्र नामांतर ८ अ नाव नोंदणी**
**श्री. चंद्रकांत शिवहर बिराजदार** यांनी या कार्यालयात दि.१३/११/२०२५ रोजी सर्व्ह नं./मिळकत नं. १५३७/ चे खरेदी खत / कोर्ट डिग्री/वारसा आधारे नावं नोंद/नावं बदलनेसाठी नामांतर विभागात अर्ज दाखल केलेला आहे. व त्यानी ८ अ चा उतारा नक्कल मिळणे बाबत कळविले आहे. वरील घराची चतुरसीमा व लांबी खालील प्रमाणे.
**-जागेची चर्तु:सीमा-**
**पुर्वस** : दगडू निर्मळे
**पश्चिमेस** : न. प. रस्ता
**दक्षिण** : चंद्रकांत बिराजदार
**उत्तरेस** : वनमाला जट्टे
वरील चतुरसीमा आणि जागेची नाव नोंदणी/ करिता आहे. तरी सदरहू जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की ज्या कोणास सदरहू नामांतराबाबत नाव नोंदणी हस्तांतरण बाबत तक्रार असेल तर सदरील जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्यात आलेल्या तारखेपासून पंधरा दिवसाचे आत तक्रार दाखल करण्यात यावी. अन्यथा तक्रार नाही असे गृहीत धरून नामांतर करून दिले जाईल व नाव नोंदणी केली जाईल पुन्हा कोणाची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत, लोहारा**

**जाहीर प्रगटन**
**नगरपंचायत कार्यालय लोहारा बु.**
**ता. लोहारा, जि. धाराशिव**
जा.क्र./नपलो/नामांतर/ दि.०३/११/२०२५
**घरजागा वाटणीपत्र नामांतर ८ अ नाव नोंदणी**
**सौ. उमा मल्लिकार्जुन पाटील** यांनी या कार्यालयात दि.०३/११/२०२५ रोजी सर्व्ह नं./मिळकत नं. २६२७ (४०) चे खरेदी खत /कोर्ट डिग्री/वारसा आधारे नावं नोंद/नावं बदलनेसाठी नामांतर विभागात अर्ज दाखल केलेला आहे. व त्यानी ८ अ चा उतारा नक्कल मिळणे बाबत कळविले आहे. वरील घराची चतुरसीमा व लांबी खालील प्रमाणे.
**-जागेची चर्तु:सीमा-**
**पुर्वस** : आकाश मल्लिकार्जुन पाटील
**पश्चिमेस** : बागवान यांचा प्लॉट
**दक्षिण** : न. प. रस्ता
**उत्तरेस** : मंगेश देविदास गरड
वरील चतुरसीमा आणि जागेची नाव नोंदणी/ करिता आहे. तरी सदरहू जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की ज्या कोणास सदरहू नामांतराबाबत नाव नोंदणी हस्तांतरण बाबत तक्रार असेल तर सदरील जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्यात आलेल्या तारखेपासून पंधरा दिवसाचे आत तक्रार दाखल करण्यात यावी अन्यथा तक्रार नाही असे गृहीत धरून नामांतर करून दिले जाईल. व नाव नोंदणी केली जाईल पुन्हा कोणाची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत, लोहारा**

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## मुरूम प्रभाग क्र.४ मधून अंकिता अंबुसे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम दि.१५ नोव्हेंबर -**

मुरूम नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग क्र.४ मधून अंकिता राजकुमार अंबुसे यांनी शनिवारी भारतीय जनता पार्टीच्या नव्या गटातर्फे नगरसेविका पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला.




या प्रभागात अद्याप इतर राजकीय पक्षांकडून किंवा अपक्ष उमेदवारांकडून अर्ज दाखल झालेले नाहीत.

उमरगा तालुक्यात सामाजिक क्षेत्रात सातत्याने सक्रिय भूमिका बजावणाऱ्या सौ. अंबुसे यांच्या कार्याची दखल घेऊन भाजप नेते बापुराव पाटील यांनी त्यांना उमेदवारी दिली आहे.

सामाजिक क्षेत्रात भक्कम उपस्थिती निर्माण केलेल्या अंबुसे यांना राजकारणात संधी मिळाल्याने ते आगामी निवडणुकीत कितपत यशस्वी ठरतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### मंगरूळचे डॉ. शुभम जाधव यांचा सत्कार

**तुळजापूर, दि.१५ नोव्हेंबर -**

मंगरूळ येथील शुभम बबनराव जाधव यांनी सोलापूर येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय डेंटल महाविद्यालय येथून मास्टर ऑफ डेंटल सर्जरी ही मास्टर प्राप्त केल्याबद्दल त्यांचा माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या कार्यालयात मुकुंदराव डोंगरे यांच्या हस्ते सत्कार संपन्न झाला. शुभम जाधव यांनी पहिली ते पाचवी जिल्हा परिषद प्रशाला मंगरूळ पाचवी ते दहावी जवाहर नवोदय विद्यालय तुळजापूर त्यानंतर कनिष्ठ महाविद्यालय शिक्षण दयानंद महाविद्यालय लातूर बीडीएस व मास्टर ऑफ डेंटल सर्जरी या दोन्ही पदवी पंडित दीनदयाळ उपाध्याय डेंटल महाविद्यालय सोलापूर येथून प्राप्त केली आहे. याप्रसंगी मुकुंद डोंगरे, शिवाजी गायकवाड, बबन जाधव, रविराज कापसे, डॉ. सतीश महामुनी, अमर माने, तानाजी जाधव, सचिन ताकमोघे, श्रीकांत कदम, अनिल आगलावे, संजय गायकवाड आदी उपस्थित होते.



### पोदार प्रेपमध्ये बालदिन उत्साहात साजरा

**धाराशिव, दि.१५ नोव्हेंबर -**

पोदार प्रेप, धाराशिव येथे १४ नोव्हेंबर रोजी बालदिनाचा आनंददायी कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. लहान मुलांच्या हास्य फुलवणारा हा दिवस विविध खेळ, नृत्य आणि उपक्रमांनी सजला होता. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांचे हॅपी चिल्ड्रन्स डे बॅजेसने स्वागत करून झाली. शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन केले होते. मुलांसाठी बबल ब्लोअर खेळ, पॉम-पॉम डान्स आणि विविध मजेशीर सर्जनशील क्रिया घेण्यात आल्या. प्रत्येक उपक्रमात मुलांनी भरभरून सहभाग घेतला व आनंद लुटला. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेतर्फे प्रत्येक विद्यार्थ्याला छानसा गिफ्ट देण्यात आला. ज्यामुळे मुलांचे बालदिनाचे क्षण अधिक संस्मरणीय ठरले.



### लोहारा शहरात भाजपाच्या वतीने जल्लोष

**लोहारा, दि.१५ नोव्हेंबर -**

बिहार विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्ष, जदयु, लोजप व मित्र पक्षांच्या एनडीए आघाडीने ऐतिहासिक विजय मिळविला आहे. या विजयाचा लोहारा तालुका भाजपाच्या वतीने शहरातील छत्रपती महाराज चौकात दि.१४ नोव्हेंबर रोजी पेढे वाटून व फटाके फोडून जल्लोष साजरा करण्यात आला. उमरगा नगरपालिका, मुरुम नगरपरिषद सह महाराष्ट्र स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत सुद्धा भारतीय जनता पक्षाला असाच निर्विवाद विजय मिळेल, असा विश्वास तालुकाध्यक्ष राजेंद्र पाटील यांनी व्यक्त केला. यावेळी राजेंद्र पाटील, विक्रांत संगशेट्टी, इकबाल मुल्ला, प्रविण चव्हाण, बालाजी चव्हाण, मोहन जेवळीकर, शुभम गोसावी, राजेंद्र कदम, सचिन क्षीरसागर, सुयेश कुमार दंडगुले, निकेश बचाटे, ज्ञानेश्वर परसे, मल्लीनाथ फावडे यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### भगवान बिरसा मुंडा यांची जयंती साजरी

**लोहारा, दि.१५ नोव्हेंबर -**

लोहारा शहरातील जिजाऊ मेमोरियल प्रशासकीय सेवा महाविद्यालयात भगवान बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती जनजाती गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या अनुष्का देसाई यांच्या हस्ते प्रतिमापुजन करण्यात आले. प्रस्तावना व आभार किरण चिचोळे यांनी मांडलेयावेळी हा निंबध स्पर्धा व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ईश्वरी जमादार, वैष्णवी सुतार, राणी माटे, विद्यार्थ्यांनी सोनू जाधव, राधा कुंभार, प्राजक्ता गिराम, दिव्या बनसोडे आदी उपस्थित होते.

### ‘तेरणा’त नेहरू जयंती साजरी

**धाराशिव, दि.१५ नोव्हेंबर -**

येथील तेरणा महाविद्यालय (कला, विज्ञान व वाणिज्य) धाराशिव येथे १४ नोव्हेंबर रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती म्हणजेच बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ.डी.बी. मोरे यांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री तुळजाभवानी मंदिराचा गाभारा मुळ स्वरूपातच कायम



### भोपे पुजारी मंडळाच्या मागणीला यश...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ नोव्हेंबर -**

श्री तुळजाभवानी पुजारी मंडळाने १७ ऑक्टोबर रोजी मंदिर संस्थानाकडे दिलेल्या निवेदनाची दखल घेत, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाचे संचालक डॉ. तेजस म. गर्गे यांच्या अध्यक्षतेखाली १४ नोव्हेंबर रोजी मुंबई येथील सांस्कृतिक कार्य विभागात चार तासांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत तुळजाभवानी मंदिरातील विविध विकास, जतन व संवर्धन काम ांबाबत अनेक निर्णायक निर्णय घेण्यात आले.

बैठकीतील प्रमुख निर्णययामध्ये मंदिराचा गाभारा मुळ स्वरूपात आहे तसाच कायम ठेवण्याचा निर्णय. मंदिराच्या तळभागाचे GPR सर्वेक्षण करण्याची आवश्यकता मान्य. मंदिर परिसरातील धार्मिक विधी- ओटी भरणे, जावळ, गोंधळ, अभिषेक, अराध्य रूम, तारागृह यांसह सर्व विधी सद्यस्थितीत ज्या जागेवर पार पडतात त्याच ठिकाणी होणार. विद्युतगृह स्थलांतरित करण्याचे निर्देश. स्टेडियम हटवून, त्याठिकाणी जुन्या ओवऱ्यांच्या रांगेत शक्य तितक्या नवीन ओवऱ्या बांधण्यास परवानगी.

अभिषेक हॉल पाडून, त्याजागी जतन व संवर्धनाच्या आराखड्यातील अराध्य रूम बांधण्याचा निर्णय. तारागृह पाडून, मंदिराच्या प्राचीन वास्तुकलेशी सुसंगत नव्या स्वरूपात पुनर्बांधणी. जनसुविधा केंद्र उभारणीस मंजुरी. मंदिराची तटबंदी मूळ स्वरूपात पुनर्स्थापित करणे. जिजाऊ महाद्वार ते स्टेडियम मागील सिमाभिंत पूर्वीप्रमाणे त्याच जागी बांधण्याचे आदेश.

लिफ्ट व रॅम्पसाठी जागा अपुरी असल्याने सध्याच्या ठिकाणी दगडी पायऱ्यांची व्यवस्था; तर लिफ्ट-रॅम्पचे काम अभिषेक हॉल पाडल्यानंतर मिळणाऱ्या जागेत करावे.

सेंट्रल इमारत पाडून, जागेवर आराखड्यातील कमान उभारणे आणि दुसऱ्या बाजूला शहाजीराजे दरवाज्याची प्रतिकृती बांधणे.

भवानीशंकर मंडप येथे प्रस्तावित ३९ पैकी ४ स्तंभ तयार असून उर्वरित स्तंभ ९० दिवसांत पूर्ण करणे. निर्णयांचे अधिकृत इतिवृत्त मिळताच अभिषेक हॉल व स्टेडियम पाडण्यास पुजारी मंडळाची सहमती.



या बैठकीस उपसंचालक हेमंत दळवी, सहाय्यक संचालक जया वाहणे, पुजारी मंडळ अध्यक्ष विपीन शिंदे, भोपे पुजारी मंडळ अध्यक्ष अमरराजे कदम, मंदिर संस्थान सहाय्यक व्यवस्थापक आर.एन. भोसले, जतन सहाय्यक आर.डी. निपाणे, वास्तुविशारद तेजस्वीनी आफळे, कंत्राटदार मुकेश जाधव, राम सवानी आदी उपस्थित होते.

## सुकटा जि.प. गटासाठी पूजा डोंबाळे यांचा काँग्रेसकडून दावेदारीचा जोर

**वाशी, दि.१५ नोव्हेंबर -**

भूम तालुक्यातील सुकटा जिल्हा परिषद गट ओबीसी महिला आरक्षित असल्याने काँग्रेस पक्षाकडून वंजारवाडीच्या उपसरपंच



पूजा प्रभाकर डोंबाळे यांचे नाव सध्या सर्वाधिक चर्चेत आहे. कार्यकर्त्यांमध्ये आणि स्थानिक नेतृत्वात त्यांच्या नावाला मोठा पाठिंबा मिळत असून त्या या गटातील काँग्रेसच्या प्रबळ दावेदार म्हणून पुढे येत आहेत. पूजा डोंबाळे यांचे पती प्रभाकर डोंबाळे हे परिसरातील निष्ठावान व संघर्षशील कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात.

## भुममध्ये उसतोडीच्या पैशांच्या वादातून तरुणाला मारहाण करत अपहरण

### आठ जणांसह इतरांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ नोव्हेंबर -**

उस तोडीचे उचल घेतलेले पैसे परत करण्याच्या कारणावरून लक्ष्मीनगर भुम येथील काही इसमांनी एक तरुणाला डांबून ठेवत त्याचे अपहरण करून कर्नाटकातील कारखान्यात नेऊन मारहाण केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. फिर्यादी जयकिसन किसन जाधव (वय ३५, रा. आरसोली, ता. भुम) यांच्या तक्रारीवरून भुम पोलीस ठाण्यात आठ जणांसह आणखी काही इसमांवर गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, फिर्यादीनुसार, दि.२० ऑक्टोबर रोजी पहाटे ३ वाजता ते दि.१२ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजेपर्यंत, आरोपींनी त्यांना उस तोडीच्या पैशांच्या वादातून काका पवार यांच्या घरी डांबून ठेवले. त्यानंतर सकाळी



त्यांना इर्टिगा गाडीमध्ये बसवून हर्षा शुगर लिमिटेड, सौंदत्ती, जि. बेळगाव (कर्नाटक) येथील कारखान्यात नेण्यात आले. तेथे वेळूच्या काठीने मारहाण करून जखमी करण्यात आले.

या प्रकरणी सुरज साळुंके, सुरज पवार, अविनाश जाधव, प्रतिक वाघमरे, दत्ता माने (सर्व रा. लक्ष्मीनगर भुम), कुणाल साळुंके, अजित पाटील, हर्षा शुगर लि. सौंदत्ती जि. बेळगाव येथील एक इसम आणि इतर दोन अनोळखी व्यक्तींवर भुम पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पोलीसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## तुळजापूर नगराध्यक्ष पदासाठी भाजपकडून विनोद गंगणे यांचा अर्ज दाखल

### नगरसेवक पदासाठी २९ उमेदवारांचे ५६ अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ नोव्हेंबर -**

नगरपरिषद निवडणूकीसाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या सहाव्या दिवशी नगराध्यक्ष पदासाठी भाजपकडून विनोद गंगणे यांचा अर्ज दाखल केला आहे.तर नगरसेवक पदासाठी २९ उमेदवारांची ५६ अर्ज निवडणूक आयोगाकडे प्राप्त झाले असल्याची माहिती निवडणूक सहाय्यक निर्णय अधिकारी अजिंक्य रणदिवे यांनी दिली आहे.

ऑनलाइन फॉर्म भरण्याच्या प्रक्रियेत येणाऱ्या सर्वरच्या तांत्रिक अडचणीमुळे उमेदवारांचे उमेदवारी अर्ज ऑफलाइन अर्ज निवडणूक आयोगाने स्वीकारण्या स सुरुवात केली आहे त्यामुळे सहाव्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी



इच्छुकांची गर्दी दिसून आली.

१० नोव्हेंबर पासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या दिवशीपासून पहिल्या तीन दिवस एकही उमेदवाराचे उमेदवारी अर्ज दाखल झाले नव्हते चौथ्या दिवशी केवळ एकच उमेदवाराने अर्ज दाखल केला होता.

तर पाचव्या दिवशी पाच उमेदवारांचे सहा अर्ज दाखल झाले होते. सहाव्या दिवशी म्हणजे १५ नोव्हेंबर रोजी मात्र नगराध्यक्ष पदासाठी विजय शामराज यांचा अपक्ष तर विनोद गंगणे यांनी भाजप कडून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत तसेच नगरसेवक पदासाठी २९ उमेदवाराने ५६ अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे नगराध्यक्ष पदासाठी दोन तर नगरसेवक पदासाठी आता एकूण ३५ उमेदवारांचे ६३ उमेदवारी अर्ज निवडणूक आयोगाकडे प्राप्त झाले आहेत.

## प्रभाग क्र. ५ मधून तानाजी जाधव यांचा भाजपकडून उमेदवारी अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१५ नोव्हेंबर-**



नळदुर्ग नगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्र ५ मधून तानाजी जाधव यांनी १५ नोव्हेंबर रोजी भाजपकडून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

नळदुर्ग नगरपालिकेची निवडणूक २ डिसेंबर रोजी होत असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख १७ नोव्हेंबर आहे. केवळ दोन दिवसांचा कालावधी उरलेला असून या कालावधीत मोठ्या संख्येने अर्ज दाखल होण्याची शक्यता निवडणूक विभागाने वर्तविली आहे.

अद्याप प्रमुख राजकीय पक्षांकडून काही जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल झालेले नाहीत. नगराध्यक्ष पदासाठीही एका अपक्ष उमेदवारासह कोणताही पक्षीय दावा अद्याप नोंदविला गेलेला नाही.

या निवडणुकीसाठी अप्पर तहसीलदार प्रमोद गायकवाड हे निवडणूक निर्णय अधिकारी तर मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर व नायब तहसीलदार घृष्णेश्वर स्वामी हे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम काज पाहत आहेत.

अर्ज दाखल करताना माजी नगरसेवक सुधीर हजारे, सुहास येडगे, पांडुरंग गायकवाड, विलास येडगे, युवराज जगताप, सहदेव जगताप, प्रशांत पवार, पिंटू काळे, गणेश येडगे, लिंबराज पवार, अविनाश जाधव, शशिकांत बेले, महेश जाधव यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## नळदुर्ग नगरपालिकेत काँग्रेसचे अशोक जगदाळे यांचा अध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल

### नगरसेवक पदासाठी १० जणांचे अर्ज; आतापर्यंत एकूण १८ उमेदवारी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१५ नोव्हेंबर -**

नळदुर्ग नगरपालिका निवडणुकीसाठी १५ नोव्हेंबर रोजी काँग्रेस नेते अशोक जगदाळे यांनी नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. याच दिवशी नगरसेवक पदासाठी विविध पक्ष व अपक्षांसह एकूण १० जणांनी अर्ज दाखल केले. त्यामुळे आतापर्यंत या निवडणुकीत एकूण १८ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

नळदुर्ग नगरपरिषदेसाठी २ डिसेंबर रोजी निवडणूक होत आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख १७ नोव्हेंबर असून आता फक्त दोन दिवस बाकी आहेत. रविवार, १६ नोव्हेंबर रोजीही अर्ज स्वीकृतीची सुविधा दिल्याने रविवार आणि सोमवार-या दोन दिवसांत उमेदवारी अर्जांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अध्यक्ष पदासाठी आतापर्यंत दोन अर्ज प्राप्त झाले असून १५ नोव्हेंबर काँग्रेसचे अशोक जगदाळे पक्षाकडून अधिकृत अर्ज, १४ नोव्हेंबर शेख मोहम्मद मुजम्मिल अब्दुल लतिफ अपक्ष उमेदवार. या दिवशी एकूण ११ अर्ज दाखल झाले आहेत. १५ नोव्हेंबर रोजी अध्यक्ष पदासह एकूण ११ अर्ज जमा झाल्याची नोंद आहे.

## उमरगा नगराध्यक्ष पदासाठी राष्ट्रवादीकडून विक्रम बिराजदार यांचा अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१५ नोव्हेंबर -**

उमरगा नगरपरिषद निवडणूक २०२५ साठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेला वेग आला असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून महत्त्वाचा दावा अधिकृतपणे करण्यात आला आहे. माजी नगरसेवक विक्रम (बापू) मधुकरराव बिराजदार यांनी दि. १५ नोव्हेंबर रोजी नगराध्यक्ष पदासाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

नगराध्यक्ष पदाचा अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार गोविंद यरमे आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांच्याकडे सादर करण्यात आला. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. सुरेश दाजी बिराजदार, राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष दिग्विजय शिंदे, लोहारा तालुकाध्यक्ष सुनील साळुंखे, जिल्हा युवक सरचिटणीस शमशोद्दीन जमादार, माजी नगरसेवक बालाजी पाटील, युवक शहराध्यक्ष सुशील दळगडे, शहराध्यक्ष शंतनू सगर, मोहन शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

नगरसेवक पदासाठी उमेदवारी अर्ज दि.१५ रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या सहाव्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून खालील उमेदवारांनी नगरसेवक पदासाठी अर्ज दाखल केले.

यात सुशील दळगडे प्रभाग क्र.३, शंतनू सगर प्रभाग क्र.७ ब, महानंदा पाटील प्रभाग क्र.१२ क, ताराबाई दळगडे प्रभाग क्र.११, दिपाली बिराजदार प्रभाग क्र.१२ ब, प्रताप राठोड प्रभाग क्र.१२ अ, फैय्याज पठाण प्रभाग क्र.४ ब, रेणुका तेलंग प्रभाग क्र.४ अ, गीताबाई कांबळे प्रभाग क्र.३ अ, प्रदीपकुमार कांबळे प्रभाग क्र.११ ब, राम शिंदे प्रभाग क्र.१ ब.

राष्ट्रवादी काँग्रेसने उमरगा नगरपरिषदेत दमदार पद्धतीने उमेदवारी अर्ज दाखल करत आगामी निवडणुकीत मजबूत लढत देण्याचे संकेत दिले आहेत.

## मुरूम : भाजपकडून नगरसेवकासाठी २१ उमेदवारी अर्ज दाखल

### उबाठाकडून अजित चौधरी यांचा नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी अर्ज

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.१५ नोव्हेंबर -**

मुरूम नगरपरिषद निवडणुकीत शनिवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेला वेग आला असून भाजपकडून नगरसेवक पदासाठी तब्बल २१ अर्ज, तर उबाठा शिवसेनेकडून माजी नगरसेवक अजित चौधरी यांचा नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी अर्ज दाखल झाला आहे. आतापर्यंत नगराध्यक्ष पदासाठी ४ आणि नगरसेवक पदासाठी २२ अर्ज दाखल झाले असल्याची नोंद मिळाली आहे.

शुक्रवारी भाजप नेते तसेच जिल्हा बँक आणि मुरूम बाजार समितीचे अध्यक्ष बापुराव पाटील यांनी नगराध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल केल्यानंतर आज उबाठाकडून अजित चौधरी यांनीही उमेदवारी दाखल केली. भाजपाच्या नव्या गटाकडून, विशेषतः बापुराव पाटील यांच्या टीममधील २१ उमेदवारांनी नगरसेवक पदासाठी अर्ज दाखल केले आहेत.

दरम्यान, विरोधकांकडून अजित चौधरी यांच्याखेरीज अद्याप नगरसेवक पदासाठी कोणताही अर्ज दाखल झालेला नाही.

उमरगा तालुक्यातील मुरूम नगरपरिषदेत माजी मंत्री बसवराज पाटील यांनी काँग्रेसच्या बळावर अनेक वर्षे एकहाती वर्चस्व राखले होते. मात्र त्यांच्या भाजप प्रवेशानंतर शहरातील राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल झाला. या बदललेल्या पार्श्वभूमीवर पाटील यांचे धाकटे बंधू तसेच जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापुराव पाटील यांनी स्वतः नगराध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल करून निवडणुकीचे चित्र अधिक रंगतदार केले आहे.

पूर्वी विरोधक होते, त्यांना यंदाही संधी न देण्याचे धोरण ठेवले असल्याची चर्चा आहे. याचाच भाग म्हणून माजी नगराध्यक्ष धनराज मंगरुळे यांनीही शुक्रवारी अर्ज दाखल केला असला तरी, त्यांनी हा अर्ज बापुराव पाटील यांच्या सूचनेवरूनच दाखल केल्याची माहिती राजकीय वर्तुळात चर्चेत आहे.

श्रीकांत मिणियार यांनी भाजप म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला असला, तरी ते जुना भाजप गट मानला जात असल्याने त्यांना अधिकृत एबी फॉर्म मिळेल का? हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.

एबी फॉर्म न मिळाल्यास ते अपक्ष राहतील की माघार घेतील, या चर्चांनी निवडणुकीला अधिक रंगत आणली आहे.

**उमेदवारीची सद्यस्थिती...**

नगराध्यक्ष पदासाठी अर्ज : ४, नगरसेवक पदासाठी अर्ज : २२, भाजप (नवा गट) नगरसेवकासाठी २१ अर्जउबाठा शिवसेना अजित चौधरी यांचे नगराध्यक्ष व नगरसेवकासाठी अर्ज, मुरूममधील निवडणूक वातावरण तापत असून पुढील दोन दिवसांत आणखी अर्ज दाखल होण्याची शक्यता आहे.